पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ४१
सभावृत्तांत

दिनांक :- १९.१२.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर-२००९ ची मासीक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९.१२.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.थोरात एकनाथ दादा
६. मा.दत्तात्रय बाबुराव साने
७. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
८. मा.लोखंडे सुजाता सुनिल
९. मा.बो-हाडे शरद परशुराम
१०. मा.आल्हाट शांता महेंद्र
११. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१२. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
१३. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
१४. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१५. मा.गवळी विजया पंडित
१६. मा.महेश किसन लांडगे
१७. मा.फुगे सुनंदाताई विजय

१८. मा.आशा अंकुश लांडगे

१९. मा.मोहिनी विलास लांडे

२०. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२१. मा.सावळे सिमा

२२. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२३. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२४. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२५. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२६. मा.कदम निर्मला सदगुरु

२७. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२८. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

२९. मा.काळूराम मारुती पवार

३०. मा.आझम फकीरभाई पानसरे

३१. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३२. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३३. मा.भापकर मारुती साहेबराव

३४. मा.शेट्टी जगदिश

३५. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३६. मा.बोबडे भिमा सखाराम

३७. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३८. मा.गवळी शशीकिरण

३९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४०. मा.उबाळे वैशाली संजय

४१. मा.सुमनताई मधुकर पवळे

४२. मा.कुमार आर. एस.

४३. मा.उल्हास शेट्टी

४४. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४५. मा.कुटे गोपाळ नाना

४६. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४७. मा.भोंडवे तुकाराम महादू

४८. मा.गणेश तुकाराम भोंडवे

४९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५०. मा.वाघ रघुनाथ दलपत

५१. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

५४. मा.गावडे  जयश्री वसंत

५५. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

५६. मा.रामआधार धारिया

५७. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

५८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

५९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६०. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६२. मा.भाऊ उर्फ  कैलास गबाजी थोपटे

६३. मा.भारती ज्योती सुखलाल

६४. मा.सुतार विजया विजय

६५. मा.दरेकर सतीश दगडू

६६. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

६७. मा.बारणे संतोष नागु

६८. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

६९. मा.कलाटे कमल तानाजी

७०. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७१. मा.खोमणे लता हनुमंत

७२. मा.प्रशांत शितोळे

७३. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

७४. मा.अशोकभाई सोनवणे

७५. मा.जगताप शंकर पांडुरंग

७६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

७७. मा.एकनाथ मोटे

७८. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

७९. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८०. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८१. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

८३. मा.कुंभार रामदास तानाजी

८४. मा.अजित दामोदर गव्हाणे

८५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

८६. मा.आण्णा दादू बनसोडे

८७. मा.अपर्णा निलेश डोके

८८. मा.साबळे जगन्नाथ दगडू

८९. मा.कोकणे संतोष अंकुश

९०. मा.सौ.नांदगुडे सुजाता विलास

९१. मा.सौ.गारवे सावित्री किशोर

९२. मा.सौ.जगताप कल्पना कैलास

९३. मा.सौ.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९४. मा.हनुमंत बाळासाहेब गावडे

९५. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९६. मा. विनायक सुरेश रणसुभे

९७. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

९८. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.मुंढे, मा.पवार-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.चव्हाण- अति.शहर अभियंता, मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.सवणे,मा.जाधव -कार्य.अभियंता,मा.भारती-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, मा.श्री.भाऊसाहेब भोईर- नगरसेवक यांची पत्नी-मनिषा भाऊसाहेब भोईर, महापालिकेचे नगरसदस्य मा.मच्छिंद्र तापकीर यांच्या मातोश्री-लक्ष्मीबाई तापकीर, पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर यांच्या भगिनी- सौ.सुनिता अशोक साखळकर, माजी नगरसेवक बाळासाहेब हिंदळेकर यांचे वडील-अर्जून हिंदळेकर, निगडी येथील लहान मुलांचे प्रसिध्द डॉक्टर रविंद्र कदम यांचे वडील-बाबा कदम, निगडी-मिनाक्षी वाघ, ज्येष्ठ हॉटेल व्यावसायिक-वसंत बाबू उर्फ मामा शेट्टी, हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका- स्वीटा व्यंकटअप्पा देवराजू, माय पिंपरी-चिंचवड डॉट कॉमच्या वार्ताहर निशा पाटील यांचे पती-योगेश पाटील, योगेश वर्मा, बाबुराव टेकाळे, मंगेश जवळकर, अर्जुन खोत, विश्वजित साळुंखे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहुन सभा तहकुब करणेत यावी.

मा.संतोष बारणे :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- आपण आता श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकूब करण्याची सूचना मांडलेली आहे त्याबद्यल सदस्यांना विनंती करायची आहे की सभेचे कामकाज न थांबविता नित्य कामकाज वेळेवर करावे. माझी ही पहिली सभा असताना माझे मित्र भाऊसाहेब भोईर यांच्या पत्नी मनिषा भोईर तसेच आमचे मित्र तापकीर यांच्या मातोश्री व अनेक मान्यवरांचे निधन झालेले असल्याने आपण त्यांना श्रध्दांजली अर्पण करणार आहोत. श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकुब करावी अशी सभागृहाची मागणी आहे. आपण सर्वानी ठरविले पाहिजे की, सभा तहकूब करायच्या नाहीत, येथून पुढे श्रध्दांजली अपर्ण करुन जास्तीत जास्त अर्धा तास / एक तास सभा तहकूब करायची, सभा दोन-तीन दिवस तहकूब करण्याची प्रथा थांबवायची. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दि.२१.१२.२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ४१
सभावृत्तांत
(दिनांक १९.१२.२००९ ची तहकूब सभा)

दिनांक :- २१.१२.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक १९.१२.२००९ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २१.१२.२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर

२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर

३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा

४. मा.जाधव विजया अशोक (मामी)

५. मा.दत्तात्रय बाबुराव साने

६. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव

७. मा.लोखंडे सुजाता सुनिल

८. मा.बो-हाडे शरद परशुराम

९. मा.आल्हाट शांता महेंद्र

१०. मा.डॉ. सौ. मीना पाटील

११. मा.कुंभार रामदास तानाजी

१२. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१३. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१४. मा.गवळी विजया पंडित

१५. मा.अजित दामोदर गव्हाणे

१६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१७. मा.महेश किसन लांडगे

१८. मा.फुगे  सुनंदाताई विजय

१९. मा.आशा अंकुश  लांडगे

२०. मा.मोहिनी विलास लांडे

२१. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२२. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२३. मा.सावळे  सिमा

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२७. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२८. मा.यशवंत भोसले

२९. मा.कदम निर्मला सदगुरु

३०. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३१. मा.काळूराम मारुती पवार

३२. मा.आझम फकीरभाई पानसरे

३३. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३४. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३५. मा.भापकर मारुती साहेबराव

३६. मा.शेट्टी जगदिश

३७. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३८. मा.बोबडे  भिमा सखाराम

३९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४०. मा.गवळी शशीकिरण

४१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४२. मा.उबाळे वैशाली संजय

४३. मा.सुमनताई  मधुकर पवळे

४४. मा.कुमार आर. एस.

४५. मा.उल्हास शेट्टी

४६. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४७. मा.कुटे गोपाळ नाना

४८. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४९. मा.भोंडवे तुकाराम महादू

५०. मा.खानोलकर मनोज विक्रम

५१. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५२. मा.वाघ रघुनाथ दलपत

५३. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५४. मा.आण्णा दादू बनसोडे

५५. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५६. मा.अपर्णा निलेश डोके

५७. मा.गावडे  जयश्री वसंत

५८. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

५९. मा.रामआधार धारिया

६०. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६१. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६३. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६४. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

६५. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

६६. मा.भारती ज्योती सुखलाल

६७. मा.कोकणे संतोष अंकुश

६८. मा.सुतार विजया विजय

६९. मा.दरेकर सतीश दगडू

७०. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७१. मा.बारणे संतोष नागु

७२. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७३. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

७४. मा.प्रशांत शितोळे

७५. मा.अशोकभाई सोनवणे

७६. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

७७. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

७८. मा.जगताप शंकर पांडुरंग

७९. मा.एकनाथ मोटे

८०. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८१. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८२. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८४. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

८५. मा.गणेश तुकाराम भोंडवे

८६. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडू कोकणे

८७. मा.बारणे सिद्धेश्वर बाळासाहेब

८८. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

८९. मा. विनायक सुरेश रणसुभे

९०. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

९१. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.पवार-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.शिर्के-मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मा.इंगळे,मा.सवणे,मा.जाधव,मा.दुधेकर-कार्य. अभियंता,मा.भारती-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य), मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, माजी नगरसदस्य-मसुकांत शिंदे, सौ.शकुंतला शिवाजी मोरे रा.मोरेवस्ती व प्रा.अरुण कांबळे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहुन सभा दहा मिनिटांसाठी तहकुब करणेत यावी.

मा.विनायक रणसुभे :- अनुमोदन देतो.

मा.बाळासाहेब भुंबे :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डातील मसूकांत शिंदे यांचे प्रदिर्घ आजाराने निधन झालेले आहे त्यामुळे ही सभा एक दिवसासाठी तहकूब करावी.

मा.तानाजी खाडे :- अनुमोदन देतो.

मा.शशिकिरण गवळी :- मा.महापौर साहेब,आपल्या भावना आम्ही समजू शकतो. आपण महापौरपदी विराजमान झाला आहात, दोन दिवसापुर्वी आपण म्हणाला होता की सभा तहकूबीचा पायंडा आपण सोडावा. वस्तुस्थिती अशी आहे की सभा दहा मिनिटासाठी तहकूब करावी अशी सूचना आली आहे म्हणून सांगतो की, मसूकांत शिंदे हे या सभागृहाचे सदस्य होते, या महापालिकेत त्यांनी काम केलेले आहे त्यांचे योगदान या पिंपरी चिंचवड विकासासाठी असणार आहे याचा विचार करुन एक दिवसासाठी तरी सभा तहकूब करावी. काही अपवादात्मक बाबी मध्ये असा विचार करावा लागेल.

मा.महापौर :- ज्येष्ठ सदस्य शशिकिरण गवळी यांनी त्यांच्या भावना मांडलेल्या आहेत. मी पुन्हा एकदा विनम्रपणे सांगतो की आपण लोकांच्या अडीअडचणी दुर करण्यासाठी सभागृहात येत असतो. ख-या अर्थाने आपण जनतेचे काम करतो. जनतेचे काम थांबवून आदरांजली वाहणे चुकिचे वाटते. त्यांचा आदर आपण करतो,नातेवाईकांच्या,कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेवून ख-या अर्थाने जनतेचे कामकाज करुन आदरांजली अर्पण केली पाहिजे व त्यासाठी आपण सहकार्य करावे. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दि.२१.१२.२००९ रोजी दुपारी २.२५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ४१
सभावृत्तांत
(दिनांक १९.१२.२००९ व दि.२१.१२.२००९ (दु.२.००)ची तहकूब सभा)

दिनांक :- २१.१२.२००९ वेळ :- दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २१.१२.२००९ (दु.२:००) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २१.१२.२००९ रोजी दुपारी २.२५ वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.दत्तात्रय बाबुराव साने
६. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
७. मा.लोखंडे सुजाता सुनिल
८. मा.बो-हाडे शरद परशुराम
९. मा.आल्हाट शांता महेंद्र
१०. मा.डॉ. सौ. मीना पाटील
११. मा.कुंभार रामदास तानाजी
१२. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
१३. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१४. मा.गवळी विजया पंडित
१५. मा.अजित दामोदर गव्हाणे

१६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१७. मा.महेश किसन लांडगे

१८. मा.फुगे  सुनंदाताई विजय

१९. मा.आशा अंकुश  लांडगे

२०. मा.मोहिनी विलास लांडे

२१. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२२. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२३. मा.सावळे  सिमा

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२७. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२८. मा.यशवंत भोसले

२९. मा.कदम निर्मला सदगुरु

३०. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३१. मा.काळूराम मारुती पवार

३२. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३३. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३४. मा.भापकर मारुती साहेबराव

३५. मा.शेट्टी जगदिश

३६. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३७. मा.बोबडे  भिमा सखाराम

३८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३९. मा.गवळी शशीकिरण

४०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४१. मा.उबाळे  वैशाली  संजय

४२. मा.सुमनताई  मधुकर पवळे

४३. मा.कुमार आर. एस.

४४. मा.उल्हास शेट्टी

४५. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४६. मा.कुटे गोपाळ नाना

४७. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४८. मा.भोंडवे तुकाराम महादू

४९. मा.खानोलकर मनोज विक्रम

५०. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५१. मा.वाघ रघुनाथ दलपत

५२. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५३. मा.बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडु कोकणे

५४. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५५. मा.अपर्णा निलेश डोके

५६. मा.गावडे  जयश्री वसंत

५७. मा.रामआधार धारिया

५८. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

५९. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६१. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६२. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

६३. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

६४. मा.भारती ज्योती सुखलाल

६५. मा.कोकणे संतोष अंकुश

६६. मा.सुतार विजया विजय

६७. मा.दरेकर सतीश दगडू

६८. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

६९. मा.बारणे संतोष नागु

७०. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७१. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

७२. मा.प्रशांत शितोळे

७३. मा.अशोकभाई सोनवणे

७४. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

७५. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

७६. मा.जगताप शंकर पांडुरंग

७७. मा.एकनाथ मोटे

७८. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

७९. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८०. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

८३. मा.गणेश तुकाराम भोंडवे

८४. मा.बारणे सिद्धेश्वर बाळासाहेब

८५. मा.हनुमंत बाळासाहेब गावडे

८६. मा.विनायक सुरेश रणसुभे

८७. मा.प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

८८. मा.एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.मुंढे, मा.पवार-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.शिर्के-मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मा.इंगळे, मा.सवणे, मा.जाधव,मा.दुधेकर -कार्य. अभियंता,मा.भारती-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य), मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार, मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्र.३९ दि. २०.११.२००९ (दु.२.०० व २.२५) चा सभावृत्तांत कायम करणे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, प्रोसिडींग कायम करते वेळेस ते वाचून दाखविलेतर बरे होईल.

मा.महापौर :- आपल्या सर्वांना सभावृत्तांताची प्रत दिलेली असते.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, ठिक आहे आपली सूचना मान्य आहे. जे आम्ही बोलतो ते प्रोसिडींगमध्ये व्यवस्थीत नोंद केले पाहिजे. आपल्याला सर्व अधिकार आहेत, आम्हांला विचारुन डिलीट करायचे असेलतर डिलीट करावे. त्या सभासदाला विश्वासात घेवुन डिलीट करावे.

मा.महापौर :- अमर मुलचंदानी यांनी सूचना केली त्याची दखल घेणेत यावी व त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सभावृत्तांतामध्ये पान क्र. २५ वर त्यावेळच्या मा.पिठासिन अधिकारी यांनी काही सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केली का नाही. आपल्या इंजिनिअरींग डिपार्टमेंटचे सिटि इंजिनिअर यांनी सभागृहाला चुकिची माहिती दिली होती. आऊट स्टॅण्डींग अमाऊंट ८७.४१ कोटी प्रलंबीत होती. बजेटमध्ये तरतूद नसताना अधिका-यांनी कामे केली आहेत. आम्ही वॉर्डातील १० लाखाचे काम करा म्हणून सांगीतलेतर,

१० टक्क्यापेक्षा जास्त वाढीव काम करु शकत नाहीत असे सांगतात. आणि याठिकाणी तरतूद नसताना १२५ कोटीचे काम जास्त केले आहे हा गुन्हा आहे. तुम्ही याठिकाणी २००९-२०१० ची माहिती दिलेली आहे. टिप मध्ये स्थापत्य विभागाचे विशेष योजनांअंतर्गतकामांची आज अखेर अंदाजे रक्कम रुपये ८७.४१ कोटीची देयके बाकी आहेत असे आहे. हे काम गेल्यावर्षी झालेले आहे. तरतूद नसताना कामे केली असतीलतर सिटि इंजिनिअर यांच्यावर काय कार्यवाही केली. नगरसेवकांनी १० लाखाची तरतूद वाढवून द्या म्हणलेतर बजेटमध्ये तरतूद नाही असे म्हणतात मग याठिकाणी बजेट मध्ये तरतूद नसताना अधिका-यांनी काम केले आहे त्यांच्यावर काय कार्यवाही केली. त्यावेळेसच्या मा.पिठासिन अधिकारी यांनी प्रशासनाला अशा सूचना केल्या होत्या की "प्रशासनास सूचना करण्यात येते की, यासंबंधीत तीन वर्षाची स्थापत्य विभागाकडून झालेल्या कामाची चौकशी करावी व संबंधीत अधिकारी व सिटि इंजिनिअरवर दोषी आढळलेतर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच आर्थिक परिस्थितीची माहिती मागीतलेली आहे त्याबाबतीत लेखी स्वरुपात माहिती सर्व नगरसेवकांना देण्यात यावी." आर्थिक परिस्थिती बाबत माहिती दिलेली आहे परंतु चौकशी कमिटि नेमली आहे का. पिठासिन अधिकारी प्रशासनाला इन्स्ट्रक्शन देतात त्यासाठी सभावृत्तांत कायम होण्याची गरज नाही. आयुक्त साहेबानी इन्क्वॉयरी कमिटि नेमली का याची माहिती दयावी आणि इन्क्वॉयरी कमिटि नेमली नसेलतर का नेमली नाही हे सांगावे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, पा.क्र. २५ वर स्पष्ट म्हणलेले आहे सभागृहात तीन वर्षापासून काम करत असताना वेळोवेळी पिठासिन अधिकारी, आयुक्त यांना विनंती केलेली आहे की एखादया प्रकल्पाचे आपण ज्यावेळेला इस्टीमेट करतो आणि त्याचा खर्च काढतो तेव्हा त्या खर्चाच्या जास्तीत जास्त १० टक्केपर्यंत वाढीव खर्च झाला पाहिजे असा नियम असताना महापालिकेत ३५० कोटी पेक्षा अधिक वाढीव रक्कमेचे काम झालेले आहे. महापालिकेमध्ये एखादयावेळी मोठी आपत्ती आलीतर थेट पध्दतीने काम दयावे अशाप्रकारचे नियम असताना १५० कोटी पेक्षा जास्त काम डायरेक्ट पध्दतीने दिलेले आहे. ७० कोटी सल्लागारावर उधळले आहेत. महाराष्ट्र शासनाकडे याची तक्रार केलेली आहे. बजेट मॉनेटरींग केलेले नाही. तरतूदीपेक्षा तीनपट अधिक खर्च झालेला आहे अशाप्रकारचा कारभार प्रशासनाच्या वतीने केलेला आहे. मागच्या मिटिंगमध्ये सदस्यांनी महापौरांकडे या सर्व प्रकाराची चौकशीची मागणी केलेली होती आणि महापौरांनी ती चौकशी केली जाईल सभागृहाला उत्तर दिले जाईल अशाप्रकारच्या सूचना प्रशासनाला केलेल्या होत्या. कुमार साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे चौकशी काय झाली. त्यासंदर्भात कमिटि नेमली का,नसेलतर प्रशासनाचे पुढचे धोरण काय आहे, हा कायदयाला धाब्यावर बसून झालेला कारभार आहे. याबाबतीत जनहितार्थ निर्णय घेवून या प्रश्नाचे दुध का दुध आणि पाणी का पाणी करावे.

मा.महापौर :- आपल्याकडे चिफ ऑडीटर आहेत. एखादे टेंडर कोट करत असताना ते १० टक्केपेक्षा जास्त वाढीव असेलतर ते कायदयाला धरुन नाही. चिफ ऑडीटर यांनी तशाप्रकारच्या गाईडलाईन्स नमुद केल्या पहिजेत. आयुक्तांनी तशाप्रकारचे आदेश चिफ ऑडीटर यांना काढावेत आणि चिफ ऑडीटर यांनी त्वरीत हे करावे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, महापालिकेचे लेखापरिक्षण वर्षाच्या वर्षाला झाले पाहिजे. स्थायी समितीपुढे ते ठेवले पाहिजे. महापालिकेच्या लेखापरिक्षणाबाबत आम्ही वेळोवेळी मागणी केलेली आहे, ऑडीटवर कोटयावधी रुपयाचा खर्च करत असताना त्याची वेळेवर कार्यवाही होत नाही. महापालिकेचे लेखापरिक्षण किती वर्षाचे पुर्ण आहे. माझ्या माहितीप्रमाणे २००५-०६ येथपर्यंत लेखापरिक्षण पुर्ण झालेले आहे. चिफ ऑडीटर यांच्या मार्गदर्शनाखाली कमिटि नेमून साडेतीन वर्षाची चौकशी केलीतर या प्रकरणाचे दुधका दुध आणि पाणी का पाणी होईल.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आपण चिफ ऑडीटर यांचे नाव घेतलेले आहे. चिफ ऑडीटर यांच्याकडे फक्त टेंडर उघडलेतर त्याची फाईल जाते. वाढीवची फाईल जात नाही. १० टक्केपेक्षा जास्त वाढीव देत नाहीत तर मग हे ७० ते ८० टक्के वाढीव कसे काय. प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांना चार वर्षापेक्षा जास्त काळ झालेला असेलतर शासनाची विशेष मान्यता लागते. राजदेरकर यांना पाच वर्षे पुर्ण झालेले आहेत. आपल्या महापालिकेमध्ये ठेवण्यासाठी त्यांना शासनाने परवानगी दिलेली नाही. १५० कोटीच्या वाढीव फाईली राजदेरकर यांच्याकडे गेल्याच नाहीततर मग त्यांनी कुठून रिमार्क दिले. २००६-०९ या कालावधीमध्ये ३०० ते ४०० कोटीचे वाढीव काम झालेले आहे. त्याची एकही फाईल राजदेरकर यांच्याकडे गेलेली नाही, याचे ऑडीट कधी करणार. कामाच्या ऑर्डर देताना त्यांच्याकडे फाईली पाठवितात आणि वाढीव करतांना पाठवित नाहीत. बजेट मॉनेटरींग केलेले नाही. आज वॉर्डामध्ये काम करण्यासाठी पैसे नाहीत यास सर्व अधिकारी कारणीभूत आहेत. आज आमच्याकडे इन्टरनल रोड, गटर करण्यासाठी पैसे नाहीत. माझ्या वॉर्डात ६२ लाखाचे फुटपाथचे काम आहे, २००८ पासून आयुक्त, सिटि इंजिनिअर यांच्याकडे गेलो पण काम होत नाही. ठेकेदार म्हणतात माझे पैसे बाकी आहेत ते दिल्याशिवाय मी काम करणार नाही. तरी या तीन वर्षाच्या कालावधीची चौकशी व्हावी आणि संबंधित अधिका-यांवर कार्यवाही करावी. पिठासिन अधिका-यांनी आदेश दिल्याप्रमाणे काम करायला पाहिजे,चौकशी व्हायला पाहिजे,कार्यवाही व्हायला पाहिजे, तुम्ही आयुक्तांना सांगावे याबाबतीत माहिती दयावी.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, राजदेरकर यांची नियुक्ति पुढे वाढविण्यात आलेली आहे. राजदेरकर यांनी आजपर्यंत जे आक्षेप नोंदविलेले आहेत त्यावर काय कार्यवाही झाली. शेकडो प्रकरणात आक्षेप घेतलेले आहेत ते प्रलंबीत आहेत. आपण पुढे पुढे जात चाललो आहोत. मागच्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करत नाहीत त्यामुळे चुकावर आणखी चुका होत चालल्या आहेत. जे लोक चुका करत आहेत त्याना वाटते की आम्ही चुका केल्यातरी त्यावर कार्यवाही होत नाही. त्यामुळे ही निर्ढावलेली मंडळी आहेत. जे आक्षेप घेतले आहेत त्यावर कोणती कार्यवाही मा.आयुक्त आपण करणार आहात. त्यासाठी कालावधी पाहिजे असेलतर तो घ्यावा परंतु राजदेरकर यांनी घेतलेल्या आक्षेपावर काय कार्यवाही केली याचे उत्तर दिले पाहिजे.

मा.महापौर :- आर.एस.कुमार यांनी नेमणूकी विषयी विचारले आहे. प्रशासनाकडून मी माहिती घेतली आहे. राजदेरकर यांना येथे कायम ठेवावे अशी महापालिका सभेनी मान्यता दिलेली आहे व सदरचा प्रस्ताव प्रशासनामार्फत,आयुक्तांमार्फत शासनाकडे गेलेला आहे व तो शासनाकडे प्रलंबीत आहे. शासनाकडून उत्तर आलेले नाही.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, मा.महापौर यांनी आदेश दिलेले होते की मागील तीन वर्षाची चौकशी झाली पाहिजे. चिफ ऑडीटर यांना सांगीतलेले आहे,त्यासाठीचे ऑलरेडी डिसीजन घेण्यात आलेले आहेत. चिफ ऑडीटर यांना रिपोर्ट सबमिट करायला सांगीतले आहे. ज्या ऑफिसरकडे फाईली जातात त्याच ऑफिसरकडून इन्क्वॉयरी करणे बरोबर होणार नाही. ज्या काही चुका झालेल्या आहेत त्याबद्यल इन्क्वॉयरीचे आदेश ऑलरेडी दिलेले आहेत व त्यांनी काम करण्यास सुरवात केलेली आहे.

मा.महापौर :- आयुक्त साहेबांनी वाढीव खर्चाच्या बाबतीत प्रोसीजर काही चुकले का याची माहिती विचारली आहे व ते व्हेरीफाय करुन काय चुकले ते माझ्याकडे सादर करा असे चिफ ऑडीटरला आदेश दिलेले आहेत.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, चिफ ऑडीटर यांनी चौकशी करावी असे सांगीतले असेलतर सभागृहाने आक्षेप नोंदविलेले आहेत. निवृत्त न्यायाधिशाना नियुक्त करुन त्यांच्यामार्फत चौकशी केलीतर, अतिशय नि:पक्षपातीपणे चौकशी होईल. त्यामुळे करदात्यांच्या हिताचे ख-या अर्थाने रक्षण होणार आहे. निवृत्त न्यायाधिश अथवा अरुण भाटिया यांच्यामार्फत चौकशी केलीतर नि:पक्षपाती चौकशी होईल, तशाप्रकारचा निर्णय घ्यावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, अरुण भाटिया यांना इन्क्वॉयरी ऑफिसर म्हणून अपॉईन्ट करावे. राजदेरकर यांचा ठराव पाठविलेला आहे त्याला शासनाची मान्यता मिळालेली नाही. अशा व्यक्तिकडे काम देणे चुकिचे आहे. प्रतिनियुक्तीवर चार वर्षे झाल्यानंतर सी.एम.ची विशेष मान्यता लागते. कोणी कोर्टात गेलेतर रिमार्क पास होणार आहेत. तरी अरुण भाटिया यांच्याकडे चौकशीचे काम सोपवावे.

मा.महापौर :- सभावृत्तांत कायम करण्याचा विषय आहे, कायम करायचा का नाही एवढे सांगावे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, अरुण भाटिया यांना सभागृहाच्या वतीने आम्ही सभासद विनंती करतो की त्यांनी कुठलाही मोबदला न घेता चौकशी करावी. पालीकेचा कुठलाही खर्च न होता चौकशी होईल तरी यावर विचार करावा.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, पुढच्या अजेंडयाबरोबर या मिटिंगचे प्रोसीडींग व अजेन्डा यावा.

मा.महापौर :- येथून मागे जो कारभार झालेला आहे त्याबाबत कुमार यांनी सांगीतले की वाढीव कामाच्या फाईली चिफ ऑडीटरकडे जात नाहीत. साहेबांनी चिफ ऑडीटर यांना पत्र काढलेले आहे, रिपोर्टींग करा असे सांगीतलेले आहे. त्यामध्ये आयुक्तांचे समाधान, आपले समाधान होत नसेलतर तूम्ही केलेल्या सूचनांचा विचार पुढच्या वेळेस होईल. आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत. रिपोर्ट येऊ दयावा त्यावर आपले समाधान होणार नसेलतर तुम्ही सांगीतल्याप्रमाणे भाटिया साहेबांचा विचार सभागृह करेल.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, गेली सहा-सात वर्षे राजदेरकर यांनी जे ऑडीट मध्ये आक्षेप नोंदविलेले आहेत या आक्षेपाच्या संदर्भात आयुक्तांनी कोणती कार्यवाही केलेली आहे. याचे उत्तर पाहिजे.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, ऑडीटचा मुद्या काढलेला आहे तो विषयपत्रिकेवर विषय नाही त्यामुळे माहिती पुढच्या मिटिंगमध्ये देतो. आता माझ्याकडे माहिती नाही.

अ) मा.महापालिका सभा क्र.३९ दि.२०.११.२००९ (दु.२:०० व २:२५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.विशेष महापालिका सभा क्र. ४० दि.०१.१२.२००९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, परवा शनिवारी आपल्या दोन मिटिंग तहकूब झाल्या होत्या त्या संदर्भात एका वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती की " सभासदांना राष्ट्रगीताचे सुध्दा भान नव्हते." कोणत्याही सभासदाने कधीही राष्ट्रगीताचा अपमान केलेला नाही, दोन मिटिंग असतीलतर दुसरी मिटिंग झाल्यानंतर राष्ट्रगीत होत असते. बातमीमुळे चुकिचा मेसेज गेलेला आहे. प्रशासनाने वर्तमानपत्रामध्ये तसा खुलासा करायला पाहिजे होता.

मा.महापौर :- सन्मा.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे पत्रकार मित्रांनी अशी बातमी छापायच्या अगोदर माहिती घ्यायला पाहिजे होती. एका दिवसामध्ये एकापेक्षा अधिक सभा असतीलतर शेवटच्या सभेला राष्ट्रगीत घेत असतो त्यामुळे पहिल्या सभेला राष्ट्रगीत घेणे योग्य नव्हते. पत्रकार मित्रांची चुक झालेली आहे. काळे साहेबांनी सुध्दा पत्रकारांना समजावून सांगीतलेले आहे. पत्रकार मित्रांची चुक त्यांनी दुरुस्त करुन घ्यावी. असे विषय चर्चा करुन छापलेतर योग्य राहिल.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ/३४२/२००९ दि.४/११/०९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९६९२ दिनांक १०.११.२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३६ दि.२०/११/२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मुंबई-पुणे हमरस्त्यानजीक असलेल्या चिंचवड येथील म.न.पा.च्या आरक्षित जागेत प्रादेशिक विज्ञान केंद्र (Regional Science Centre) आणि 'पी पी पी' (Public Private Partnership) तत्वावर सिटी सेंटर/बिझनेस सेंटर प्रकल्प विकसित करण्याचे प्रयोजन आहे. या प्रकल्पाचे फेरबदलास महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र./टिपीएस/१८०९/७२/प्र.क्र.१६०१/ ०९/नवि१३/२२-५-०९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत १८१ड प्रमाणे १३७०३९.४६ चौमी क्षेत्र बिझनेस सेंटर करीता आरक्षित आहे. तसेच १८१ब प्रमाणे ३०००० चौमी क्षेत्र प्रादेशिक विज्ञान केंद्र प्रकल्पासाठी आरक्षित असून ते एन.सी.एस.एम., कोलकत्ता, केंद्र सरकार आणि म.न.पा.च्या सहकार्याने बांधण्यात येणार आहे. सिटी सेंटर / बिझनेस सेंटर

प्रकल्प 'पी पी पी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) या तत्वावर मनपाची कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता ९९ वर्षांच्या कालावधीकरीता राबविण्याचे ठरत असल्याने व त्यामुळे मनपास आर्थिक उत्पन्न मिळणार असल्याने नियोजीत विकसकांबरोबर डेव्हलपमेंट अग्रीमेंट व लिज डिड करणे आवश्यक आहे. विकसकाने सदरील प्रकल्पावर वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळविणे व संभाव्य ग्राहकांचे नांवे सबलिज करणेस परवानगी देणेस व याशिवाय इतर अटी,शर्ती व तपशिल ठरविण्यास, तो मान्य करण्यास व त्याप्रमाणे अंतिम करारनामे करण्यास मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, आपण गैरसमज करु नये. विषयाला आमचा विरोध आहे. आमचे समाधान झाल्याशिवाय विषयाला आम्ही मान्यता देणार नाहीत. आमचे समाधान करावे, आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. पीपीपी हे काय आहे. तीन लेटर आहेत. १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ/३४२/२००९दि.४/११/०९ २) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९६९२ दिनांक १०.११.२००९ ३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३६ दि.२०/११/२००९ अन्वये. पीपीपीचा अर्थ काय आहे हे सभासदांना समजू दयावे. आपण ११५ कोटीत जमिन देतो, ज्याची किंमत बाजारभावाप्रमाणे ५०० कोटी होते. यामध्ये महापालिकेचे नुकसान होणार आहे. वरील तीन पत्राचा खुलासा करावा. या प्रकल्पाच्या टेंडरची मुदत २५.९.०९ अशी होती ती मुदत संपली आहे. जी.बी.ला मान्यता व्हायच्या अगोदर टेंडर कसे काय निघाले याचा खुलासा करावा.

मा.महापौर :- अमर मुलचंदानी जे करायचे आहे ते जनहितासाठी करायचे आहे.आपण समजून नंतरच निर्णय घेवू.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, मला उपसूचना मांडावयाची आहे.

मा.महापौर :- ज्यांनी हात वर केला त्यांनीच बोलायचे आहे. गायकवाड यांनी उपसूचना नंतर मांडावी अगोदर चर्चा होऊ दयावी.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, आमचे ज्येष्ठ सहकारी अमर मुलचंदानी यांनी पीपीपीचा अर्थ काय आहे हे विचारलेले आहे त्याचा खुलासा व्हावा. पीपीपी प्रमाणे करारनामा होत असेलतर त्यामध्ये मिळणा-या उत्पन्नामध्ये पीसीएमसीला कोणत्या परसेन्टेजमध्ये उत्पन्न मिळणार आहे त्याचा उल्लेख झालेला नाही. शासकीय दरानुसार ११५ कोटी किमंत होत असेलतर बाजारभावाप्रमाणे त्याची ५०० कोटी किमंत होणार आहे त्याप्रमाणे महापालिकेला उत्पन्न मिळावे. आजची

परिस्थिती पाहिलीतर ८० कोटीच्या बिलाची थकबाकी आहे, कर्मचा-यांना बोनस दिलेला नाही, ५ टक्के महागाई भत्ता द्यायचा आहे, जकातीचे उत्पन्न १२० कोटीने कमी मिळालेले आहे, आपल्यावर कर्ज घ्यायची वेळ आलेली आहे त्यामुळे ही आर्थिक दुरावस्था दुर करण्यासाठी असे प्रकल्प राबवित असालतर महापालिकेला प्रतिवर्षी काहीतरी उत्पन्न मिळायला पाहिजे यासाठी खुलासा करावा.

मा.भिमा बोबडे :- मा.महापौर साहेब, विषयाला उपसुचना मागवून घेता हे मला पटलेले नाही. एवढी घाई कशासाठी करायची आहे. महापालिकेची ही जमिन २००० च्या पुढे जाईल मग ती ६०० ते ७०० रुपये दराने का द्यायची. टेंडर निघालेले सुध्दा आम्हांला माहित नाही. मला यात चुक झाली का नाही, ऑडीट झाले का नाही हे सांगावे. आयुक्त साहेब म्हणतात, त्यांना माहित आहे चुक झालेली आहे. ६०० रुपयांनी एवढया स्वस्त दराने द्यायचे हे योग्य नाही. तुकडे तुकडे करुन दिलेतरी चांगले होईल.

मा.महापौर :- ज्यांना ज्या शंका आहेत त्यांनी त्या विचाराव्यात.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, सिटि सेंटरचा हा जो बहुचर्चीत महत्वकांक्षी प्रकल्प करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यासंदर्भात अनेक कायदेशिर अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आपण महापालिकेच्या वतीने आयुक्त यांना लीजडीड करण्याचे अधिकार प्रदान करणार असा विषय आणलेला आहे आणि त्यावर उपसूचना आहे त्यानुसार आयुक्तांचे अधिकार पाठिमागे घेणार आहोत. महापालिकेची परिस्थिती अतीशय खालावलेली आहे. महापालिकेच्या कर्मचा-यांना बोनसची रक्कम,सानुग्रह अनुदानाची रक्कम दिलेली नाही. महापालिकेचे आयुक्त वर्तमानपत्रामधून म्हणत असतील आम्ही कुठलेही तारण न ठेवता २०० कोटीचे कर्ज धेणार आहोत परंतू आम्ही डॉकेट वाचले त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे, तारण ठेवून कर्ज घेणार आहोत. जमिनीच्या व्यवहाराची, कन्स्ट्रक्शनच्या व्यवहाराची माहिती असलेल्या व्यक्ति याठिकाणी काम करतात त्यामुळे या विषयाच्या संदर्भात या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे जास्तीत जास्त आर्थिक हित पाहूनच सभागृह निर्णय घेईल अशी खात्री व्यक्त करतो. मा.आयुक्तांनी नगरसचिवांना या जागेवर मुळ आरक्षण होते त्या आरक्षणासंदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात यावी यास संमती घेण्याचे विषयपत्र दिलेले होते. त्या माध्यमातून दि. १९.९.०८ ठराव क्र. ४५१ याच सभागृहामध्ये मंजूर झाला आहे. या ठरावामध्ये कार्यवाही सुरु करण्यास संमती असे म्हणलेले आहे. त्याठिकाणचे जे आरक्षण आहे ते भोसरीमध्ये स्थलांतरीत होणार आहे. त्यानंतर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे गेला. एमआरटीपी ॲक्ट कलम २३ खाली कार्यवाही सुरु करण्याचा प्रस्ताव झाल्यानंतर मुळ आरक्षणामध्ये फेरबदल करुन जागेत बदल होणार आहे, त्याबद्यलचा अंतीम ठराव सभागृहामध्ये ठेवून सभागृहाची मान्यता

घेवून ठराव शासनाकडे जायला पाहिजे होता परंतू तसे न करता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली आहे. महाराष्ट्र शासनाकडे विषय गेला त्यांनी मंजूर केला, शासनाची दिशाभूल झाली आहे. कलम २३ प्रमाणे अंतीम मान्यता न घेता शासनाकडे विषय पाठविलेला आहे. एमआरटीपी ॲक्टचे कलम ३१ कडे मी लक्ष वेधू इच्छितो. एमआरटीपी ॲक्ट ३७ नुसार विकास आराखडयामध्ये बदल करत असताना आराखडयाचे स्वरुप बदलणार नाही असे आहे. त्यात आमुलाग्र बदल झाला आहे. येथील आरक्षण भोसरीमध्ये टाकणे ही बाब एमआरटीपी ॲक्टचे उल्लंघन करणारी आहे. आपण ज्या वास्तुविशारदाकडून स्पर्धात्मक पध्दतीने निवीदा मागविल्या त्यामध्ये १७ लाखा पासून १ कोटी पर्यंत संकल्पचित्र मांडण्याकरीता खर्च येईल असे सांगण्यात आले असताना हाफिज कॉन्ट्रक्टर यांनी २ हजारामध्ये अशाप्रकारचे संकल्पचित्र या महापालिकेला दिले जाईल असे सांगीतले आहे. हाफिज कॉन्ट्रक्टर कोण आहेत. जे काम १७ लाखापासून १ कोटीपर्यंत होणार होते ते डायरेक्ट २ हजारांमध्ये करतात त्यामागचा काय उद्देश आहे याचे स्पष्टीकरण व्हायला पाहिजे. आपण वर्तमानपत्रामध्ये वाचले दोन हजारामध्ये संकल्पचित्र देणारे हाफिज कॉन्ट्रक्टर यांचे सादरीकरण हॉटेलमध्ये दाखविले त्याठिकाणचा चहापानाचा खर्च २० हजार झालेला आहे. “चार अण्याची कोंबडी आणि बारा अण्याचा मसाला” असा प्रकार झाला आहे. २ हजाराचे काम आणि चहापानचा खर्च २० हजाराचा हे पटत नाही. जे झालेले आहे त्याचे स्पष्टीकरण आयुक्तांनी दयावे. १ कोटीपर्यंत संकल्पचित्राची किमंत आहे आणि हे २ हजारामध्ये करतात हे कोड उलगडत नाही. ते सांगावे.

मा.महापौर :- भापकर साहेब आपण बोलावे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, दुसरा मुद्या सांगावासा वाटतो की, १७.१२.२००९ रोजी आपल्याकडे पश्चिम बंगालच्या हावडा महानगरपालिकेचे पदाधिकारी आलेले होते. त्यांनी पीपीपी तत्वावर कशाप्रकारे प्रकल्प राबविले जातात याच्याबद्यल आपल्याशी सविस्तर चर्चा केलेली आहे. त्याठिकाणचे उदयान त्यांनी पीपीपी तत्वावर विकसीत करण्यासाठी एका ठेकेदाराला दिले आहे. त्यासाठी ३५ वर्षाचा करारनामा करण्यात आला आहे. त्या जमिनीवर कर्ज विकसकाने घ्यायचे नाही अशाप्रकारची अट टाकलेली आहे. ३५ लाख भाडे महापालिकेला देणार आहेत आणि दर पाच वर्षानी त्यात १० टक्के वाढ भाडयामध्ये केली जाणार आहे. प्रत्येक वेळेस करारनामा केला जाईल. त्या जागेवर पोटभाडेकरु त्या ठेकेदाराला ठेवायचा असेलतर तो त्याला ठेवता येणार नाही अशाप्रकारच्या अटी त्या उदयानासंदर्भात हावडा महापालिकेनी करारनामा करत असताना टाकलेल्या आहेत. आपला करारनामा नेमका त्या उलट आहे, आपला करारनामा ९९ वर्षाचा आहे.

मा.महापौर :- भापकर साहेब आपण पुर्ण अभ्यास करत नाहीत. गार्डनचे आरक्षण आहे त्यामध्ये १० टक्के बांधकाम अनुज्ञेय आहे. त्यासाठी त्यांना ३५ वर्षे भरपूर होतात. आपल्याकडे ९० पट जास्त गुंतवणूक होणार आहे त्यामुळे कालावधी जास्त लागतो. म्हणून त्याच्याशी याची तुलना करु नका. त्याठिकाणी परतफेडीला ३५ वर्षे लागतील म्हणून त्यांनी ३५ वर्षे दिलेले आहेत. आपल्याकडे मोठया क्षेत्राचे बांधकाम आहे. तुम्ही सूचना करा फक्त याची तुलना त्याच्याशी करु नका.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, ही जागा ३४ एकरची आहे. या जागेचा बाजारभाव सर्वांना माहित आहे.रेडिरेकनरचा दर ६५०० प्र.चौ.मी.काढलेला आहे. महापालिकेचे मोठयाप्रमाणात आर्थिक नुकसान करुन हा प्रकल्प राबविला जातो आहे असे चित्र दिसते आहे. हा जो विषय आहे तो मुळात बेकायदेशिर आहे, शासनाची फसवणूक करणारा आहे, वेगवेगळया कायदयाचे उल्लंघन करणारा आहे. एमआरटीपी कायदयाच्या अनेक कलमाचे उल्लंघन करणारा आहे. बीपीएमसी ॲक्टच्या अनेक कलमाचे उल्लंघन करणारा आहे. हा प्रस्ताव विखंडीत करावा अशाप्रकारची मागणी शासनाकडे पाठविली पाहिजे आणि यावर पुनर्विचार केला पाहिजे. नाहीतर कायदेशिर विपरीत परिणाम आपल्याला भोगावे लागतील. तरी तशाप्रकारची कार्यवाही प्रशासनाच्या वतीने करावी.

मा.महापौर :- एमआरटीपीचे कलम २३,३१,३७ आहे. २३ बरोबर आहे. नियोजीत डीपी असतो तो मंजूर डीपीला लागू होत नाही. ३१ लागू होत नाही, ३७ बरोबर आहे. ३७ प्रमाणे मॉडीफिकेशन केलेले जीबीने, शासनाने मान्य केलेले आहे. कलम ३७ प्रमाणे मॉडीफिकेशन प्रपोज करुन शासनाने मंजूरी दिलेली आहे त्याप्रमाणे आलेले आहे.

मा.शंकर जगताप :-मा.महापौर साहेब, पीपीपी संदर्भात माझे तीन प्रश्न असतील. अटि व शर्ती काय आहेत. सिटि सेंटर प्रकल्पातील उर्वरीत ५० टक्के क्षेत्र काय आहे व पीपीपी मध्ये महापालिकेचा आर्थिक फायदा काय होणार आहे हे सांगावे.

मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, सोन्यासारखी किंमत असलेली ही मोक्याची जागा आहे. शहराच्या दृष्टिने हा प्रकल्प यशस्वी झालातर शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. सर्व सभासदांच्या भावना अशा आहेत की मोठा प्रकल्प होत असताना वॉर्डातील कामाकडे दुर्लक्ष होणार आहे. यातून जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न आयुक्तांनी करावा. मागच्या काळातील आयुक्तांचे काम पाहिलेतर खर्चात बरीचशी काटकसर करुन पैसे वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू वॉर्डासाठी पैसे मिळत नाहीत. ही जागा विकत असताना शासनाचा दर ६५०० प्रति चौ.मी. आहे. याठिकाणी २० ते २५ हजार असा रेट यायला पाहिजे. याच्या जवळपास दर येणार असेलतर त्यास आमची मंजूरी असणार

आहे. रेडीरेकनरचा रेट ६५०० प्रति चौ.मी आहे. प्रचलीत बाजारभावाप्रमाणे उत्पन्न मिळणार असेलतर महापालिकेनी मंजूरी दयावी. आयुक्तांना पुर्ण अधिकार देण्याचे यात सांगीतले आहे. हे रेट येतील तेव्हा त्यावर चांगल्याप्रकारे चर्चा व्हावी म्हणजे सर्वाना समजेल की आपण चांगले रेट मिळविले आहेत. तरी यातून चांगला निधी महापालिकेला मिळावा.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, हा बहुचर्चीत विषय आहे शहराची ओळख संपुर्ण जगाला देणा-या विषयावर चर्चा होत आहे. महापालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल यासाठी कदाचित आयुक्तांना रात्रीची झोप सुध्दा येत नसेल. प्रत्येक सदस्याची मागणी आहे आमच्या वॉर्डातील काम थांबलेले आहे. एकिकडे पैशाची मागणी आहे आणि दुसरीकडे समोरुन येणा-या पैशाच्या बाबतीत चर्चा सुध्दा आहे. सध्याचा रेडिरेकनरचा रेट आम्हांला मान्य नाही. त्या जागेचा बाजारभाव बघितलातर निश्चितपणे दुप्पट,तीप्पट आहे. डिमार्ट संदर्भात आपल्याला अपेक्षीत सुध्दा नव्हते त्याचा चारपट रेट प्राप्त झाला आहे यातून सुध्दा तसेच होईल. याठिकाणी घाईने काम चाललेले आहे. पीपीपी ची मान्यता व्हायच्या अगोदर टेंडर सुध्दा फ्लोट झालेले आहे. निवीदेची तारीख काय आहे आणि त्यात आम्ही बदल सुचविलेतर निवीदेमध्ये दुरुस्ती करणार का. यामध्ये ग्लोबल टेंडर झालेले आहे का. त्याच्या शेजारी ॲटो क्लस्टरची जमिन आहे त्याठिकाणी मागच्या आयुक्तांनी भव्यदिव्य स्वप्न दाखविलेले होते. त्यांनी केंद्रशासनाकडून अनुदान मिळविले परंतु त्यातुन महापालिकेला किती फायदा झाला आहे. रिफंड किती मिळविला आहे. ॲटोक्लस्टरच्या कमिटिवर महापौर,माजी महापौर आहेत. तशी कमिटि सुध्दा सिटि सेंटरमध्ये करणार आहात का. चार ते पाच वर्षानंतर बांधकाम पुर्ण होणार आहे १०० कोटीचा पहिला हप्ता मिळणार आहे बजेटमध्ये तशी तरतूद आहे. पाच वर्षानंतरचा याचा बाजारभाव धरणार आहात का आजचा धरणार आहात याचा सुध्दा खुलासा व्हावा. ५० टक्के जागा कमर्शिअल असेल परंतु ५० टक्केमध्ये ऑफिसेस, उपहारगृह, हॉटेल असे आहे हे १०० टक्के कमर्शिअल केलेले आहे का याचा खुलासा करावा. ९९ वर्षाचे लीज करणार आहोत म्हणजेच विक्री करणार आहोत, त्यावेळेला तुम्ही आणि आम्ही पण नसणार. कर्जासाठी जागा गहाण ठेवतो त्यामुळे मनामध्ये शंकेची पाल चुकचुकते. आपण जे करतो त्यामध्ये अपारदर्शकता नको, पारदर्शकता पाहिजे. या निविदेमध्ये मनपाचे आर्थिक नुकसान होत असेलतर फेरनिवीदा आपण काढाव्यात.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, सभासदांनी त्यांच्या शंका व्यक्त केलेल्या आहेत. आपल्याला कल्पना आहे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न या वर्षा दोन वर्षामध्ये कमी होत गेलेले आहे. शर्मा साहेब या महापालिकेमध्ये आल्यानंतर त्यांनी पुर्वीचे रिझर्व्हेशन सायन्स पार्कचे होते त्यामधील ही जागा, तेथे सायन्सपार्क ऐवजी सिटि सेंटर प्रकल्प राबविलातर महापालिकेला चांगल्या

प्रकारचे उत्पन्न मिळेल अशाप्रकारची भूमिका सर्व नगरसेवकांपुढे, नेत्यांपुढे मांडली होती. त्यावेळी सर्वांनी होकार दिला होता. सभागृहाने मंजूरी दिल्यानंतर शासनाकडून रिझर्व्हेशन बदलले आहे आणि त्या विषयाचे अधिकार आयुक्तांना द्यावेत असा विषय सभागृहापुढे आलेला आहे. चुकिच्या पध्दतीने ही जागा कुठल्याही बिल्डरला जावू नये. यातून चांगले उत्पन्न महापालिकेला मिळावे याप्रकारची भूमिका सभासदांची आहे. यामध्ये नेमके आपल्या महापालिकेला किती उत्पन्न मिळणार आहे. रेडिरेकनरचा काही जरी रेट असलातरी बाजारभावाची किंमत खुप जास्त आहे. ती महापालिकेला मिळाली पाहिजे. एफएसआय किती अलाऊड करणार आहोत. आपण सध्या एक एफएसआय देतो. नवीन धोरण राबविण्याचे ठरविलेले आहे. १.८ एफएसआय देणार आहोत. या केसमध्ये नेमका किती एफएसआय त्याठिकाणी बिल्डरला वापरण्यास मिळणार आहे. आज १ एफएसआयने असेलतर नंतर १.८ एफएसआय होणार आहे त्यामुळे त्या जागेची किंमत जास्त होणार आहे. त्यामुळे यामध्ये काय कंडीशन्स ठेवल्या आहेत. कमर्शिअल किती अलाऊड आहे. ५० टक्के कमर्शिअल व ५० टक्के उर्वरीत आहेतर उर्वरीतचा खुलासा व्हावा. महापालिकेस चांगल्याप्रकारचे उत्पन्न मिळणार असेलतर विषय मंजूर करण्यास हरकत नाही. सगळयांचा खुलासा करावा नंतर विषय मंजूर करावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, एवढया मोठया प्रोजेक्टला माहितीपत्र कसे दिलेले आहे ते पहावे. याठिकाणी सगळी माहिती व्यवस्थित पँम्पलेटमध्ये द्यायला पाहिजे होती. यामध्ये सर्व डिटेल्स यायला पाहिजे होते, सर्व प्रेझेन्टेशन यायला पाहिजे होते. या प्रकल्पाची गरज आहे का. उर्वरीत क्षेत्र ५० टक्के आहे. उर्वरीत म्हणजे काय हे सांगावे. हफिज कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडून नकाशे तयार केलेले आहेत. रेडिरेकनरचा रेट ६५०० प्रति.चौ.मी. आहे. आमच्या ऐरियामध्ये रेसिडेन्सिअल मार्केट रेट तीन हजार स्क्वे.फुट आहे मग या कमर्शिअल परपजसाठी ६५०० प्रति.चौ.मी. कसा काय दर आहे. त्याच्या शेजारी डि-मार्ट आहे त्याचा रेट आपल्याला माहित आहे मग याठिकाणी ६५०० रेट का घेतला. यामध्ये ४०० ते ५०० कोटीचे नुकसान होणार आहे. रेडिरेकनर रेटप्रमाणे न जाता त्या ऐरियामध्ये जो रेट मिळेल तो रेट कन्सीडर करायला पाहिजे. पीपीपी म्हणजे काय आहे. फ्रि ऑफ चार्ज बांधकाम करुन घेणार का. भविष्यात मिळणा-या वाढीव एफएसआय द्वारे वाढीव रक्कम मिळणार असे टेंडरमध्ये मेनशन केलेले आहे का. बाकी एफएसआयला काय रेट असणार आहे. महापालिकेला नुकसान होऊ नये. ६५०० प्रति चौ.मी.हा रेट बरोबर नाही. शेजारचा रेट काय आहे तो धरुन टेंडर काढावे.

मा.डॉ.मीना पाटिल :- मा.महापौर साहेब, या सिटि सेंटरच्या विषयामध्ये यापुर्वी विज्ञानउद्यान,खुले नाटयगृह,पोहण्याचा तलाव व सायकल वेलोड्रम असे आरक्षण होते ते चेंज करुन हे आरक्षण भोसरीमध्ये टाकले आहे. आरक्षण टाकताना त्या

भागाच्या लोकसंख्येचा आणि लोकांच्या गरजेचा विचार करुन आरक्षण टाकतात. एवढा मोठा हा विषय असेलतर आणि त्यातून उत्पन्न मिळणार असेलतर मला वाटते येथील लोक भोसरीला पोहण्यासाठी किंवा नाटक बघण्यासाठी जातील. त्याठिकाणी जागा राखुन ठेवाव्यात त्यामुळे महापालिकेला उत्पन्नाचे स्तोत्र निर्माण होईल. ९९ वर्षाच्या करारनाम्यावर देणार असालतर ९९ वर्षे कायमस्वरुपी तेवढेच भाडे देणार आहेत का. आज तूरडाळीचा रेट सहा महिन्यात ४० रुपयावरुन ९० रुपयावर गेलेला आहे यामध्ये ९९ वर्षानी तोच रेट देणार आहेत का. ज्या लोकांच्या आरक्षणामध्ये जागा गेलेल्या आहेत त्यांचे मत जाणुन घ्यावे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहरातील अत्यंत महत्वकांक्षी आणि शहराला नावलौकीक मिळेल अशा प्रकल्पाचा विषय आलेला आहे, ब-याचशा लोकांच्या मनामध्ये त्याबद्यल शंका आहेत. बरेचसे लोक त्याबद्यल माहिती नसल्यामुळे संभ्रमावस्थेत आहेत परंतु महापालिकेची आर्थिक परिस्थिती सगळयांना माहिती आहे. वॉर्डामध्ये काम करण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत त्यामुळे आपण कर्ज घेत आहोत. यातून महापालिकेला उत्पन्नाचे स्तोत्र चालू होणार आहे, असे आरक्षण नक्कीच विकसीत झाले पाहिजे, असा चांगल्याप्रकारचा पायंडा महापालिकेनी संपूर्ण राज्याला दिला पाहिजे. मा.पवार साहेबांच्या संकल्पनेतून त्यांच्या नजरेतून हा प्रकल्प याठिकाणी उभा राहतो आहे. परंतू विश्वस्त म्हणून आम्ही काम करतो त्यामुळे शंका याठिकाणी मांडतो आहोत. जो आर्थिक फायदा होणार तो आर्थिक फायदा कायम राहणार का? ज्यावेळेला करारनामा करणार आहोत त्यानंतर किती वर्षे तेच उत्पन्न राहिल? रेडिरेकनर रेट बदललातर तसे वाढीव उत्पन्न होईल का? प्रकल्प होत असताना महापालिकेला जास्तीत जास्त उत्पन्न या प्रकल्पातून कसे वाढविता येईल याकडे सगळयांचे लक्ष आहे. राज्यातील एवढा मोठा प्रकल्प पहिलाच असावा. आपण हजार कोटीची जागा वापरण्यासाठी देणार आहोत. येरवडयामध्ये ईशान्य मॉल म्हणून आहे, त्याठिकाणी १०० टक्के कोणी म्हणणार नाही आपण भारतात आहोत म्हणून. १०० टक्के प्रायव्हेट मालक असणे आणि शासकीय जागेवर मालकी हक्क दाखविणे यामध्ये फरक आहे. परंतू तशाप्रकारे सुधारणा होईल असे करावे. त्याचा जो लेआऊट बनविला आहे.त्याच्यामध्ये चेंजेस करता येणार नाहीत असे आहे. त्याठिकाणी रिटेल आतमध्ये असेलतर तेथे कोणीच येणार नाही. त्याठिकाणी शेजारी डिमार्ट आहे, बीग बाजार आहे. याचा विचार तुम्ही केला नाहीतरी येणारे व्यावसायीक तो विचार करणार आहेत त्यामुळे तसा विचार आपण केला पाहिजे. त्यामुळे त्या लेआऊटमध्ये चेंजेस करण्याचे अधिकार त्याला दिलेतर तो काहीतरी चांगले पिंपरी चिंचवडसाठी करु शकेल. पुण्यातून सुध्दा लोक याठिकाणी यायला पाहिजेत. हा प्रकल्प मंजूर करावा. शंकेचे निरसन केले पाहिजे. प्रकल्पाला मंजूरी दयावी.

मा.महापौर :- आपण विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर प्रशासन देईल. ज्या प्रश्नांचा ऊहापोह झालेला नाही अशा नवीन सूचना असतीलतर त्या कराव्यात अन्यथा सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, पीपीपी तत्वावर सिटि सेंटरचा प्रकल्प आहे. वर्तमानपत्रामधून या विषयावर बराचसा ऊहापोह झालेला आहे. प्रसिध्दी माध्यम जनतेच्या शंका आमच्यासमोर मांडते. त्यामुळे प्रत्येक सदस्यांनी चर्चा करावी, चर्चेतून शंकेचे निरसन व्हावे यासाठी आपण संधी देतो हा चांगला पायंडा आहे. आपली शेकडो एकर जमिन पडून आहे. १९८६ साली महानगरपालिका आस्तित्वात आल्यानंतर अनेक सूचना आल्या. मोकळया जागेवर तालमी उभ्या राहिल्या आणि म्हणावा असा त्याचा उपयोग झालेला नाही ही वस्तुस्थिती तुम्हां-आम्हांला टाळून चालणार नाही. महापालिकेची आताची आर्थिक अवस्था पाहता किंवा भविष्यात येणारी परिस्थिती लक्षात घेता कुठेतरी आर्थिक स्तोत्र महापालिकेमध्ये निर्माण झाले पाहिजे या अनुषंगाने आपण हा जो पर्याय उचलला आहे तो स्वागतार्ह आहे. हे करत असताना टेंडर अगोदर काढले हा भाग आहे. ९९ वर्षाच्या करारनाम्यावर बिल्डरला किंवा संस्थेला जागा देतो आहोत. स्पर्धा निर्माण होईल,भाव चांगले येतील परंतू ती देत असताना आमचे अधिकार किती राहणार आहेत. ९९ वर्षाच्या करारनाम्यावर देत असालतर याच्यामध्ये महापालिकेची पार्टनरशिप असावी. जो काही इन्कम राहणार आहे त्यात ४० टक्के महापालिकेची पार्टनरशिप असावी. “म्हातारी मेल्याचे दु:ख नाही,परंतू काळ सोकावता कामा नये.” ९९ वर्षाच्या करारनाम्यावर सर्व जागा देऊन टाका. अशा ज्या ज्या जागा देणार आहात. त्याच्यामध्ये पार्टनरशिप असावी. यामध्ये चांगल्याप्रकारचे टेंडर येतील, चांगल्या कंपन्या येतील.

मा.बाबू नायर :- मा.महापौर साहेब, या विषयात मला दोन-तीन सूचना मांडायच्या आहेत. महापालिकेचे मोठमोठे प्रकल्प आपण राबवितो परंतू त्याचा उपयोग किंवा युटिलायझेशन व्यवस्थीत होत नाही म्हणून पीपीपीच्या माध्यमातून राबविण्याचा प्रयत्न आहे. यातून उत्पन्न मिळणार आहे. त्यासाठी फायनानशिअल कन्सलटंट नेमलातर महापालिकेला फायदा होईल, त्याच्यामार्फत प्रोजेक्ट रिपोर्ट बनवू शकाल का ते पहावे. त्याचे पॉईंट टेंडरमध्ये घातलेतर महापालिकेला जास्त उत्पन्न मिळेल. पाच वर्षे वगैरे असा आपण कालावधी ठरवितो. या कालावधीमध्ये बिझनेस सेंटर उभे राहिले नाहीतर अशा अटि व शर्ती त्यामध्ये घालू शकाल का? टाईमबॉण्ड प्रोग्राम मध्ये हा प्रकल्प उभा राहिल असे करावे.

मा.महापौर :- सर्व सन्मा.सदस्यांचे प्रश्न संपलेले आहेत. प्रोजेक्टबद्यल तूपे माहिती देतील. त्यातून समाधान झाले नाहीतर आयुक्त सांगतील.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, ४.११.०९ ला स्थायी समितीच्या मान्यतेकरिता मा.आयुक्त यांनी विषयपत्र ठेवले होते. त्या विषयपत्रानुसार स्थायी समितीने ठराव क्र.९६९२ दि.१०.११.२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. गेल्या महापालिका सभेमध्ये हा विषय मंजूरी करीता आलेला होता. मा.आयुक्त यांचे विषयपत्र वाचून दाखवितो. (मा.आयुक्त यांचे दि.४.११.०९ चे विषयपत्राचे वाचन केले.) हा विषय स्थायी समितीने मंजूर केल्यानंतर महापालिका सभेकडे शिफारस केलेली आहे. मनपाचा ठराव क्र.७३६ दि. २०.११.०९ अन्वये हा विषय तहकूब केला होता. निवीदा विक्रीची मुदत २८ डिसेंबर पर्यंत ठेवण्यात आलेली आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, पेपरला १६.८.०९ ते २५.९.०९ असे आहे. मग २८ डिसेंबर कधी झालेले आहे.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, आपण जाहिरात दिल्यानंतर तीन मिटिंग झाल्या त्यानुसार वेळावेळी तारखा वाढविण्यात आलेल्या आहेत.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, २८.१२.०९ हे पेपरला दिलेले होते का.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब,पेपरला दिलेले नव्हते, वेबसाईटला दिलेले होते.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, पेपरला नियमाप्रमाणे जाहिरात द्यायला पाहिजे होती.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, आपण देशपातळीवर जाहिरात दिलेली आहे आणि चांगला प्रतीसाद मिळालेला आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, पेपरला जाहिरात दिली ती दि.२५.९.०९ अशी आहे. मग २८.१२.०९ अशी वाढविलेली आहे ते पेपरला का दिलेले नाही. यामध्ये ठरावीक पार्टिला द्यायचे होते अशी शंका येते. पेपरला का दिलेले नाही याचा खुलासा करावा.

मा.महापौर :- अमर मुलचंदानी यांचे म्हणणे बरोबर आहे. एवढे मोठे काम असताना पेपरला द्यायला पाहिजे होते. आता आम्ही दुरुस्ती सूचवु किंवा अटि चेंजेस करु. सदस्यांच्या सूचना लक्षात घेवून वेबसाईटवर किंवा वर्तमानपत्रामध्ये शुध्दीपत्र पब्लिश करावे. दुरुस्त्या करुन आठ दिवसात हे करावे. अमर मुलचंदानी यांनी शंका काढली ती दुरुस्ती करायचे ठरलेले आहे.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, या प्रकल्पामध्ये महापालिका गूंतवणूक करणार नाही. त्यांनी सुरवातीला कमीत कमी पहिला हप्ता ५० कोटी आहे. ३१ मार्च २०१० पर्यंत कमीत कमी ५० कोटी महापालिकेला द्यायचे आहेत व उर्वरीत रक्कम २०१४ पर्यंत द्यायची आहे. प्रकल्प पुर्ण करण्यासाठी पाच वर्षांचा कालावधी लागणार आहे.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, परसेन्टेज द्यायला पाहिजे, तसे असेलतर करा नसता परत जाहिरात द्या.पार्टनरशीपचा अर्थ काय आहे हे सांगावे.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, पीपीपी यामध्ये कुठल्याहीप्रकारची मनपा आर्थिक गूंतवणूक करणार नसून डेव्हलपर स्वत: डेव्हलप करणार आहे. आपला जो कन्सेप्ट असेल त्या धर्तीवर तो करणार आहे. डेव्हलपर गूंतवणूक करणार आहे महापालिका करणार नाही.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, पीपीपी याचा अर्थ असा की या केसमध्ये रिझर्व्हेशन आमचे आहे. त्याचे डिझाईन आम्ही फायनल केलेले आहे. पब्लिक परपजसाठी सिटि सेंटरसाठीचे त्यांनी त्यामध्ये गूंतवणूक करुन स्ट्रक्चर उभे करायचे आहे. पाच हप्त्यांमध्ये आपण पैसे घेतो आहोत. आपल्याला मार्च पर्यंत जास्तीत जास्त पैसे मिळतील. ते आपण मान्य करायला पाहिजे. आम्ही रेडीरकनरचा रेट दिलेला आहे.सभागृहाला माहिती व्हावी म्हणून तो रेट दिला आहे. पार्टनरशीप करण्यामध्ये मे.क्रिसिल यांनी सुध्दा सांगीतलेले आहे. कंपनी ओपन करुन आपण पार्टनरशीप करु शकतो परंतू त्यामध्ये आपले नुकसान आहे. आपल्याला दोन-तीन वर्षात पैशाची गरज आहे त्यामुळे जेवढे जास्त पैसे आता मिळतील ते घ्यायला पाहिजेत. ॲसेट सुध्दा बांधुन घ्यायची आहे. आपण गाळे बांधतो परंतु त्याची रिकव्हरी नंतर होत नाही. आपण जास्तीत जास्त पेमेंट याच घेतो आहोत. आपण तशाप्रकारचे टेंडर काढलेले आहे.

मा.भीमा बोबडे :- मा.महापौर साहेब, आपण पाच लाखाचे टेंडर पेपरला देतो मग एवढया मोठया कामाची जाहिरात पेपरला द्यायला पाहिजे होती. माझ्या वॉर्डामध्ये आडीच वर्षे झाले झोपडपट्टी काढून पत्राशेडमध्ये टाकलेले आहे. पाच लाखाचे काम आहे त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे होती. परंतु तसे करता येत नाही असे आम्हांला सांगीतले जाते. त्याठिकाणी दोन मुले सुध्दा गटारात पडली आहेत. पाच लाखासाठी त्याठिकाणची आम्हांला परवानगी घ्यावी लागते. मग एवढा मोठा विषय आहे तरी पेपरमध्ये का दिलेले नाही. तीन महिन्यामध्ये झोपडपट्टीसाठी बिल्डींग तयार होणार होती ती अजून झालेली नाही.

मा.महापौर :- बोबडेसाहेब आपण दुरुस्ती सुचविणार आहोत परत त्यासाठी वेळ देणार आहोत.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, आपला कन्सेप्ट पीपीपी असा आहे. जर आपण हे संपुर्ण ९९ वर्षासाठी एखादया संस्थेला विकणार असूतर याठिकाणी पार्टनरशीप कशी होऊ शकते. याठिकाणी पार्टनरशीप नाहीतर ही सरळ विक्री आहे. आपण जागा विक्री करतो आहोत. पार्टनरशीप याचा अर्थ काय आहे. पार्टनरशीपचा अर्थ आम्हांला समजलेला नाही, तुम्ही सरळ सरळ विकता आहात. सभासदाना माहितीपत्रक व्यवस्थितरित्या द्यायला पाहिजे होते ते दिलेले नाही. मी आभार मानतो की चर्चेसाठीतरी वेळ दिलेला आहे.

मा.तुकाराम भोंडवे :- मा.महापौर साहेब,महापालिकेला किती रक्कमेचे हप्ते देणार आहेत.

मा.महापौर :- समोरचा माणूस किती कोट करणार आहे हे माहित नाही. समोरचा माणुस १०० कोटी किमान देणार अशी कंडीशन ठेवलेली आहे.

मा.तुकाराम भोंडवे :- मा.महापौर साहेब, याच्यामध्ये तसे क्लिअर नाही. आपण पैशाची मागणी किती केली आहे, ती जागा ५०० कोटीची आहे.

मा.महापौर :- काम करण्यासाठी पाच वर्षे दिलेले आहेत. त्याठिकाणी काय करायचे हे आपण ठरविलेले आहे. कंडीशन आपण घालतो आहोत. उदया ८०० कोटी येऊ शकतात. त्यांनी पहिल्या टप्प्यात किमान १०० कोटी द्यायचे आहेत.

मा.तुकाराम भोंडवे :- मा.महापौर साहेब, मुळामध्ये आपल्या जागेची किमंत किती आहे. “आंधळ दळत आणि कुत्र पिठ खात” हे बरोबर नाही. सभागृहात चुकिचे काम चाललेले आहे.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रकल्प आहेत म्हणून हे करायचे आहे. माझे म्हणणे आहे की, यात परसेन्टेज ठरवा त्याशिवाय हा ठराव मंजूर करु नये, त्यास आमचा विरोध आहे.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, लीजचा अर्थ समजावून सांगावा.

मा.एकनाथ मोटे :- मा.महापौर साहेब, ९९ वर्षाच्या भाडयाने देणार आहोत तर मग उत्पन्न दरमहा मिळणार आहे का. ९९ वर्षाचे एकदम मिळणार आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, याठिकाणी पीपीपी याचा अर्थ अनेक सदस्यांनी विचारलेला आहे. आयुक्तांनी पीपीपी संदर्भात अजून स्पष्टीकरण दिलेले नाही. महापालिकेचा त्यावर काही अधिकार असावा,महापालिकेचे काही

परसेन्टेज असावे. आयुक्त साहेबांनी सांगीतलेले आहे हा प्रकल्प होत असताना महापालिकेचे कुठलेही पैसे न जाता हा प्रकल्प त्याठिकाणी उभारला जाणार आहे. त्या बदल्यात महापालिकेला जास्तीत जास्त रक्कम कशी मिळेल अशाप्रकारचा प्रयत्न आपला असणार आहे. मी आपल्या लक्षात आणतो आपण जरी त्या प्रकल्पावर कुठलेही पैसे लावले नाही तरी त्याठिकाणी सोन्याचा बाजारभाव असलेली ती जागा महापालिकेची आहे हे आपण विसरतो आहोत. त्यामुळे संबंधीत विकसकानी महापालिकेला पार्टनरशीपमध्ये घेतलेतर काय होणार आहे. त्याठिकाणी डेव्हलपरने आपली जागा घेतली, प्रकल्प उभा केला व त्याठिकाणी टिडीआर चढवलातर तो काय नफा कमावणार आहे हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, पीपीपीचा अर्थ पब्लिक प्रायव्हेट पार्टीसिपेशन आहे. आपण पार्टनरशीप केलीतर आपल्याला लाभ मिळणार नाही, लॉस होईल. एमआरटीपीमधील सेक्शन ३७ प्रमाणे हे केलेले आहे. २३ व २७ प्रमाणे मॉडीफिकेशनमध्ये जात नाही. आपण कंडीशन टाकलेल्या आहेत. आपण कंपनीमार्फत सर्व्हे केलेला आहे. त्यांनी ५० टक्के मध्ये व्यापारी व ५० टक्केमध्ये उर्वरीत असे केलेले आहे. त्यामध्ये आमचे डिझाईन्स देतो आहोत. त्यामध्ये जसे डेव्हलप करायचे तसे करा असे आहे. आपण मोकळा प्लॉट देत नाहीतर शहरासाठी उपयूक्त डिझाईन्स देतो आहोत. त्याप्रमाणे बिल्डर्सकडून बांधतो आहोत. एक एफएसआय देतो आहोत. जास्त एफएसआय मिळालातर त्यांनी रेव्हेन्यू सुध्दा जास्त द्यायचा आहे. एफएसआय वाढलातर रेव्हेन्यू मध्ये वाढ करायला पाहिजे. त्यामध्ये पाच हप्ते आहेत. कमीत कमी ५० कोटी पहिला हप्ता आहे व त्यानंतर ३१ मार्च २०१० पर्यंत कमीत कमी ५० कोटी आहेत.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, पार्टनरशीपचा खुलासा होत नाही. महापालिका पार्टनरशीप करु शकते का आणि करायची तर कशी करायची. आपण ९९ वर्षासाठी जागा देतो आहोत. परंतु प्रत्येक वर्षाला ते किती पैसे महापालिकेला देणार आहेत. एफएसआय किती मिळणार आहे, १५ लाख स्क्वे.फुट जागा आहे.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, हफिज कॉन्ट्रॅक्टर यांनी डिझाईन्स दिलेले आहेत. त्याच्यामध्ये उपहारगृह,करमणूक केंद्र,व्यापारी गाळे,बहुउद्येशीय हॉल, वाहनतळ इ. प्रकारच्या सुविधा करण्यात येणार आहेत. त्यामध्ये हॉटेल काढलेतर दोन एफएसआय मिळणार आहे. आयटीसाठी काढलेतर वाढीव एफएसआय मिळणार आहे. वाढीव एफएसआयची परवानगी मिळालीतर त्यांना जास्त प्रिमिअम द्यावा लागणार आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, आपण दोन एफएसआय देणार आहोत. एक एफएसआयने १५ लाख स्क्वे.फुट होते यासाठी सील प्राईज ठरवावी. ३ हजार रेट ठरवा.

मा.महापौर :- आपल्याला रेडिरेकनरचा रेट कोट करावा लागतो. त्याचा रेट ४००० सुध्दा मिळू शकतो. त्याठिकाणी दोन,आडीच,तीन हजार रेट आहे हे आपल्याला माहित आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, हे मंजूर करुन परत हे रेटस् आमच्या समोर येऊ द्यावेत.

मा.महापौर :- फायनानशिअल मंजूरीसाठी विषय सभागृहासमोर येत नसतो. हे अधिकार स्थायी समितीला आहेत. पुन्हा जीबीला आणण्याची प्रथा नाही. टेक्निकल सजेशन आपण कराव्यात. महापालिकेला जास्तीत जास्त पैसे कोण देणार हे बघणार आहोत. हा विषय स्थायी समितीला जाणार आहे. लीजचे अधिकार स्थायी समितीला आहेत. आयुक्तांना तो अधिकार नाही. तुम्ही सांगीतलेल्या दुरुस्त्या धरुन, शुध्दीपत्र काढून, १५ दिवसांची मुदत देवून महापालिकेला जास्तीत जास्त फायदा होईल आणि आपल्याला योग्य वाटलेतर हे होईल.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, आपण सबलीज करणार का.

मा.तूपे :- मा.महापौर साहेब, डेव्हलपर बरोबर लीजडीड करणार आहोत. त्याला सबलीज करण्याकरीता परवानगी देणार आहोत.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, सबलीजला आम्ही मान्यता देणार नाही. मार्केटप्राईजप्रमाणे असेलतर आम्ही हो म्हणणार आहोत. वार्षिक इन्कम किती आहे आणि सबलीज करणार का हे सांगावे.

मा.महापौर :- सबलीजलासुध्दा कन्डीशन असणार आहेत. सबलीज केलेतर डेव्हलपरला पैसे मिळतील.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, महापालिकेबरोबर त्यांनी सबलीज केले पाहिजे, त्यांनी डेव्हलपरकडून केलेतर विषयच संपतो. महापालिकेशी सबलीजसाठी अॅग्रीमेंट करायला पाहिजे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी आयुक्तांना नक्कीच सांगेल की तूमचे विचार चांगले आहेत. त्यावेळेला सायन्स पार्क करणार होतो. खुर्ची बदलली की आयडीया बदलतात. सायन्स पार्क सुध्दा शहराच्या दृष्टिकोनातून तीतकाच आवश्यक आहे. त्याची सिटि सर्व्हेमधुन जागा बाजूला काढू नका हे सांगीतलेले होते. हे स्टॉल सायन्स सेंटरमध्ये सुध्दा होतात. आपण म्हणालात त्यासाठी खर्च येणार नाही. एमआयडीसी आणि प्राधिकरण यांनी सुध्दा लीजची वर्षे कमी केलेली आहेत. ६० वर्षे आणि ७५ वर्षे केलेले आहे. यामध्ये आपण ९९ वर्षाचे लीज टाकतो आहोत. आपल्या तीन पिढयांना यामध्ये काहीही करता येणार नाही. लीजमध्ये ९९ वर्षाऐवजी कमी करता येतील का. पीपीपीवर असलेतरी त्यामधील लीजचे वर्षे कमी करता येतील. नंतरतरी सायन्सपार्कला जोडून तो प्रकल्प करता येईल. निव्वळ ९९ वर्षाचे लीज असेलतर ५ हजार कोटी आलेतरी ही जमीन विकणार असा अर्थ हातो. सबलीज म्हणलेतर प्रत्येकजण विक्री करणार त्यामुळे त्याला सुध्दा परवडणार नाही व घेणारा माणूस सुध्दा घेणार नाही. तरी यात सरळ सरळ या जागेची विक्री आहे. त्यामध्ये ६० किंवा ७५ वर्षाचे लीज करावे.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, आताच सांगीतले आपल्यावर कर्ज झालेले असल्यामुळे पीपीपी तत्वावर देत आहोत. जेवढया मोठमोठया जागा आहेत त्या विकसकांना आपण दिलेल्या आहेत. त्यापासून आपल्याला पाहिजे त्या फॅसीलीटी मिळाल्या नाहीत. ज्या शेतक-यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्यातील काही हिस्सा त्या गरीब शेतक-यांना देणार का. सबलीज आणि लीज करणार आहोत. विकसक आरक्षणाच्या अनुषंगाने तरतूदीनुसार करणार असलातरी विकसकाने सदरील प्रकल्पावर वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळविणे व संभाव्य ग्राहकांचे नावे सबलिज करणेस परवानगी देणेस व याशिवाय इतर अटी,शर्ती व तपशिल ठरविण्यास तो मान्य करण्यास व त्याप्रमाणे अंतिम करारनामा करण्यास अधिकार प्रदान करणार आहोत. महापौर साहेब, आपण ज्यावेळेला महापौर नव्हता त्यावेळेला विषय सभागृहासमोर आलेला होता. विषयाची डाक्यूमेंटस सर्व नगरसेवकांना पाठविण्यात यावीत. आम्हांला फक्त अर्ध्या पानाचे पत्र मिळाले आहे. सदस्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. सविस्तर विषय आणलातर चांगले होईल.

मा.महापौर :- मागच्या वेळेस अभ्यास करण्यासाठी एक महिना विषय तहकूब केला होता. पावणेतीन तास चर्चा चालू आहे. विषय मंजूर करायचा का नाही हे तुम्हीच ठरवायचे आहे. त्यात काय दुरुस्ती करायची आहे ते आपण सांगायचे आहे. आपल्याला या विषयावर निर्णय घ्यायचा आहे.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब, आपण त्यावेळेला महापौरांच्या खुर्चीवर बसलेला नव्हता. आपण सुद्धा त्यावेळेला मागणी केलेली होती. आम्हांला माहितीपत्रक घरी मिळायला पाहिजे होते. दहा ओळीचे डॉकेट आहे त्यावर ५०० कोटीच्या विषयाला मंजूरी देणार का. ही जागा विकतो आहोत. एखादे धोरण ठरवायचे असेलतर आमचा विरोध नाही परंतू व्यवस्थीत माहिती मिळणार नसेलतर विरोध होणार आहे. मा.आयुक्तांनी सर्व सदस्यांना विश्वासात घेवुन सर्व माहिती दयावी. जो विषय मांडलेला आहे तो चुकिचा आहे. १०५ लोकांचा हा अपमान आहे. बहुमताने निर्णय घेणार असालतर आम्ही न्यायालयात जाऊ.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, बराच वेळ आपण या विषयावर चर्चा करतो आहोत. आयुक्त साहेबांनी शहराच्या सौंदर्यात भर पडेल असा विषय ठेवलेला आहे. अत्यंत चांगला विषय आहे. त्याठिकाणी मोकळी जागा पडलीतर काहीही अतिक्रमण होईल. हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो -

ठरावात "व त्यामुळे मनपास आर्थिक उत्पन्न मिळणार असल्याने नियोजीत विकसकांबरोबर डेव्हलपमेंट अग्रीमेंट व लिज डिड करणे आवश्यक आहे. विकसकाने सदरील प्रकल्पावर वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य मिळविणे व संभाव्य ग्राहकांचे नावे सबलिज करणेस परवानगी देणेस व याशिवाय इतर अटी, शर्ती व तपशिल ठरविण्यास तो मान्य करण्यास व त्याप्रमाणे अंतिम करारनामे करण्यास मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे." याऐवजी "विकसकास सदरील प्रकल्पांतर्गत केलेल्या बांधकामावर वित्तीय संस्थांकडुन आर्थिक सहाय्य मिळविण्यास तसेच संभाव्य ग्राहकांच्या नावे सबलिज करण्यास परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे", अशी दुरुस्ती करणेत यावी.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, उपसुचनेस अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला आमचा विरोध आहे. मुळ विषयाला आम्ही मान्यता द्यायला तयार आहोत. शुध्दीपत्र काढा. आयुक्तांचे अधिकार कशाला काढता. आयुक्तांना अधिकार आहेत ते करतील. लीज वगैरे ते नियमाप्रमाणे करतील नाहीतर दुरुस्ती करुन परत जीबीला विषय येऊ दयावा. मुळ विषय मंजूर करा. त्यात कंडीशन्स टाका. आम्ही विषय मंजूर करु.

उपसूचनेला आमची मंजूरी नाही. शुध्दीपत्र काढून मुळ विषय दुरुस्ती करुन मंजूर करावा.

मा.महापौर :- अमर मुलचंदानी आपण सांगीतल्याप्रमाणे शुध्दीपत्र काढून विषय मंजूर करु. त्यासाठी दहा-पंधरा दिवस मुदत दया.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, मुळ विषयावर आम्ही चर्चा केली आहे. त्या कंडीशन्स टाकाव्यात. सबलीज करणार नाहीत. रेडिरेकनरचा रेट ६५०० टाकलेला आहे तो आम्हांला मान्य नाही. यात मिनिमम रेट टाकलाच पाहिजे.

मा.महापौर :- तुम्ही तीन हजार रेट टाकला आणि पाच हजार रेट आलातर काय करणार.

मा.अमर मुलचंदानी :- मिनिमम रेट टाकावा त्यामुळे काय नुकसान होणार आहे. तुम्ही मिनिमम तीन हजार रेट का टाकत नाहीत.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय मंजूर करावा.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, रेडीरेकनर पेक्षा जास्त रेट ठरवा. मिनिमम तीन हजार रेट टाकला पाहिजे. नाहीतर माझा विरोध नोंदवावा. महापालिकेचे नुकसान झाले नाही पाहिजे. मिनिमम रेट तीन हजार टाकला पाहिजे, तीन हजार रेट नाही आलातर परत टेंडर काढा.

मा.महापौर :- तूमचे म्हणणे नोंद केलेले आहे. महापालिकेचे नुकसान होणार नाही याची दखल घेवूनच निर्णय घेण्यात येईल.

मा.अमर मुलचंदानी :- मिनिमम रेट तीन हजार का टाकत नाहीत तो टाकला पाहिजे.

मा.भीमा बोबडे :- मा.महापौर साहेब, आपण गेली तीन तास या विषयावर भांडतो आहोत. आयुक्तांनी चार-पाच वेळा समजून सांगीतले आहे त्यात तीन हजार रेट टाकलातर काहीही म्हणणे नाही. तीन हजार रेट का टाकत नाहीत. तो किमान रेट आहे. सर्व गटनेत्यांची मिटिंग घेतली असे तुम्ही म्हणाला. त्याठिकाणी काय झाले ते सभागृहात का सांगत नाहीत.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, सर्वांची मानसीक तयारी झालेली आहे. हा विषय मंजूर करायचा आहे. ९९ वर्षाचा करारनामा करुन जागा देतो आहोत म्हणजे सरळ सरळ जागा विकतो आहोत. पीपीपी हे लावायची गरज नव्हती. सरळ विषय आणायचा होता. राज्यशासनाकडे विषय पाठविला होता. त्याला शासनाने मान्यता दिली आहे. आपण टेंडर अगोदरच पब्लिश केलेले आहे. टेंडर अगोदर काढल्यानंतर मान्यता घेतो आहोत. प्रशासनाची चुक झालेली आहे. तुम्ही सरळ सांगावे अशी अशी जागा या या कारणासाठी देणार आहोत व त्याची एवढी एवढी किमंत आहे. या प्रोजेक्टवर सायन्स सेंटर करायचे होते त्याठिकाणी हा प्रोजेक्ट करणार आहात, हॉटेल करणार आहात.शहराचे नागरीक त्याठिकाणी गेल्यानंतर त्यांना पैसे मोजावे लागणार आहेत. सबलीज वगैरे होणार आहे. नागरीकांना त्या सुविधांचा लाभ घ्यायचा असेलतर त्यांना पैसे मोजावे लागतील. आपली आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली आहे. आपण ही जागा विकतो आहोत. भविष्यकाळात अशी परिस्थिती येऊ नये की ही महापालिकेची जागा सुध्दा आपल्याला द्यावी लागेल. विषयात दुरुस्ती करुन विषय मंजूर करावा. यात २० टक्के लोक बिल्डर्स आहेत सगळयांना माहित आहे. आपण जास्तीत जास्त पैसे कसे मिळविता येतील हे बघणार आहोत. राज्यशासनाने सुध्दा या जागेचा रेट ठरविलेला आहे.

मा.महापौर :- धारीया तुमची मस्टरवर सही नाही,तुम्ही याठिकाणी बोलता आहात. तुंम्ही मस्टरवर सही करावी.

मा.रामअधार धारीया :- मी सही करुन जाणार आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे बीपीएमसी ॲक्टप्रमाणे आरक्षण फेरबदल, स्थलांतर हे कायदेशिर आहे किंवा नाही याचे स्पष्टीकरण मिळालेले नाही. तुम्ही मताला विषय टाकता आहात. जे सदस्य ठरावाप्रमाणे मत देतील त्यांचे नाव व जे ठरावाच्या विरोधात मत देतील त्यांचे नाव आले पाहिजे.

मा.महापौर :- कायदयामध्ये तशी प्रोव्हीजन नाही. संख्या मोजली जाते.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, उदया मी विरोध नोंदविला आणि काळूराम पवार म्हणाले मी सुध्दा विरोध नोंदविलातर कोणाचा विरोध धरणार आहात.

(गोंधळ)

मा.मारुती भापकर :-  मा.महापौर साहेब, नावानिशी विरोध नोंदवावा.

मा.महापौर :- कायदयाची प्रोव्हीजन बघा.

(गोंधळ)

मा.महापौर :- कायदयाची प्रोव्हीजन नगरसचिव सांगतील.

(गोंधळ)

(मा.नगरसचिव यांनी नियम तरतूदीचे वाचन केले)

(गोंधळ)

मा.महापौर :- बोबडे आपण जे कृत्य केलेले आहे ते आपल्याला न शोभणारे आहे. दडपशाहीने विषय रेटत नेला असतातर तुमचे हे कृत्य करणे योग्य होते. तुम्हांला बोलायला न देता हा विषय रेटत नेला असतातर तुम्ही केलेले कृत्य शोभले असते. याठिकाणी दडपशाही चालणार नाही आणि चालू दिली जाणार नाही.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-७४० विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ/३४२/२००९ दि.४/११/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९६९२ दिनांक १०.११.२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३६ दि.२०/११/२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मुंबई-पुणे हमरस्त्यानजीक असलेल्या चिंचवड येथील म.न.पा.च्या आरक्षित जागेत प्रादेशिक विज्ञान केंद्र (Regional Science Centre) आणि 'पी पी पी' (Public Private Partnership) तत्वावर सिटी सेंटर/बिझनेस सेंटर प्रकल्प विकसित करण्याचे प्रयोजन आहे. या प्रकल्पाचे फेरबदलास महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र./टिपीएस/१८०९/७२/ प्र.क्र.१६०१/०९/नवि१३/२२-५-०९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत १८१ड प्रमाणे १३७०३९.४६ चौमी क्षेत्र बिझनेस सेंटर करीता आरक्षित आहे. तसेच १८१ब प्रमाणे ३०००० चौमी क्षेत्र प्रादेशिक विज्ञान केंद्र

प्रकल्पासाठी आरक्षित असून ते एन.सी.एस.एम., कोलकत्ता, केंद्र सरकार आणि म.न.पा.च्या सहकार्याने बांधण्यात येणार आहे. सिटी सेंटर / बिझनेस सेंटर प्रकल्प 'पी पी पी' (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) या तत्वावर मनपाची कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता ९९ वर्षांच्या कालावधीकरीता राबविण्याचे ठरत असल्याने विकसकास सदरील प्रकल्पांतर्गत केलेल्या बांधकामावर वित्तीय संस्थाकडुन आर्थिक सहाय्य मिळविण्यास तसेच संभाव्य ग्राहकांच्या नावे सबलिज करण्यास परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल:- ५६ प्रतिकूल - ४

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक कर/मुख्य/६/कावि/७२५/०९ दि.६/११/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९७२८ दिनांक १७.११.२००९

"१)पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिक वा त्याची पत्नी हयात असेपर्यंत पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिकांना वा त्याच्या पत्नीच्या नावे असलेल्या त्यांच्या राहत्या घराच्या चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील मालमत्ता करातील सामान्य करात १००% सुट दि.१/४/०९ पासून लागू राहील. २)माजी सैनिकांच्या बिगर निवासी वापरासाठी असलेल्या मालमत्तेवरील मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय असणार नाही. ३)१५०० चौ.फुट अथवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे रहाते घरात अशी सुट अनुज्ञेय राहील. ४)या सवलतीचा फायदा घेण्यासाठी पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिकांनी वा त्यांच्या पत्नी यांना दरवर्षी हयात असल्याचा दाखला सादर करावा लागेल. ५)तसेच सदरची सवलत ही फक्त त्याच्या एकाच राहत्या निवासी घरासाठी लागू असेल. तसेच माजी सैनिक वा त्याच्या पत्नी यांनी अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नाहीत असे हमीपत्र सादर करावे लागेल. ६)पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिक वा त्यांच्या पत्नीला मालमत्ता करात सवलत देण्यात येणार असल्याने माजी सैनिकांना डिस्चार्ज सर्टिफिकेट तसेच पेन्शन पेमेंट ऑर्डर आणि ओळखपत्र ही कागदपत्रे महापालिकेकडे सादर करावी लागतील.७)ज्या माजी सैनिकांना पेन्शन अनुज्ञेय आहे अशाच माजी सैनिकांना

मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय राहील" या प्रमाणे माजी सैनिकांचे राहत्या निवासी घरात सामान्य करात सुट देणेबाबतचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

"१) ठरावातील कर सवलत अटी व्यतिरिक्त ज्या माजी सैनिकांना पेन्शन लागू नाही, परंतु ज्यांनी सन १९६५ किंवा १९७१ च्या युध्दात लढाऊ सैनिक (Combatant Person) म्हणून थेट युध्दात भाग घेऊन देशसेवा केली आहे व त्यांना (Release) रिलिज अथवा (Discharge) डिसचार्ज सन्मानाने सेवेतुन मुक्त केले आहे. अशा माजी सैनिकांना देखील सदर सवलत लागू राहील. २) १५०० चौ.फुटाची सवलत २००० चौ.फुट पर्यंत वाढवावी तसेच जे माजी सैनिक वरील अटी व शर्तीनुसार सवलतीस पात्र आहेत, परंतु ज्यांची मिळकत २००० चौ.फुटापेक्षा जास्त आहे अशा माजी सैनिकांना २००० चौ.फुट पर्यंत सर्वांच्या प्रमाणे पुर्ण सुट देण्यात यावी व त्या पुढील / अधिक चौ.फुट मिळकतीवर पालिका नियमाप्रमाणे कर आकारण्यात यावा", याप्रमाणे दुरुस्ती करुन त्यादुरुस्तीप्रमाणे मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब,उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसूभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, हा चांगला विषय आहे, या विषयाला विरोध नाही. आज ठराव पास केल्यानंतर आजच्या कालावधीनंतर जो माजी सैनिक याठिकाणी राहण्यासाठी येईल त्याला सुध्दा ही सवलत लागू राहिल का.

मा.महापौर :- लागू राहील.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७४१ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
कर/मुख्य/६/कावि/७२५/०९ दि.६/११/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९७२८ दिनांक
१७.११.२००९

"१)पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिक वा त्याची पत्नी हयात असेपर्यंत पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिकांना वा त्याच्या पत्नीच्या नावे असलेल्या त्यांच्या राहत्या घराच्या चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील मालमत्ता करातील सामान्य करात १००% सुट दि.१/४/०९ पासून लागू राहील. २)माजी सैनिकांच्या बिगर निवासी वापरासाठी असलेल्या मालमत्तेवरील मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय असणार नाही. ३)१५०० चौ.फुट अथवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळाचे रहाते घरात अशी सुट अनुज्ञेय राहील. ४)या सवलतीचा फायदा घेण्यासाठी पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिकांनी वा त्यांच्या पत्नी यांना दरवर्षी हयात असल्याचा दाखला सादर करावा लागेल. ५)तसेच सदरची सवलत ही फक्त त्याच्या एकाच राहत्या निवासी घरासाठी लागू असेल. तसेच माजी सैनिक वा त्याच्या पत्नी यांनी अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नाहीत असे हमीपत्र सादर करावे लागेल. ६)पिंचिंमनपा क्षेत्रातील माजी सैनिक वा त्यांच्या पत्नीला मालमत्ता करात सवलत देण्यात येणार असल्याने माजी सैनिकांना डिस्चार्ज सर्टिफिकेट तसेच पेन्शन पेमेंट ऑर्डर आणि ओळखपत्र ही कागदपत्रे महापालिकेकडे सादर करावी लागतील.७)ज्या माजी सैनिकांना पेन्शन अनुज्ञेय आहे अशाच माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत  अनुज्ञेय राहील" या प्रमाणे माजी सैनिकांचे राहत्या निवासी घरात सामान्य करात सुट देणेबाबतचे धोरणास मान्यता देणेत यावी अशी शिफारस करणेत आली आहे त्याप्रमाणे त्यास त्यामध्ये "१) ठरावातील कर सवलत अटी व्यतिरिक्त ज्या माजी सैनिकांना पेन्शन लागू नाही, परंतु ज्यांनी सन १९६५ किंवा १९७१ च्या युध्दात लढाऊ सैनिक (Combatant Person) म्हणून थेट युध्दात भाग घेऊन देशसेवा केली आहे व त्यांना (Release) रिलिज अथवा (Discharge) डिसचार्ज सन्मानाने सेवेतुन मुक्त केले आहे. अशा माजी सैनिकांना देखील सदर सवलत लागू राहील. २) १५०० चौ.फुटाची सवलत २००० चौ.फुट पर्यंत वाढवावी तसेच जे माजी सैनिक वरील अटी व शर्तीनुसार सवलतीस पात्र आहेत, परंतु ज्यांची मिळकत २००० चौ.फुटापेक्षा जास्त आहे अशा माजी सैनिकांना २००० चौ.फुट पर्यंत सर्वांच्या प्रमाणे पुर्ण सुट देण्यात यावी व त्या पुढील / अधिक चौ.फुट मिळकतीवर पालिका नियमाप्रमाणे कर आकारण्यात यावा", याप्रमाणे दुरुस्ती करुन त्यादुरुस्तीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.शिक्षण मंडळ ठराव क्र.४७६ दि.२७.८.२००९
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा /६/कावि/२२९१/०९ दि.९/११/२००९
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९७३९ दिनांक १७.११.२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रकाचा [र.रु.६८,००,७९,०००/-] व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाचा [र.रु.७२,३३,९८,०००/-] खालील प्रमाणेच्या तपशिलाचा मान्यतेसाठीचा मा.शिक्षण मंडळाचा ठराव अवलोकन केला.

## सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ० | १ | स्थायी आस्थापना | ४१,८४,२०,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,८६,०००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २४,३०,९२,०००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,०५,७९,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४३,६४,०१,०००/- | ४ | कार्यालय खर्च | १,०२,३०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १५,५१,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | १,८७,५०,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १०,००,०००/- |
| | | | ८ | अखेरची शिल्लक | ० |
| | एकूण जमा | ६८,००,७९,०००/- | | एकूण खर्च | ६८,००,७९,०००/- |

## सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ०/- | १ | स्थायी आस्थापना | ४०,५२,४८,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,७६,२००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २१,७८,६१,५००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,२८,००,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ५०,४९,६०,३००/- | ४ | कार्यालय खर्च | १,२१,५०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १८,३२,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | २,४०,००,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | २,००,००,०००/- |
| | एकूण जमा | ७२,३३,९८,०००/- | | एकूण खर्च | ७२,३३,९८,०००/- |

**उपरोक्तकामी मा.महापालिका आयुक्त यांजकडुन आलेल्या अभिप्रायात खालील तपशीलाप्रमाणे मा.शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी शिफारस करणेत आली असल्याचे अवलोकन केले.**

## सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | | १ | स्थायी आस्थापना | ३८,४४,२०,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,८६,०००/- | २ | अस्थायी अस्थापना | ४६,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २२,८०,९२,०००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,०५,७९,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४०,३५,०१,०००/- | ४ | कार्यालय खर्च | १,०२,३०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १४,२६,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | १,८७,५०,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १०,००,०००/- |
| | | | ८ | अखेरची शिल्लक | ०/- |
| | एकूण जमा | ६३,२१,७९,०००/- | | एकूण खर्च | ६३,२१,७९,०००/- |

## सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ० | १ | स्थायी आस्थापना | ४०,५२,४८,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,७६,२००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २१,७८,६१,५००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,२८,००,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४३,७८,६०,३००/- | ४ | कार्यालय खर्च | १,२१,५०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १३,७१,००,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ६ | बालवाडी खर्च | २,१५,००,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १५,००,०००/- |
| | | | | | |
| | एकूण जमा | ६५,६२,९८,०००/- | | एकूण खर्च | ६५,६२,९८,०००/- |

मा.महापालिका आयुक्त यांजकडुन आलेला अभिप्राय विचारात घेवून मा.महापालिका आयुक्त यांच्या अभिप्रायाप्रमाणेच्या मा.शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मा.महापालिका आयुक्त यांजकडुन आलेला अभिप्राय विचारात घेवुन मा.शिक्षण मंडळाच्या सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकामधील शाळा खर्च यामधील पि.टी.गणवेश यामध्ये र.रु.२,००,००,०००/- वाढ व मनपा हिस्सा यामध्ये र.रु.२,००,००,०००/- वाढ करणेत यावी.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, सन २०१०-११ चे शिक्षणमंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी कपात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु याठिकाणी शिक्षणमंडळाचे जे बजेट आहे ते अधिक करुन देण्यासाठी सूचना आलेली आहे त्याचे समर्थन करतो. शिक्षण मंडळाला बजेट कमी पडायला नाही पाहिजे. सामाजीक परिवर्तनासाठी,गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. महापालिकेच्या आर्थिक स्थिती संदर्भात शिक्षणक्षेत्रावर परिणाम होणार नाही याची काळजी महापौर,आयुक्त आपण सर्वांनी घेतली पाहिजे. शिक्षणमंडळाचा जो कारभार आहे त्यामध्ये अमुलाग्र बदल आणि सुधारणा होणे क्रमप्राप्त आहे. विनायक रणसूभे यांनी मागच्या बजेटवर बोलत असताना उपयुक्त सूचना केलेल्या होत्या. त्याठिकाणी शाळेमध्ये आग लागलीतर ती विझवण्यासाठी अग्निशामक यंत्रणा असली पाहिजे. शाळेमध्ये प्रथोमोपचार केंद्र असायला पाहिजे ते दिसत नाही. विद्यार्थ्यांसाठी बुट,दप्तर,गणवेष व इतर वस्तू देतो त्या जास्तीत जास्त कशा दर्जेदार असतील हे पाहिले पाहिजे व तशाप्रकारच्या वस्तू खरेदी केल्या पाहिजेत. दप्तर,बुट,गणवेष निकृष्ट दर्जाचे याठिकाणी दाखविण्यात आले आहेत तो प्रकार भविष्यकाळात होऊ नये म्हणून आपण दक्ष रहावे. त्यामध्ये चुकिचे काम होणार नाही अशाप्रकारची भूमिका घेवून शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा पुरविल्या पाहिजेत. इंग्रजी माध्यमाचे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त झाले पाहिजे त्यासाठी क्लासेस व्हायला पाहिजेत. महापालिकेचे जे शिक्षक आहेत त्यांनी तशाप्रकारचा प्रयत्न केला पाहिजे, परंतु त्यात बदल दिसत नाही. इंग्रजीचे महत्व भविष्यकाळात असणार आहे. मराठी आपली मातृभाषा आहे

परंतू देशपातळीवर जायचे असेलतर इंग्रजी आणि हिंदी याला तीतकेच महत्व असायला पाहिजे. महापालिकेचे विद्यार्थी खाजगी शाळेच्या तुलनेत कमी पडायला नाही पाहिजेत. मध्यंतरी महापालिकेमध्ये मुस्लिम बांधवांचा मोर्चा आलेला होता. त्यांच्या साध्या मागण्या होत्या. मुस्लिम बांधव शिक्षणाचा अत्यंत महत्वाचा विषय घेवून याठिकाणी आलेले होते. ते आतापर्यंत धार्मिक मुद्यावर एकत्रित आले असतील परंतू आता शिक्षणाच्या मुद्यावर एकत्रित आलेले आहेत. आपल्याकडे ऊर्दू माध्यमाचे दहा प्राथमिक विद्यालय आहेत. त्याठिकाणी माध्यमिकचे वर्ग असावेत अशी त्यांची मागणी होती. तेथील विद्यार्थ्यांना व्हरांडयामध्ये बसावे लागते. त्याचे त्यांनी फोटो सुध्दा आणलेले आहेत. तरी त्यासाठी तरतूद केली पाहिजे. महापालिकेच्या शाळेमध्ये खीचडी वाटप केली जाते. त्याठिकाणी विषबाधा झाली आहे. हॉस्पिटलमध्ये मुलांना ॲडमिट करण्यात आले आहे. महापालिकेची मोठयाप्रमाणात बदनामी झालेली आहे. त्यासंदर्भात कठोर निर्णय घेतला पाहिजे. संस्था कोणाचीही असो विद्यार्थ्यांच्या जीवीताशी खेळणारी संस्था असेलतर त्यांच्यावर कठोर कार्यवाही झाली पाहिजे. असे प्रकार शहरामध्ये पुन्हा घडू नयेत त्यासाठी सगळयांनी प्रयत्न केला पाहिजे. शिक्षणमंडळाचे बजेट कपात करु नये. त्यांना आणखी रक्कम वाढवून पाहिजे असेलतर ती दयावी परंतू शिक्षणमंडळाला रक्कम कमी पडू देवू नये.

मा.महापौर :- आयुक्त साहेब, ऊर्दू शाळेचे वर्ग कमी आहेत, मुले व्हरांडयामध्ये बसतात असे मारुती भापकर यांनी सांगितले आहे, तरी त्यावर लक्ष घालून त्वरीत कार्यवाही करावी.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, शिक्षणमंडाचे बजेट कमी करु नये. महापालिकेच्या शाळा खुप चांगल्या प्रमाणात चालतात. त्यांना आपण साहित्य पुरवितो परंतु बालवाडीकडे महापालिकेकडून लक्ष दिले जात नाही. महाराष्ट्रातील एकमेव आपली महापालिका असेल की बालवाडीला खाऊ दिला जात नाही. पहिली ते सातवीच्या विद्यर्थ्यांना खाऊ दिला जातो व बालवाडीचे विद्यार्थी ते बघत असतात. इतर सगळया शाळा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना खाऊ देतात. बालवाडी चालली नाहीतर तुमच्या शाळेत विद्यार्थी कसे येणार. इंग्रजी शाळेकडे मुले चालल्यामुळे आपल्या शाळा चालणे अवघड झालेले आहे. त्यामुळे बालवाडीच्या मुलांना सुध्दा खाऊ दयावा.

मा.ज्योती भारती :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देते. महिला व बालकल्याण समितीच्या मिटिंगमध्ये हा विषय मंजूर करुन घेतलेला आहे व तशी प्रेसनोट सुध्दा पत्रकाराना देण्यात आलेली आहे.

मा.महापौर :- आयुक्तांना सांगतो की,ही अतीशय मोलाची सूचना केलेली आहे. बालवाडीच्या मुलांना खाऊ दिला पाहिजे, तसे आयुक्त साहेब आपण संबंधीत विभागाना आदेश दयावेत.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिका परिसरामध्ये प्रायव्हेट शाळा आहेत व कोचींग क्लासेसही आहेत. कोचींग क्लासेसला काही नियमावली आहे का नाही. त्यांना महापालिकेची किंवा मंत्रालयामार्फत काही परवानगी लागते का नाही याची माहिती दयावी. तुम्ही म्हणाला होतात की, प्रायव्हेट शाळेमध्ये कोणी डोनेशन घेत असतीलतर त्याची माहिती दयावी. हे काम तुमचे आहे. ब-याचशा प्रायव्हेट स्कूल मध्ये लाखो रुपयाचे डोनेशन घेतले जाते त्यावर तुमचे नियंत्रण आहे का नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये बीव्हीजीला काम दिलेले आहे. त्याठिकाणी खराब काम चाललेले आहे. त्याठिकाणी एक-दोन कर्मचारी असतात आणि मस्टरवर दहा लोकांच्या सहया असतात. त्या सहया महिन्यातून एकदाच करतात. त्याठिकाणी घाणीचे साम्राज्य आहे. वरुन टॉयलेट लिकेज असते व खाली वर्ग सुरु असतात. अशी परिस्थिती आहे. हे काम बीव्हीजीला देणे चुकिचे आहे. आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये ७० टक्के महिला शिक्षीका आहेत. त्यांना टॉयलेटला सुध्दा जागा नाही. भारती साहेबांचे सुध्दा त्याठिकाणी लक्ष नाही. बीव्हीजीवर कोणाचे नियंत्रण आहे. आपल्या आरोग्य विभागाला विचारलेतर ते सांगतात आमच्याकडे हे काम नाही, हे काम बीव्हीजीला दिलेले आहे. त्याठिकाणी त्यांचे अजीबात काम नाही. त्याठिकाणी वॉचमेन ठेवलेला आहे तो ७० ते ८० वर्षाचा माणूस आहे व त्याला ८० रुपये दिले जातात, तो काय काम करणार. मागच्या पाच वर्षात संगणकाचे शिक्षण देत होतो. त्याला आयुक्त साहेबांनी विरोध केलेला आहे अशी माहिती आहे. असे असेलतर झोपडपट्टीमधील मुलांना संगणकाचे शिक्षण कसेकाय मिळणार. त्यांना सुध्दा माऊस, कि -बोर्ड काय आहे हे समजायला पाहिजे. यासंदर्भात महापौरांनी सूचना कराव्यात आणि येत्या वर्षामध्ये पाचवी ते सातवी पर्यंततरी संगणकाचे शिक्षण करावे. महापौर साहेब, आपण खेळाडू आहात, क्रिडा विभाग हा वेगळा केला आहे. शिक्षण व क्रिडा विभाग वेगळा असेलतर त्याचे आणि यांचे को-ऑर्डीनेशन आजीबात राहत नाही. त्यामुळे क्रिडाधोरण अजीबात नाही. त्याठिकाणी पी.टी.शिक्षक नेमले त्यांना काहीही माहित नाही. क्रिडा विभाग इकडे वर्ग करावा आणि त्यासाठी वेगळी तरतूद करावी. महापालिकेच्या शिक्षणमंडळाला क्रिडा विभाग जोडून विद्यार्थ्यांना क्रिडासाहित्य पुरवावे. प्रायव्हेट स्कुल डोनेशन घेवून ॲडमिशन देतात याचा खुलासा करावा.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहराच्या शिक्षणमंडळाचे ६५,६२,९८,०००/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. रहाटणीगाव १९८५ पासून महापालिकेमध्ये आलेले आहे. त्यावेळेला शाळेच्या बारा रुम बांधलेल्या होत्या

त्यावर एक सुध्दा रुम बांधलेली नाही. आयुक्त साहेबांकडे आम्ही पाठपुरावा करतो आहोत. त्याठिकाणी काही जागा ताब्यात आलेल्या आहेत, त्याठिकाणच्या शाळेतील मुल पॅसेजमध्ये बसतात. एका-एका वर्गामध्ये ८० ते ९० मुले बसतात काही मुलांना वर्ग नाहीत. ज्या पध्दतीने शहरामध्ये शिक्षणाकरिता खर्च करतो तसा आमच्या गावाचा सुध्दा विचार करावा. तेथील लोकसंख्या ४० हजारपर्यंत गेलेली आहे. त्याठिकाणी सातवीपर्यंत शाळा आहे आणि बारा रुम आहेत, अनेक मुले पॅसेजमध्ये बसतात. आयुक्तांनी सांगीतले हा महाराष्ट्र शासनाचा निधी आहे. आपल्याकडे निधी उपलब्ध नाही. आमच्या शाळेकरिता बारा रुम बांधायच्या आहेत. त्याचा प्लॅन सुध्दा झालेला आहे. तरी या रुम कधी बांधणार आहेत याचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

मा.महापौर :- वर्ग वाढवायचे असतीलतर ते त्वरीत करावे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाच्या बजेट संदर्भात विषय आलेला आहे. सेक्टर २२ मध्ये मुलांची संख्या जास्त आहे. मी गेली दहा-बारा वर्षे झाले माध्यमिक विद्यालयाच्या संदर्भात जाधव साहेबांच्या मागे लागलो होतो. शासनाची मान्यता नसल्यामुळे ते करत नव्हते. तेथील मुले निगडीच्या माध्यमिक विद्यालयामध्ये जातात. मुलांना रोड क्रॉस करुन पलीकडे जायचे म्हणलेतर जीव धोक्यात घालून रोड क्रॉस करावा लागतो. झोपडपट्टीतील मुले शाळेमध्ये लांब जात नाहीत. सातवी पर्यंत गेल्यानंतर लगेच शाळा सोडून देतात. आपण तेथे इमारत बांधतो आहोत त्याठिकाणी हे वर्ग घ्यावेत. से-२२ मधली मुलींची माध्यमिक शाळा पहिल्या नंबरमध्ये आलेली आहे. बीव्हीजी मार्फत काही काम होत नाही ही वस्तुस्थिती आहे. माझ्या प्रभागामध्ये शाळा आहे त्याठिकाणी बीव्हीजीची एक बाई कामाला आहे, दोन वॉचमेन आहेत त्यांच्याकडून बारा तास काम करुन घेतात व ८० रुपये देतात. अनेकवेळा तक्रार केलेली आहे त्याचा विचार होत नाही. मेन्टेनन्ससाठी एक हजार रुपये दिले जातात तरी काम करत नाहीत, पावडरचा वापर करत नाहीत. बीव्हीजीच्या अटि व शर्ती सांगाव्यात. इंग्रजीचे शिक्षण आपल्याकडे मिळत नाही त्याची सोय करण्यात यावी. आपण खीचडी वाटतो परंतु बालवाडीच्या मुलांना खाऊ भेटत नाही ती मुले आशेने बघतात. त्यातीलच खाऊ आम्ही थोडा थोडा त्या मुलांना देतो. याची जर कॉण्टेटी वाढलीतर त्यांना सुध्दा खाऊ मिळेल. पहिली ते सातवी पर्यंत मी खराळवाडी शाळेत शिकलो आहे. मला शाळा लांब असल्यामुळे शाळा सोडावी लागली. से-२२ मध्ये माध्यमिक विद्यालय चालू व्हावे. खीचडीसाठी मुले डब्बे घेवून येतात त्यांना प्लेट देण्याची व्यवस्था करावी.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, शिक्षण मंडळाच्या बजेटवर चर्चा करत असताना दोन सूचना करायच्या आहेत. आपल्या सर्वांचे नेते कै.रामकृष्ण मोरे यांनी पहिली पासून इंग्रजीचा ऐतीहासीक निर्णय घेतलेला होता. आपणही

शिक्षणमंडळाला पाचवीपासून सेमी इंग्रजी कम्पलसरी करावे. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये इंग्रजी आवश्यक आहे. खाजगी प्रत्येक शाळेमध्ये पाचवीपासून सेमी इंग्रजी आहे मग आपण का चालू करु शकत नाहीत. तरी या विषयावर लक्ष दयावे. क्रिडा विभाग आणि शिक्षण विभाग यांचे को-ऑर्डीनेशन होत नाही त्या संदर्भातही लक्ष घालावे. बौध्दीक विकास योजना याबाबतीत आतापर्यंत या योजनेअंतर्गत किती शाळेमध्ये हे चालू केले आहे आणि याबाबत किती खर्च केला आहे याचा खुलासा करावा.

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, बालवाडीच्या खाऊ वाटप संदर्भात सूचना केलेली होती. तसेच अंागणवाडीला सुध्दा खाऊ वाटप करण्यात यावा.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, तामीळनाडू येथे एका शाळेत घटना घडली तेव्हापासून मी आपल्या महापालिकेच्या शाळेत अग्निशमकचे इक्वीपमेंट असावेत म्हणून पाठपुरावा करतो आहे. परंतु त्यावर कार्यवाही झालेली नाही. भविष्यामध्ये काही घटना घडलीतर काहीही करता येणार नाही. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये अग्निशामक इक्वीपमेंट असायला पाहिजेत. महापालिकेच्या प्रत्येक शाळेमध्ये प्रथोमोपचार पेटी असावी असा आग्रह धरला होता ती ठेवण्यात आलेली आहे. परंतु प्रत्येकवेळेला ती खाली होणार त्यामध्ये साहित्य भरण्यात यावे अशी अपेक्षा होती. परंतु अशाप्रकारची कुठलीही व्यवस्था नाही. आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग ख-या अर्थाने त्याठिकाणी व्यवस्थीत पाहिजे. बजेटवर बोलत असताना शाळेतील वर्ग वाढविले पाहिजेत अशी मागणी करण्यात येते. मला निदर्शनास आणून द्यायचे आहे की, ९५ साली ८३ शाळा होत्या त्यामध्ये ४४७७४ विद्यार्थी शिक्षण घेत होते, २००१ मध्ये १३० शाळा होत्या त्यामध्ये ५५३६० विद्यार्थी शिक्षण घेत होते, २००५ ला १३२ शाळा झाल्या त्यामध्ये ५१६८४ विद्यार्थी शिक्षण घेत होते म्हणजे विद्यार्थी संख्या कमी झालेली आहे. २००९ मध्ये १३४ शाळा झाल्या त्यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या ४८७८४ आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येकडे लक्ष दिलेतर ती कमी होत चाललेली आहे. विद्यार्थ्यांची संख्या कमी होत राहिलीतर ख-या अर्थाने प्राथमिक शिक्षणाचा हा विभाग बंद करावा लागेल. खाजगी शाळेला बालवाडी आणि शिशूवर्ग जोडलेले असतात. आपल्या महापालिकेच्या १३४ शाळांमध्ये बालवाडी आणि शिशूवर्ग जोडावेत. सर्वसामान्य घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे. आपले ब्रीदवाक्य आहे “कटिबध्दा जनहिताय”. शिक्षण ज्याठिकाणी दिले जाते त्या शाळेचे वातावरण प्रसन्न असायला पाहिजे त्याठिकाणी स्वच्छता असायला पाहिजे. दोन-तीन वर्षे झाले बीव्हीजी या संस्थेला काम दिल्यानंतर त्याठिकाणी स्वच्छता नसते. त्याठिकाणी सिक्युरीटी नसतात, येणा-या भविष्य काळात यावर सुधारणा होईल अशी अपेक्षा करतो. बजेट मंजूर करावे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, शिक्षणमंडळाच्या बजेटवर बोलत असताना शाळेच्या परिस्थितीची जाणीव झालेली आहे. त्याठिकाणी अनेक अडचणी येतात. महापालिकेनी दोन-तीन वर्षात ILFS या संस्थेला काम दिले आहे, मुलांच्या बौध्दीक क्षमतेमध्ये वाढ व्हावी यासाठी या संस्थेनी ४० कोटीचे काम घेतलेले आहे. परंतू ख-या अर्थाने त्यांचा विकास झालेला पाहतो का. याकडे प्रशासनाचे १०० टक्के नियंत्रण कमी झालेले दिसते. केवळ शाळा चांगल्या परिस्थितीमध्ये असून चालत नाहीत तर जे शिक्षक शिकवितात त्यांच्या सुध्दा बौध्दीक क्षमतेचा विकास झाला पाहिजे. ILFS संस्थेने ट्रेनिंग पुर्ण केलेले आहे का. विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असेलतर ILFS सारख्या संस्थेचा काय उपयोग आहे. सांगवी,पिंपळेगुरव मध्ये महापालिकेच्या तीन-चार शाळा आहेत, सगळयात जास्त,मोठा पट त्या शाळेमध्ये आहे. त्याठिकाणी स्वत: स्थानीक नेतेमंडळी लक्ष घालतात. तेथील स्टाफवर सुध्दा नियंत्रण ठेवण्याचे काम ते लोक करतात. वाढीव रकमेचे बजेट मंजूर करणे क्रमप्राप्त आहे. परंतु आजची परिस्थिती पाहिलीतर आपली आर्थिक परिस्थिती तशी डळमळीची आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये खाजगी संस्था सुध्दा खूप आहेत. पुणे जिल्हा शिक्षणमंडळ या शाळेचा आदर्श घेण्यासारखा आहे. माझी आयुक्तांना विनंती आहे की आपण कुठल्याही प्रकारे कोणाचीही संस्था असो त्याचा कर वसुल करायला पाहिजे. प्रायव्हेट शाळा महापालिकेचा टॅक्स भरत नाहीत. टॅक्सची रक्कम कितीही असो परंतू खाजगी शाळेनी टॅक्स भरायला पाहिजे, तो टॅक्स आपल्या महापालिकेच्या शाळेवर खर्च करा. महापालिकेच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी खर्च करावा. महापालिकेकडून टॅक्सेससंदर्भात वसुली झाली पाहिजे. ते पैसे विद्यार्थ्यांवर खर्च करावेत.

मा.बाबू नायर :- मा.महापौर साहेब, बजेटमध्ये इंग्रजी माध्यम शाळेसाठी १० लाखावरुन २ कोटी मागितलेले आहेत. शाळा खर्च १५ कोटी ५१ लाखावरुन १८ कोटी ३२ लाख दाखविलेला आहे याची माहिती दयावी. दरवर्षी गणवेष,बुट,सॉक्स यावर वर्तमानपत्रामध्ये मोठयाप्रमाणात छापून येत असते. आयुक्तांनी आश्वासन दयावे की पुढच्या वर्षीतरी वेळेवर आणि चांगली क्वॉलीटी दयावी.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, शिक्षणमंडळामध्ये जो खर्च होतो त्या खर्चामध्ये कुठे कुठे दुजाभाव केला जातो. काही शाळेमध्ये स्पिकर सेट आहेत व काही शाळेमध्ये नाहीत. भारती साहेबांना फोन केला तेव्हा ते म्हणाले होते की पुढच्या वेळेस देणार आहोत. शाळेमध्ये भेदभाव होता कामा नये. सर्व शाळांसाठी एकसारखी खरेदी केली गेली पाहिजे. ज्या वस्तू घेणार आहोत त्या प्रत्येक शाळेमध्ये एकसारख्या दिल्या पाहिजेत. शिक्षकांचा दर्जा कमी आहे कारण शिक्षकांवर जादा कामाचा भार दिला जातो तो कमी केला पाहिजे. निवडणूका आल्या की शिक्षकांना काम दिले जाते व त्यांना सुध्दा कारण होते. शिक्षक प्रत्येक नगरसेवकांच्या घरी जातात आणि निवडणूकीची यादी घेवून त्यावर टिकमार्क

करतात. त्यासाठी एखादी एजन्सी नेमावी. परंतू शिक्षकांवर या इतर कामांचा भार दिला जाऊ नये. बीव्हीजीवर मागच्यावेळेस सुध्दा चर्चा झालेली होती. तेथील कर्मचा-यांना २ हजार पगार दिला जातो तो सुध्दा मिनिमम दिला आहे. बीव्हीजीकडून चांगले काम होत नाही त्यांच्याकडून काम करुन घ्यावे आणि चांगल्याप्रकारे त्यांना वेतनश्रेणी,पगार दयावा. प्रत्येक ठिकाणच्या शाळेला बालवाडी असावी. तेथील कर्मचारी कोर्टात चालले आहेत. जे २ हजार मानधन दिले जाते ते सुध्दा वेळेवर दिले जात नाही याची दक्षता घ्यावी.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, शिक्षणमंडळाचे बजेट सादर केलेले आहे, मी शाळेबद्यल प्रत्येक वेळा बोलतो पण अधिकारी लक्ष देत नाहीत. अनेक इमारतीमध्ये आपण जाऊन बघितलेतर त्याठिकाणी पेन्टींग वर्षानुवर्ष करत नाहीत. टॉयलेटमध्ये लिकेजेस असतात, पाय-या तुटलेल्या असतात. करोडो रुपये आपण इतर ठिकाणी खर्च करतो आणि अशा लहान लहान कामाकडे लक्ष दिले जात नाही. त्याठिकाणी गरीब लोकांची मुले येतात. प्रत्येक बिल्डींगमध्ये अधिका-यांनी व्हिजीट करावी. तेथील मेन्टेनन्स केला पाहिजे,पेन्टींग केले पाहिजे. प्रायव्हेट शाळेमध्ये वातावरण प्रसन्न असते. बुध्दी विकासासाठी ILFS या संस्थेला काम दिलेले होते. ४२ कोटीचे काम दिलेले होते त्यासाठी त्यांनी पाच ते दहा कोटी सुध्दा खर्च केला आहे असे वाटत नाही. त्याठिकाणी दोन लोक कामाला ठेवलेले आहेत त्या संस्थेचे कामकाज अजीबात चांगले नाही. त्यावर ॲक्शन घेतलेली नाही. शाळेमध्ये फॅन सुध्दा नाहीत, टेलिफोन कनेक्शन नाही, क्लार्क नाही. प्रत्येक शाळेमध्ये एक-दोन क्लार्क पाहिजेत, तेथील प्रत्येक काम हेडक्लार्कला करावे लागते. कॉम्प्युटर घेतलेले होते ते तीन वर्षापासून बंद पडलेले आहेत. शिक्षकांचे काम काय आहे हे सांगावे. त्यांनी शाळेमध्ये मुलांना शिकवायचे का इतर कामे करायची. त्यांना निवडणूकीची काम देतो, लहान मुलांना ड्रॅाप द्यायला सांगतो हे काम शिक्षकांचे नाही. याकामांसाठी कॉन्ट्रॅक्टर नेमावा आणि त्यांच्याकडून हे काम करुन घ्यावे. शिक्षकांनी मुलांना शिकविण्यासाठी जास्त वेळ द्यायला पाहिजे. बीव्हीजी बद्यल सांगीतले आहे, ते कधी आले आहेत व त्यांना कधी काम दिलेले आहे. चार-पाच वर्षात एवढा मोठा कॉन्ट्रॅक्टर झालेला आहे की त्याला हॉस्पिटल,शाळेचे,नाल्याचे काम दिलेले आहे. सर्व काम बीव्हीजीला दिलेले आहे. आपण टेंडर मध्ये अशी कंडीशन टाकतो का, की हे काम फक्त बीव्हीजीलाच द्यायचे. बीव्हीजी कसे काम करतात हे कोणी अधिकारी बघतात का. कोणा अधिका-यांचे काही कनेक्शन असेलतर फाईंडआऊट करा नाहीतर आम्ही सीआयडी इन्क्वॉयरी लावू. त्यांचे पाच वर्षे संपलेले आहेत तरी नवीन टेंडर काढलेले नाही आणि टेंडर एक्सटेन्शन करताना रेट वाढवून दिलेले आहेत. त्यामध्ये नवीन टर्म ॲण्ड कंडीशन टाकतो का. तुमच्यावर इन्क्वॉयरी निघेल. ते शाळा सुध्दा स्वच्छ करत नाहीत. डेंग्यू झालातर पहिल्यांदा तुम्ही जबाबदार राहाल. गरीब लोकांची मुले शाळेमध्ये आल्यानंतर त्या मुलांची काळजी आपण घेतली पाहिजे. या सर्व सुधारणा व्हायला पाहिजेत.

महापौर साहेब, आपण अनुभवी आहात, सुशिक्षीत आहात. या सुधारणा झाल्या पाहिजेत.

मा.सुषमा गावडे :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डामध्ये ऊर्दू शाळा आहे ती फक्त पहिली ते सातवी पर्यंत आहे व ती शाळा सकाळी ७ ते १२ पर्यंत असते नंतर बंद असते. काही नागरीकांनी सांगीतले आहे की तेथे आठवी ते दहावी पर्यंतचे वर्ग चालू करावेत कारण तेथील मुलांना निगडीला जावे लागते. आठवी ते दहावी पर्यंतचे वर्ग त्याठिकाणी सुरु करावेत.

मा.अलका यादव :- मा.महापौर साहेब, ग्रामीण भागात जास्तीत जास्त बालवाडयांना परवानगी दयावी. प्रत्येक वॉर्डात एक बालवाडीला मंजूरी दयावी. आपण खिचडी देतो मी माझ्या वॉर्डातील शाळेमध्ये जाऊन बघितलेतर त्यामध्ये आळया निघाल्या होत्या. मी वेळोवेळी भेटलेतरी याबद्यल काहीही कार्यवाही झालेली नाही. त्याठिकाणच्या महिलांना खिचडी करण्यासाठी सांगावे.

मा.महापौर :- सभासदांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. काही विषय सूचविलेले आहेत. सोनकांबळेताई आपण बालवाडीसाठी खाऊ दयावा म्हणून सांगीतलेले आहे तशी उपसूचना मांडावी. त्याचप्रमाणे सर्व शाळेमध्ये मंगलाताईनी सूचना केली की स्पिकर सेट द्यायला पाहिजेत. एका कार्यक्रमासाठी मला शाळेत बोलावलेले होते त्याठिकाणी शिक्षकांना बसण्यासाठी सुध्दा खुर्च्या नव्हत्या. ॲक्रेलीकचे बोर्ड आलेले आहेत ते अधुनिक पध्दतीचे बोर्ड आहेत त्याला पेनने लिहावे लागते त्यासाठी मिनिमम खर्च आहे. कुमार साहेबांनी सांगीतले आहे की शाळेत मुलांना बसता येत नाही, तेथे लिकेजेस आहेत, वॉर्डनिहाय तरतूदीमध्ये शाळेचे मेन्टेनन्स असते त्यासंदर्भात जे.ई.ला जबाबदार धरावे. त्यांना तशा सूचना द्याव्यात. तक्रारी ताबडतोब दुर कराव्यात. बीव्हीजीला जे काम दिलेले आहे त्या कामाबद्यल कोणीही समाधानी नाही. ते टर्म ॲण्ड कंडीशनप्रमाणे काम करत नसतीलतर कॉन्ट्रॅक्ट रद्य करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. त्यामुळे त्यामध्ये लक्ष द्यावे. साठ-साठ वर्षाचे रिटायर्ड लोक वॉचमेन म्हणून ठेवत असतीलतर आणि शाळेतील स्वच्छतेबाबत अशी परिस्थिती असेलतर त्याबाबतीत गांभीर्याने लक्ष द्यावे. बीव्हीजीवाले समाधानकारक काम करत नसतीलतर, वेळ पडल्यास त्यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्य करावे. सर्वच शाळेला मिनिमम स्पोर्टस् ॲक्टीव्हीटी पाहिजेत. मुलांना असे वाटायला पाहिजे की खेळामुळेतरी शाळेत जायला पाहिजे. कॉम्प्युटर विषयी सूचना केलेली आहे. ILFS सर्व शाळेमध्ये पोहचले नाहीत तर आयुक्त साहेबांनी अशा संस्थेमध्ये लक्ष घालावे.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या मी नोट केलेल्या आहेत. ऊर्दू शाळेबद्यल मोर्चा आलेला होता त्याबाबत संबंधीत खात्याला सूचना केलेली आहे. बालवाडीच्या मुलांना खाऊ दयावा अशी सूचना

केलेली आहे ही चांगली सूचना आहे. या बजेटमध्ये हे टाकता आले नाहीतरी ते आम्ही करणार आहोत. बीव्हीजीच्या कामाची क्वॉलीटी कशी चेक करता येईल याबाबत आम्ही सर्व्हे केलेला होता त्यावेळी त्यांनी सांगीतले की शाळेमध्ये पाणी नाही. त्यामुळे स्वच्छता करण्याबाबत अडचणी येतात. आम्ही प्रत्येक शाळेला पाण्याची व्यवस्था केलेली आहे. बीव्हीजीच्या कामामध्ये कशी चेकींग करता येईल याबाबत ॲक्शनप्लॅन करुयात. शाळेच्या रुम बद्यल सांगीतले आहे. Examine करुन रुम आम्ही बांधणार आहोत.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-

सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकामधील बालवाडी खर्च यामधील बालवाडी विद्यार्थी सकस आहार यामध्ये र.रु.५०,००,०००/- वाढ व मनपा हिस्सा यामध्ये र.रु.५०,००,०००/- वाढ करणेत यावी.

मा.ज्योती भारती :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, मा.चंद्रकांता सोनकांबळे व मा.ज्योती भारती यांची, मा.जितेंद्र ननावरे व मा.काळुराम पवार यांची उपसूचना स्विकारली आहे. मा.महापौर साहेब, माझ्या शाळेला महापालिकेचे बक्षीस मिळालेले आहे. महापालिकेच्या माध्यमातून संगणक प्रशिक्षण दिले जाते ते कुठल्याही संस्थेला न देता शिक्षण मंडळाच्या माध्यमातून देण्यात यावे. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सेमी इंग्रजी चालू करण्यात यावे. भारतदेश महासत्ता बनवायचा असेलतर इंग्रजी बालवाडी चालू करण्यात यावी. मंगलाताईनी सांगीतल्याप्रमाणे माझ्याही शाळेला स्पिकर सेट नाही,शाळेचे पेन्टींग केलेले नाही.

मा.शरद बो-हाडे :- मा.महापौर साहेब, आपल्या प्रत्येक शाळेची विद्यार्थीसंख्या कमी का होते. आपल्या महापालिकेचे शिक्षक कमीत कमी पंधरा ते सतरा हजार पगार घेतात आणि प्रायव्हेट शाळेचे शिक्षक चार ते पाच हजार पगार धेतात. आपल्या शाळेच्या शिक्षकांवर बीलकूल नियंत्रण नाही. शिक्षक काय शिकवतात याबाबत प्रशासन कधी व्हिजीट देते का. प्रशासनाचे शिक्षकांवर नियंत्रण नाही त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. प्रायव्हेट शाळेमध्ये विद्यार्थी जातात. त्याठिकाणी कमी पगार देवून सुध्दा शिक्षक चांगले शिकवतात. आणि आपल्या शिक्षकांना चांगला पगार असताना विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळत नाही याची काळजी धेतली पाहिजे. प्रशासनाची प्रत्येक शाळेवर व्हिजीट झाली पाहिजे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

मा.महापौर :- आपण उपमहापौर होता किती शाळेला व्हिजीट केली. त्यावेळेला तुम्हांला हे समजले नाही का.

मा.शरद बो-हाडे :- मा.महापौर साहेब, तुम्ही किती शाळेला व्हिजीट दिली.

मा.महापौर :- मी चार शाळेला व्हिजीट दिलेली आहे.

मा.हरी भारती :- मा.महापौर साहेब, जे खाजगी क्लासेस घेतले जातात त्याची नोंदणी आपल्याकडे होत नाही. कोण किती फि घेतो यावर शासनाचा कंट्रोल नाही. मा.राधाकृष्ण विखे पाटील हे शिक्षणमंत्री असताना त्यांनी सर्व्हे करण्यासाठी सांगीतलेले होते तो सर्व्हे करुन माहिती पाठविलेली आहे. खाजगी क्लासेसवर नियंत्रण करण्याच्या संदर्भात कायदा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते परंतु अजूनतरी शासनाचे नियंत्रण नाही. खाजगी शाळा डोनेशन घेतात असे सांगीतले आहे. परंतु त्याबद्दल कुठलेही पालक लेखी स्वरुपात तक्रार देत नाहीत. अशाप्रकारे कोणी लेखी तक्रार केलीतर फौजदारी गुन्हा दाखल करता येतो परंतू तो पुराव्याशिवाय दाखल करता येत नाही. लेखी स्वरुपात कुठल्याही पालकांनी तक्रार दिलीतर कायदेशिर कार्यवाही करु शकतो. सेमी इंग्रजीच्या ३५ शाळा चालू केलेल्या होत्या. पहिल्यांदा मुख्याध्यापकांची मिटिंग घेतली होती त्यावेळेला ३५ शाळांनी तयारी दाखविली होती व सेमीइंग्रजी सुरुही केले होते. परंतु जसजसे दिवस चालले तसतसे शिक्षकांच्या लक्षात यायले लागले की आपल्याला हे जमत नाही. त्यामुळे काही सेमी इंग्रजी शाळा बंद केलेल्या आहेत. आता फक्त तीन ते चार शाळांमध्ये सेमी इंग्रजी चालू आहे. सायन्सचा विषय शिकविताना काही डीएड झालेले शिक्षक आहेत त्यांना सायन्सचे शब्द लक्षात येत नाहीत. ते शिकविणे अवघड जाते त्यासाठी बीएससी बीएड अशाप्रकारच्या शिक्षकांची आवश्यकता आहे. असे शिक्षक नेमायचे असतीलतर महापालिकेनी स्वतंत्र तरतूद करणे आवश्यक आहे. मा.नायर यांनी विचारणा केलेली होती की इंग्रजी माध्यमासाठी एवढी तरतूद कशासाठी केलेली आहे. तर ती सेमी इंग्रजीसाठी केलेली आहे त्यामुळे किमान बीएससी बीएड तरी शिक्षक नेमता येतील.इंग्रजी बालवाडीसंदर्भात सांगीतलेले आहे हे पुर्वीच्या मा.महापौरांनी सुध्दा सांगीतलेले होते. परंतू नंतर असा निर्णय झाला की इंग्रजी बालवाडी सुरु केलीतर पुन्हा प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सुरु कराव्या लागतील. त्यामुळे आता पाच ते सहा शिक्षक नेमावेत अशाप्रकारचा निर्णय झालेला आहे. त्याची अंतीम कार्यवाही चालू आहे. १३४ शाळेमध्ये २२० बालवाडया चालू आहेत. प्रत्येक शाळेला बालवाडी ॲटॅच आहे. सन्मा.सदस्यांचे असे प्रस्ताव आणखी आलेले आहेत त्याची छाननी चालू आहे.

मा.महापौर :-वॉर्डातील साफसफाईचा दर्जा,शाळेचा दर्जा याविषयी नगरसेवकांनी सांगीतलेले आहे. त्या त्या शाळेच्या समितीवर नगरसेवक हे अध्यक्ष आहेत. त्यांनी तक्रार केलेली आहे म्हणून सांगतो.

मा.भारती :- मा.महापौर साहेब,प्रत्येक शाळेमध्ये वॉर्ड समिती आहे त्यांचे अध्यक्ष स्थानीक नगरसेवक आहेत. त्याठिकाणी शाळेचे लोकल प्रश्न असतीलतर ते त्या स्तरावर सोडविता येतात व बाकीचे प्रश्न महापालिका स्तरावर.

मा.महापौर :- त्या त्या सन्मा.नगरसेवकांनी ती जबाबदारी स्विकारावी असे यांचे म्हणणे आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, प्रायव्हेट क्लासेस संदर्भात काहीतरी कायदा केला पाहिजे.

मा.महापौर :- खाजगी क्लासेस थंबविण्याचा आपल्याला अधिकार नाही तो अधिकार राज्यशासनाचा आहे. राज्यशासनाला आपण पाठविलेले आहे. डिएडच्या शिक्षकांना सेमी इंग्रजी शिकवावे लागते. सेमी इंग्रजीसाठी बीएससी बीएड शिक्षक पाहिजेत ते एक-एकतरी असावेत त्यासाठी काय तरतूद करता येईल ती करुन घ्यावी. ७२ कोटीचे बजेट आहे. आपल्याला खेद होतो की बेसीक इंग्रजी आणि सायन्स शिकविता येत नाही असे शिक्षणाधिका-यांचे म्हणणे आहे याकडे लक्ष द्यायला पाहिजे. किमान जे टिचर लागणार आहेत ते मानधनावर घ्या किंवा कसेही घ्या. काही डिएड शिक्षकांना वाचता सुध्दा येत नाही असे सांगीतले आहे. सेमी इंग्रजी करायचे आहे त्यावर काय उपाययोजना केलेल्या आहेत. डीएड शिक्षक कमी करुन बीएससी बीएड घ्यायचे का हे सांगावे. सेमी इंग्रजी चालू करण्याचा तुमचा मानस आहे का.

मा.भारती :- मा.महापौर साहेब, सेमी इंग्रजी चालू करण्याचा मानस असल्यामुळेच माध्यमिक शाळेसाठी स्वतंत्र तरतूद केलेली आहे. ते शिक्षक मानधनावर घेणार आहोत. पहिल्या वर्षी त्यांना पुर्ण वेळ काम असणार नाही. पाचवी, सहावी,सातवी या तीन वर्गाला एक शिक्षक पुर्णवेळ लागतो.

मा.महापौर :- जे काही करायचे आहे ते करावे आणि मुलांना इंग्रजी शिकविता येईल असे करावे. इंग्रजी माध्यमाचे शिक्षक घ्यावेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७४२ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.शिक्षण मंडळ ठराव क्र.४७६ दि.२७.८.२००९
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा /६/कावि/२२९१/०९ दि.९/११/२००९

## ३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९७३९ दिनांक १७.११.२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रकाचा [र.रु.६८,००,७९,०००/-] व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाचा [र.रु.७२,३३,९८,०००/-] खालील प्रमाणेच्या तपशिलाचा मान्यतेसाठीचा मा.शिक्षण मंडळाचा ठराव अवलोकन केला.

### सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक

| अ.क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ० | १ | स्थायी आस्थापना | ४१,८४,२०,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,८६,०००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २४,३०,९२,०००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,०५,७९,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४३,६४,०१,०००/- | ४ | कार्यालय खर्च | १,०२,३०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १५,५१,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | १,८७,५०,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १०,००,०००/- |
| | | | ८ | अखेरची शिल्लक | ० |
| | एकूण जमा | ६८,००,७९,०००/- | | एकूण खर्च | ६८,००,७९,०००/- |

### सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| अ.क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ०/- | १ | स्थायी आस्थापना | ४०,५२,४८,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,७६,२००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २१,७८,६१,५००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,२८,००,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ५०,४९,६०,३००/- | ४ | कार्यालय खर्च | १,२१,५०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १८,३२,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | २,४०,००,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | २,००,००,०००/- |
| | एकूण जमा | ७२,३३,९८,०००/- | | एकूण खर्च | ७२,३३,९८,०००/- |

उपरोक्तकामी मा.महापालिका आयुक्त यांजकडुन आलेल्या अभिप्रायात खालील तपशीलाप्रमाणे मा.शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी शिफारस करणेत आली असल्याचे अवलोकन केले.

## सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | | १ | स्थायी आस्थापना | ३८,४४,२०,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,८६,०००/- | २ | अस्थायी अस्थापना | ४६,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २२,८०,९२,०००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,०५,७९,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४०,३५,०१,०००/- | ४ | कार्यालय खर्च | १,०२,३०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १४,२६,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | १,८७,५०,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १०,००,०००/- |
| | | | ८ | अखेरची शिल्लक | ०/- |
| | एकूण जमा | ६३,२१,७९,०००/- | | एकूण खर्च | ६३,२१,७९,०००/- |

## सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| अ.क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ० | १ | स्थायी आस्थापना | ४०,५२,४८,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,७६,२००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २१,७८,६१,५००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,२८,००,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४३,७८,६०,३००/- | ४ | कार्यालय खर्च | १,२१,५०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १३,७१,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | २,१५,००,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १५,००,०००/- |
| | | | | | |
| | एकूण जमा | ६५,६२,९८,०००/- | | एकूण खर्च | ६५,६२,९८,०००/- |

**मा.महापालिका आयुक्त यांजकडून आलेला अभिप्राय विचारात घेवून मा.महापालिका आयुक्त यांच्या अभिप्रायाप्रमाणे मा.शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेत यावी अशी शिफारस करणेत आली आहे. मा.आयुक्त यांजकडुन आलेला अभिप्राय विचारात घेवुन मा.शिक्षण मंडळाच्या सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकामधील शाळा खर्च यामधील पि.टी.गणवेश यामध्ये र.रु.२,००,००,०००/- वाढ व बालवाडी खर्च यामधील बालवाडी विद्यार्थी सकस आहार यामध्ये र.रु.५०,००,०००/- वाढ व मनपा हिस्सा यामध्ये र.रु.२,५०,००,०००/- वाढ करणेत येत आहे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण मंडळाचे सन २००९-१० चे सुधारित अंदाजपत्रक [र.रु.६३,२१,७९,०००/-] व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक [र.रु.६८,१२,९८,०००/-] पुढील प्रमाणे मान्य करणेत येत आहे.**

## सन २००९-१० चे सुधारीत अंदाजपत्रक

| अ. क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | | १ | स्थायी आस्थापना | ३८,४४,२०,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,८६,०००/- | २ | अस्थायी अस्थापना | ४६,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २२,८०,९२,०००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,०५,७९,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४०,३५,०१,०००/- | ४ | कार्यालय खर्च | १,०२,३०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १४,२६,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | १,८७,५०,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १०,००,०००/- |
| | | | ८ | अखेरची शिल्लक | ०/- |
| | एकूण जमा | ६३,२१,७९,०००/- | | एकूण खर्च | ६३,२१,७९,०००/- |

## सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक

| अ.क्र | जमा | र.रु. | अ. क्र. | खर्च | र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आरंभीची शिल्लक | ० | १ | स्थायी आस्थापना | ४०,५२,४८,०००/- |
| २ | जमा लेखाशिर्ष | ५,७६,२००/- | २ | अस्थायी अस्थापना | ६०,००,०००/- |
| ३ | शासन अनुदान | २१,७८,६१,५००/- | ३ | पेन्शन व ग्रॅज्युएटी | ७,२८,००,०००/- |
| ४ | म.न.पा.हिस्सा | ४६,२८,६०,३००/- | ४ | कार्यालय खर्च | १,२१,५०,०००/- |
| | | | ५ | शाळा खर्च | १५,७१,००,०००/- |
| | | | ६ | बालवाडी खर्च | २,६५,००,०००/- |
| | | | ७ | इंग्रजी माध्यम शाळा | १५,००,०००/- |
| | | | | | |
| | एकूण जमा | ६८,१२,९८,०००/- | | एकूण खर्च | ६८,१२,९८,०००/- |

**अनुकूल - ७० प्रतिकूल -०**

**अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.**

-------------

**मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.**

**विषय क्रमांक :- ४**

**दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त**

**संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/१/कावि/१८१/०९ दि.२४.८.०९**

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१६८ दिनांक २०/११/२००९

देहूरोड कॅन्टोमेंट बोर्ड, जी.एल.आर. सर्व्हे नं.८२ श्रीकृष्णनगर येथील जागेत उद्यान विकसित करणे व एक वर्षे देखभाल करणेकामी र.रु.३४,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

सांगवी येथे स.नं.६ मध्ये उद्यान विकसित करणेकामी र.रु.३०,००,०००/- (रु.तीस लाख) तरतूद करणेकरीता अंदाजपत्रक २००९-१० मधील संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन र.रु.३०,००,०००/- (रु.तीस लाख) हे स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावरील सांगवी स.न.६ मध्ये उद्यान विकसित करणे या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेत यावी स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये असणारी तरतूद अपूरी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावणेकरीता र.रु.९०,००,०००/- (रु.नव्वद लाख) ची वाढीव तरतूद करणे आवश्यक असल्याने संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन र.रु.९०,००,०००/- (र.रु.नव्वद लाख) इतकी तरतूद स्थापत्य उद्यानाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस तसेच विशेष योजना मधील व्हिजन २००५ चे लेखाशिर्षांतर्गत पान क्र.२४ मधील अनुक्रमांक २१ चे काम सांगवी गावठाण येथील रस्त्यांची सुधारणा व मजबुतीकरण करणे या कामावरील तरतूद कमी पडत असून या कामाकरीता अंदाजपत्रक- २ (२००९-१०) मधील पान क्र.९८ मधील अनुक्रमांक ४१ चे लेखाशिर्षामधील पान क्र.१०० चे अनुक्रमांक ५ चे कामावरील असणाऱ्या तरतूदीतून र.रु.२,००,००,०००/- (रु.दोन कोटी) व पान क्र.१९६ चे लेखाशिर्ष अनुक्रमांक १० मधील पान क्र.१९८ मध्ये येणाऱ्या अनुक्रमांक २६ चे कामावरील असणाऱ्या तरतूदीमधून र.रु.२,००,००,०००/- (रु.दोन कोटी) हे सांगवी गावठाण येथील अर्धवट असणाऱ्या वरीलप्रमाणे उल्लेख केलेल्या कामावरच तातडीने वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. वार्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती येथे CME चा काही भाग रहिवासी भागात येतो त्याठिकाणच्या रस्त्याची दुरुस्ती किंवा त्याची कामे मनपा खर्चातून होतात. त्या रस्त्याच्या आणि CME सिमाभिंतीमधील जागा ही अत्यंत धोकादायक आहे त्याठिकाणी फार गवत तसेच वेडीवाकडी झाडे आहेत. त्यामुळे त्याजवळील रहिवासीभागात आरोग्याचा धोका संभवतो त्याकरीता त्याठिकाणी सुशोभित करण्याकरीता CME ची परवानगी घेण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत यावी.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब,उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, हे काम कॅन्टोमेंट बोर्डच्या हद्दीतील आहे ते आपण का करायचे. अर्ध्या पिंपरी चिंचवड ऐरियामध्ये सीएमई आहे.

मा.महापौर :- ही जागा पुर्वी आपल्या ताब्यात घेतलेली आहे, ते करत नाहीत म्हणून आपण करतो आहोत.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, जूना मुंबई-पुना रोड सीएमई मधुन येतो, तेथील काही भाग रहिवासमध्ये येतो. त्या रस्त्याची दुरुस्ती,डांबरीकरण आपण करतो. आता दापोडी पासून जो सीएमईचा काही भाग रस्त्यामध्ये घेतलेला आहे. त्या मोबदल्यात महापालिकेच्या खर्चाने एक जॉगींग ट्रॅक तयार करुन दिलेला आहे त्यातील काही भाग सीएमई गेट पासून नाशिक फाटयापर्यंत आहे हा मोकळा आहे त्याठिकाणी तो रस्ता सुशोभीत करण्यासाठीचे काम सुध्दा टेंडरमध्ये काढलेले होते परंतु त्यांचे म्हणणे आहे की बाहेर जे काम करतो तेच काम आतमध्ये सुध्दा करुन दयावे. तरी या कामासाठी आयुक्त साहेब सीएमईचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी आपण करावी. माझ्या वॉर्डातील हा विषय आहे. या रोडला माझ्या वॉर्डातील सर्व ज्येष्ठ नागरीक सकाळी,संध्याकाळी मॉर्नींग वॉकींगला जात असतात. चालणा-यांची तेथे संख्या वाढल्यामुळे जागा कमी पडते त्या जागेवर वाहतूक नसते. त्या रोडला लागून सीमाभिंत आहे. तरी डेव्हलपमेंट करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत.

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- वॉर्ड क्र.१३ दिघीगाव व वॉर्ड क्र.१०५ बोपखेल याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणेकामी र.रु.९०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, मा.रामदास कुंभार व मा.उल्हास शेट्टी यांची, मा.शंकर जगताप व मा.महेश लांडगे यांची उपसूचना स्विकारली आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विषय आणि उपसूचना या लष्कराच्या भागातील आहेत. त्याचे हस्तांतरण आपण ब-याच वर्षापासून करण्याचा प्रयत्न करतो आहोत. आतापर्यंत किती जागांचे हस्तांतरण झालेले आहे याचे

स्पष्टीकरण करावे. त्यांच्या वतीने अटि व शर्ती टाकलेल्या आहेत त्या काय आहेत, त्यावर महापालिकेला भविष्यकाळात किती खर्च करावा लागेल. हा विषय केंद्रशासनाच्या संबंधीत असलातरी महापालिकेवर बोजा मोठया प्रमाणात पडणार आहे. त्या संदर्भात केंद्रशासनाच्या स्तरावर कशाप्रकारचे प्रयत्न करत आहोत. केंद्रशासनामध्ये कृषिमंत्री मा.शरद पवार किंवा इतर काही खासदार आहेत. महापालिकेची आर्थिक परिस्थिती उबघाईला आलेली आहे. आपण कर्जबाजारी आहोत. अशा परिस्थितीमध्ये संरक्षण खात्याने अटि, शर्ती टाकलेल्या आहेत त्यातून आपल्याला सुट मिळावी. महापालिकेची स्थिती सावरण्यासाठी हातभार लागावा यासाठी प्रशासनाच्या वतीने काय केले हे सांगावे.

मा.महापौर :-महापालिकेस बक्षीस मिळालेले आहे. मा.शरद पवार यांची आम्ही भेट घेतली आहे. मा.पवार साहेबांनी,आयुक्त साहेबांना वेगळे पत्र तयार करायला संागीतलेले आहे. त्यामध्ये या सर्व गोष्टीचा ऊहापोह आहे. आयुक्तांनी तसे पत्र मा.पवार साहेबांना लिहिलेले आहे त्यावर निर्णय अपेक्षित आहे. डिफेन्सचा कारभार आहे त्याठिकाणी आपण फक्त विनंतीच करु शकतो. या परिसरातील लोकांना उपयोग व्हावा म्हणून विषय आणलेला आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :-७४३ | विषय क्रमांक :- ४ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.उद्यान/१/कावि/१८१/०९ दि.२४.८.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१६८ दिनांक २०/११/२००९

देहूरोड कॅन्टोमेंट बोर्ड, जी.एल.आर. सर्व्हे नं.८२ श्रीकृष्णनगर येथील जागेत उद्यान विकसित करणे व एक वर्षे देखभाल करणेकामी र.रु.३४,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सांगवी येथे स.नं.६ मध्ये उद्यान विकसित करणेकामी र.रु.३०,००,०००/- (रु.तीस लाख) तरतूद करणेकरीता अंदाजपत्रक २००९-१० मधील संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन र.रु.३०,००,०००/- (रु.तीस लाख) हे स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावरील सांगवी स.न.६ मध्ये उद्यान विकसित करणे या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे स्थापत्य उद्यान विभागाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावर सन २००९-१० चे अंदाजपत्रकामध्ये असणारी तरतूद अपूरी पडत असून उद्यानातील कामे मार्गी लावणेकरीता र.रु.९०,००,०००/- (रु.नव्वद लाख) ची वाढीव तरतूद करणे आवश्यक असल्याने संगणक खरेदी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट या लेखाशिर्षावरुन

र.रु.९०,००,०००/- (र.रु.नव्वद लाख) इतकी तरतूद स्थापत्य उद्यानाचे स्थापत्य- २अ उद्याने या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेस तसेच विशेष योजना मधील व्हिजन २००५ चे लेखाशिर्षांतर्गत पान क्र.२४ मधील अनुक्रमांक २१ चे काम सांगवी गावठाण येथील रस्त्यांची सुधारणा व मजबुतीकरण करणे या कामावरील तरतूद कमी पडत असून या कामाकरीता अंदाजपत्रक- २ (२००९-१०) मधील पान क्र.९८ मधील अनुक्रमांक ४१ चे लेखाशिर्षामधील पान क्र.१०० चे अनुक्रमांक ५ चे कामावरील असणाऱ्या तरतूदीतून र.रु.२,००,००,०००/- (रु.दोन कोटी) व पान क्र.१९६ चे लेखाशिर्ष अनुक्रमांक १० मधील पान क्र.१९८ मध्ये येणाऱ्या अनुक्रमांक २६ चे कामावरील असणाऱ्या तरतूदीमधून र.रु.२,००,००,०००/- (रु.दोन कोटी) हे सांगवी गावठाण येथील अर्धवट असणाऱ्या वरीलप्रमाणे उल्लेख केलेल्या कामावरच तातडीने वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. वार्ड क्र.१९ गव्हाणेवस्ती येथे CME चा काही भाग रहिवासी भागात येतो त्याठिकाणच्या रस्त्याची दुरुस्ती किंवा त्याची कामे मनपा खर्चातून होतात. त्या रस्त्याच्या आणि CME सिमाभिंतीमधील जागा ही अत्यंत धोकादायक आहे त्याठिकाणी फार गवत तसेच वेडीवाकडी झाडे आहेत. त्यामुळे त्याजवळील रहिवासीभागात आरोग्याचा धोका संभवतो त्याकरीता त्याठिकाणी सुशोभित करण्याकरीता CME ची परवानगी घेण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. वॉर्ड क्र.१३ दिघीगाव व वॉर्ड क्र.१०५ बोपखेल याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणेकामी र.रु.९०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------------

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७४४ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.मसाभां/०४/कावि/३९५ /०९ दि.२८.८.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१७१ दिनांक
२०/११/२००९

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत मनपा दवाखाना/रुग्णालयातील भंगार साहित्य व निकामी झालेले हायपोसोलुशन निविदा नोटीस क्रमांक -१६/२००५-२००६ नुसार जादा दराचे ठेकेदार मे.गॅब ॲडव्हरटायझिंग यांचेकडून प्राप्त झालेल्या निविदा दरानुसार त्यांचेसमवेत

झालेल्या करारनाम्यास अधिन राहून पुढील दोन वर्ष कालावधीकरीता विक्री करण्यास त्यांचे समवेत परत करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.
मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------------

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशा/१अ/कावि/६२३/०९ दि.२९.९.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१७३ दिनांक २०/११/२००९

महापालिका आस्थापनेवरील आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी अभिनामाचे पद महापालिका कर्मचा-यांमधुन भरणेकरिता पदोन्नती अर्हता, “पदोन्नतीने - १) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. २) समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणे आवश्यक ३)महापालिकेच्या आरोग्य विभागातील आरोग्य निरीक्षक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचा-यांमधुन सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देवुन.४) महापालिकेच्या नागरी कुटुंब कल्याण केंद्रातील कामकाजाचा किमान २ वर्षांचा अनुभव”,याप्रमाणे निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी हे पद वर्ग २ चे असुन महापालिकेतील वर्ग २ च्या तत्सम पदांना र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० अशी वेतनश्रेणी असलेने वरील पदासहि र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे र.रु.४४०० या वेतनश्रेणी ऐवजी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे र.रु.५४०० अशी वेतनश्रेणी लागू करणेस मान्यता देणेत यावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसुचनेस अनुमोदन देते.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो -

महापालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गातील १२ वर्ष सेवा पुर्ण करणाऱ्या व झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) या अभिनामाची पदे शासन मंजूर आहेत. सदर पदांची शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे आहे. १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस.पदवी उत्तीर्ण, २)इंटर्नशिप पुर्ण व राज्य मेडीकल कॉन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक ३) शासकीय/निमशासकीय रुग्णालयामधील ०७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. सबब वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) या पदाच्या उक्त नमूद केलेल्या अर्हतेमधील क्र.०३ मध्ये नमूद केलेल्या अनुभवाच्या अर्हतेमध्ये ०७ वर्षे याऐवजी ०६ वर्षे अनुभवाची अर्हता उमेदवाराने धारण केलेली असणे आवश्यक आहे असा बदल करण्यास मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड शहराचे वाढते औद्योगिकरण व शहरीकरणामुळे दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण लक्षात घेता पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठीच्या प्रकल्पांना केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून विशेष प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारचे पर्यावरण विषयी सर्व तांत्रिक प्रकल्प स्वतंत्रपणे करणेसाठी मा.आयुक्त यांनी नव्याने पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष कार्यान्वित केलेला आहे. सद्यस्थितीत या कक्षाचा कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त पदभार ड्रेनेज विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडे दिलेला आहे. भविष्यातील या कक्षाकडील कामाची व्याप्ती लक्षात घेता या विभागासाठी महापालिकेच्या अस्थापनेवर स्वतंत्र कार्यकारी अभियंता (पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष) या अभिनामाचे पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीत निर्माण करणेस व या पदासाठीची शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी B.E.Civil व पर्यावरण अभियांत्रिकीमधील पदव्यूत्तर पदवी (M.E.Environment) असणे आवश्यक तसेच महानगरपालिकेत उपअभियंता (स्थापत्य) या पदावर कमीत कमी ३ ते ५ वर्षाचा अनुभव असणारे उपअभियंता मधून पदोन्नतीने भरणेस व याप्रमाणे अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेत यावी. महापालिकेमधील रजा राखीव वैद्यकीय अधिकारी व रजा राखीव स्टाफ नर्सेस यांना मा.उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक उसं/आसे/आस्था/मवैआसे/टे-१, दि.२५/०९/२००९ नुसार महापालिका वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्सेसप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यास तसेच शासन अधिसुचना क्र.वेपूर १२०९/प्र.क्र.१५३/सुधारणा-५/सेवा-९ दि.०४ नोव्हेंबर २००९ नुसार वैद्यकीय अधिकारी व दंतशल्य चिकित्सक यांना शासनाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता देणेत यावी. संजय बंडोपंत गायकवाड अनुरेखक यांची कौटुंबिक अडचण विचारात घेता, नाशिक महानगरपालिका श्री.गायकवाड यांना त्यांचे आस्थापनेवरील रिक्त पदावर सामावून घेण्यास तयार असेल व तेथिल सक्षम समितीने तसा ठराव पारित केल्यास, श्री.संजय बंडोपंत

गायकवाड अनुरेखक यांची सेवा नाशिक महानगरपालिकेकडे वर्ग करणेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हरकत असणार नाही. मात्र अशा प्रकारे सेवा वर्ग झाल्यानंतर त्यांना पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कोणत्याही कारणास्तव वर्ग करुन घेतले जाणार नाही अथवा पुर्ननियुक्ती देण्यात येणार नाही या अटीवर त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, मा.जितेंद्र ननावरे व मा.दत्तात्रय साने यांची, मा.महेश लांडगे व मा.तानाजी खाडे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७४५ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१अ/कावि/६२३/०९ दि.२९.९.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१७३ दिनांक २०/११/२००९

महापालिका आस्थापनेवरील आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी अभिनामाचे पद महापालिका कर्मचा-यांमधुन भरणेकरिता पदोन्नती अर्हता, “पदोन्नतीने - १) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. २) समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणे आवश्यक ३)महापालिकेच्या आरोग्य विभागातील आरोग्य निरीक्षक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचा-यांमधुन सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देवुन.४) महापालिकेच्या नागरी कुटुंब कल्याण केंद्रातील कामकाजाचा किमान २ वर्षांचा अनुभव”,याप्रमाणे निश्चीत करणेस तसेच आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी हे पद वर्ग २ चे असुन महापालिकेतील वर्ग २ च्या तत्सम पदांना र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० अशी वेतनश्रेणी असलेने वरील पदासहि र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे र.रु.४४०० या वेतनश्रेणी ऐवजी र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे र.रु.५४०० अशी वेतनश्रेणी लागू करणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गातील १२ वर्ष सेवा पुर्ण करणाऱ्या व झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा जेष्ठतेप्रमाणे पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) या अभिनामाची पदे शासन मंजूर आहेत. सदर पदांची शैक्षणिक अर्हता पुढील प्रमाणे आहे. १) मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस.पदवी उत्तीर्ण, २) इंटर्नशिप पुर्ण व राज्य मेडीकल कॉन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक ३) शासकीय/ निमशासकीय रुग्णालयामधील ०७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. सबब वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) या

पदाच्या उक्त नमूद केलेल्या अर्हतेमधील क्र.०३ मध्ये नमूद केलेल्या अनुभवाच्या अर्हतेमध्ये ०७ वर्षे याऐवजी ०६ वर्षे अनुभवाची अर्हता उमेदवाराने धारण केलेली असणे आवश्यक आहे असा बदल करण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड शहराचे वाढते औद्योगिकरण व शहरीकरणामुळे दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण लक्षात घेता पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठीच्या प्रकल्पांना केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून विशेष प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारचे पर्यावरण विषयी सर्व तांत्रिक प्रकल्प स्वतंत्रपणे करणेसाठी मा.आयुक्त यांनी नव्याने पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष कार्यान्वित केलेला आहे. सद्यस्थितीत या कक्षाचा कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त पदभार ड्रेनेज विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडे दिलेला आहे. भविष्यातील या कक्षाकडील कामाची व्याप्ती लक्षात घेता या विभागासाठी महापालिकेच्या अस्थापनेवर स्वतंत्र कार्यकारी अभियंता (पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष) या अभिनामाचे पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीत निर्माण करणेस व या पदासाठीची शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी B.E.Civil व पर्यावरण अभियांत्रिकीमधील पदव्यूत्तर पदवी (M.E.Environment) असणे आवश्यक तसेच महानगरपालिकेत उपअभियंता (स्थापत्य) या पदावर कमीत कमी ३ ते ५ वर्षाचा अनुभव असणारे उपअभियंता मधून पदोन्नतीने भरणेस व याप्रमाणे अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिकेमधील रजा राखीव वैद्यकीय अधिकारी व रजा राखीव स्टाफ नर्सेस यांना मा.उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक उसं/आसे/आस्था/मवैआसे/टे-१, दि.२५/०९/२००९ नुसार महापालिका वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्सेसप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यास तसेच शासन अधिसुचना क्र.वेपूर १२०९/प्र.क्र.१५३/सुधारणा-५/सेवा-९ दि.०४ नोव्हेंबर २००९ नुसार वैद्यकीय अधिकारी व दंतशल्य चिकित्सक यांना शासनाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता देणेत येत आहे. संजय बंडोपंत गायकवाड अनुरेखक यांची कौटुंबिक अडचण विचारात घेता, नाशिक महानगरपालिका श्री.गायकवाड यांना त्यांचे आस्थापनेवरील रिक्त पदावर सामावून घेण्यास तयार असेल व तेथिल सक्षम समितीने तसा ठराव पारित केल्यास, श्री.संजय बंडोपंत गायकवाड अनुरेखक यांची सेवा नाशिक महानगरपालिकेकडे वर्ग करणेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हरकत असणार नाही. मात्र अशा प्रकारे सेवा वर्ग झाल्यानंतर त्यांना पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कोणत्याही कारणास्तव वर्ग करुन घेतले जाणार नाही अथवा पुर्ननियुक्ती देण्यात येणार नाही या अटीवर त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/९२४/०९ दि.२५.८.०९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१७९ दिनांक २०/११/२००९

"वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे भरणेकामी गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची सोबतचे परिशिष्ट "अ" येथील प्रवर्गनिहाय निवड यादीमधील उमेदवारांचे नियुक्तीस तसेच निवड यादीमधील उमेदवार विहित मुदतीमध्ये रुजू न झालेस अथवा भविष्यामध्ये जसजशी "वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे रिक्त होतील तेव्हाप्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना "वैद्यकिय अधिकारी" पदावर नेमणुका देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

वैद्यकिय अधिकारी निवड यादी मधील पात्र उमेदवारांपैकी जे उमेदवार उच्च शिक्षण घेत असतील /पदवीव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण करीत असतील अशा उमेदवारांच्या उच्च तंत्र कौशल्याचा/ अर्हतेचा रुग्णांना लाभ होणार असल्याने अशा उमेदवारांस त्यांचा उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम/पदवीव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत मनपा सेवेत वैद्यकिय अधिकारी पदावर रुजु होण्यास आवश्यक ती मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत यावी. १) शासन अधिसूचना दिनांक २ फेब्रुवारी २००९ अन्वये शासन सेवेमध्ये अस्थायी पदांवर कार्यरत असलेले व ज्यांनी दिनांक ३१/१२/२००७ रोजी ०३ वर्षाची सेवा पुर्ण झाली आहे व वैद्यकीय अधिकारी या पदांवर सद्यस्थितीमध्येही कार्यरत आहेत अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कायमस्वरुपी शासन सेवेमध्ये समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. २) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची ड प्रकरण ३-२ मध्ये परंतू नियम ३ मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे. "परंतु नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा अधिकाऱ्याची उक्त पदावर नेमणुक करता येईल" उक्त तरतुदीच्या अनुषंगाने मनपाचे वायसीएम व तालेरा रुग्णालयामध्ये रजा राखीव म्हणून कामकाज करीत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.पखाले डी.जी. हे

दिनांक ११/०२/२००४ व डॉ.श्री.मोसलगी एस.बी. हे (८/८/२००३ ते २७/०३/२००५ शासन सेवेत) व दिनांक २८/०३/२००५ ते आजअखेरपर्यंत मनपा सेवेमध्ये कामकाज करीत आहेत. सबब उक्त नमुद १ व २ मधील नमूद तरतुदींचा विचार करता डॉ.श्री.पखाले डी.जी. व डॉ.मोसलगी एस.बी., यांचे मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या अभिनामाचे रिक्त पदांवर वेतनश्रेणीमध्ये कायमस्वरुपी समावेश करण्यास मान्यता देण्यात यावी. नियुक्तीसाठी निवड यादीनंतर म्हणजेच प्रतिक्षा यादीपुर्वीचे अनुक्रम या वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत काही ग्रामीण भाग समाविष्ठ करण्यात आला आहे. मोशी, दिघी, चिखली, चरोली, तळवडे, बोपखेल या ठिकाणी नवीन दवाखाने (बाह्य रुग्णसेवा) चालू करण्यात येणार आहे. सदर दवाखान्यासाठी नवीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची गरज वैद्यकीय विभाग म.न.पा. यांना असून सदर गरज लक्षात घेता नवीन वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची पदे प्रतिक्षा यादीतील व मुलाखतीद्वारे भरण्याची व पद निर्मितीत्तोतर शासनाची मान्यता घेणेत यावी. वैद्यकीय विभागातर्गत दवाखान्याकरिता अस्थापनेवर प्रतिक्षा यादीतील व मुलाखतीद्वारे ५ (B.A.M.S.) पदास मान्यता देणेत यावी.

मा.मनोज खानोलकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, गेल्या वर्षभरापासून आम्ही आमच्या वॉर्ड साठी ओपीडी चालू करावी असा आयुक्तांकडे पाठपुरावा करत होतो. गेल्या महिन्यात ओपीडीचे उद्घाटन केलेले आहे. दुर्दैव असे आहे की, याठिकाणी वैद्यकीय अधिकारी दिसत नाहीत, अजून त्याठिकाणी स्टाफ नेमलेला नाही, याबाबत पाठपुरावा करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते. महापौरांनी,आयुक्तांनी डॉ.नागकुमार साहेबांना त्याठिकाणी स्टाफ केव्हा रुजू होईल हे विचारावे व याचा खुलासा करावा.

मा.महापौर :- आपल्या सूचनेची नोंद घेतलेली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७४६ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/९२४/०९ दि.२५.८.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१७९ दिनांक २०/११/२००९

"वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे भरणेकामी गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची सोबतचे परिशिष्ट "अ" येथील प्रवर्गनिहाय निवड यादीमधील उमेदवारांचे नियुक्तीस तसेच निवड यादीमधील उमेदवार विहित मुदतीमध्ये रुजू न झालेस अथवा भविष्यामध्ये जसजशी "वैद्यकिय अधिकारी" अभिनामाची पदे रिक्त होतील तेव्हाप्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना "वैद्यकिय अधिकारी" पदावर नेमणुका देण्यास तसेच वैद्यकिय अधिकारी निवड यादी मधील पात्र उमेदवारांपैकी जे उमेदवार उच्च शिक्षण घेत असतील /पदवीव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण करीत असतील अशा उमेदवारांच्या उच्च तंत्र कौशल्याचा/ अर्हतेचा रुग्णांना लाभ होणार असल्याने अशा उमेदवारांस त्यांचा उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम/पदवीव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत मनपा सेवेत वैद्यकिय अधिकारी पदावर रुजु होण्यास आवश्यक ती मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे. १) शासन अधिसूचना दिनांक २ फेब्रुवारी २००९ अन्वये शासन सेवेमध्ये अस्थायी पदांवर कार्यरत असलेले व ज्यांनी दिनांक ३१/१२/२००७ रोजी ०३ वर्षाची सेवा पुर्ण झाली आहे व वैद्यकीय अधिकारी या पदांवर सद्यस्थितीमध्येही कार्यरत आहेत अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कायमस्वरुपी शासन सेवेमध्ये समावेश करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. २) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची ड प्रकरण ३-२ मध्ये परंतू नियम ३ मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे. "परंतु नियम ३ अन्वये विहित केलेली अर्हता धारण करणारा नगरपालिकेच्या सेवेतील कोणताही अधिकारी हा उक्त पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य अशी व्यक्ती आहे असे महानगरपालिकेचे मत असेल तर, महानगरपालिकेस या नियमात विहित केलेली पध्दती न अनुसरता अशा अधिकाऱ्याची उक्त पदावर नेमणुक करता येईल" उक्त तरतुदीच्या अनुषंगाने मनपाचे वायसीएम व तालेरा रुग्णालयामध्ये रजा राखीव म्हणून कामकाज करीत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री.पखाले डी.जी. हे दिनांक ११/०२/२००४ व डॉ.श्री.मोसलगी एस.बी. हे (८/८/२००३ ते २७/०३/२००५ शासन सेवेत) व दिनांक २८/०३/२००५ ते आजअखेरपर्यंत मनपा सेवेमध्ये कामकाज करीत आहेत. सबब उक्त नमुद १ व २ मधील नमूद तरतुदींचा विचार करता डॉ.श्री.पखाले डी.जी. व डॉ.मोसलगी एस.बी.,यांचे मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या अभिनामाचे रिक्त पदांवर वेतनश्रेणीमध्ये कायमस्वरुपी समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नियुक्तीसाठी निवड यादीनंतर म्हणजेच प्रतिक्षा यादीपुर्वीचे अनुक्रम या वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत काही ग्रामीण भाग समाविष्ठ करण्यात आला आहे. मोशी, दिघी, चिखली, चरोली, तळवडे, बोपखेल या ठिकाणी नवीन दवाखाने (बाह्य रुग्णसेवा) चालू करण्यात येणार आहे. सदर दवाखान्यासाठी नवीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची गरज वैद्यकीय विभाग म.न.पा. यांना असून सदर गरज लक्षात घेता

नवीन वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची पदे प्रतिक्षा यादीतील व मुलाखतीद्वारे भरण्याची व पद निर्मितीत्तोतर शासनाची मान्यता घेणेत यावी. वैद्यकीय विभागातर्गत दवाखान्याकरिता अस्थापनेवर प्रतिक्षा यादीतील व मुलाखतीद्वारे ५ (B.A.M.S.) पदास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ८

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.प्रकाश बाबर, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२०८ दिनांक २०/११/२००९

प्र.क्र.७६ रहाटणी गावठाण भागात इंटरलॉकींग ब्लॉकचे कामास (नि.नो.क्र.२९/ १००-२००७-२००८ नि.र.रु.४०,२३,८६५/-) दि.८/१२/२००८ रोजी कामाचा आदेश देण्यात आलेला असला तरी त्या भागातील नागरिकांची मागणी विचारात घेता व कामाची निकड विचारात घेता अजून कामे करणे आवश्यक असल्याने र.रु.९८,००,०००/- पर्यंतचे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

वार्ड क्र.४२ संभाजीनगर इंटरलॉकींग ब्लॉकची त्याभागातील लोकांची मागणी लक्षात घेता र.रु.१,००,००,०००/- (एक कोटी) ची प्रशासकीय मान्यता देणेत यावी. वार्ड क्र.२४ बेलठिकानगर, थेरगांव या भागात इंटरलॉकींग ब्लॉक करणेकामी रक्कम रु.६०,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. चिंचवड तानाजीनगर परिसरातील उच्चदाब / लघुदाब वाहिनी काढून भूमिगत केबल टाकणे निविदा क्र.९/२/०६-०७ ह्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च र.रु.७४,१०,०००/- ला मा.महापालिका सभेने ठराव क्र.१८५ दि.७/८/०६ अन्वये मान्यता दिली होती सदर कामाचे अंदाजपत्रकात २४,९३,०००/- ने वाढ होत असलेने सुधारीत खर्च र.रु.९९,०३,०००/- ला सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी. [सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २६.८५% जादा ह्या दराने स्वीकृत झाली असल्याने व म.रा.वि.मंडळाच्या अभियंत्यांकडून आलेल्या सूचनेप्रमाणे

उच्चदाब केबलच्या परिमाणात वाढ झाल्याने कामाच्या खर्चात वाढ होत आहे.] सन २००९-१० स्थापत्य क प्रभाग २ अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करुन तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र . व अ.क्र. | सन २००९-१० तरतुद | सन २००९-१० ची सुधारीत तरतुद | वाढ | घट | शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२६ मध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | वॉर्ड स्तरीय योजना | ३४५/४ | ३,००,००० | २,१५,००० | ० | ८५,००० | २,१५,००० |
| २ | वॉर्ड क्र.२६ क प्रभाग कार्यालय येथील पहिल्या मजल्यावरील श्री.छ.शिवाजी महाराज सभागृहामध्ये श्री.छ.शिवाजी महाराज यांचे छायाचित्र लावणे | किरकोळ दुरुस्ती देखभाल | ० | ० | ४५,००० | ४५,००० | ० | ० |
| ३ | प्रभाग क्र.७ मधील कायनेटीक केअर (टी-९७ समोरील रस्त्यांचे रुंदीकरण केलेल्या भागाचे डांबरीकरण करणे. | किरकोळ दुरुस्ती देखभाल | ० | ० | ४०,००० | ४०,००० | ० | ० |

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.कैलास थोपटे :- मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

मा.महापौर :- वाढीव खर्चाचे विषय बंद केले आहेत. प्रशासकीय विषय विधी समितीसमोर येऊ द्यावेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ला माझा विरोध नाही. आयुक्त ज्यावेळी नवीन होते त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, वाढीव विषयांना मंजूरी देणार नाही. माझ्या वॉर्डातील ५० लाखाच्या कामावर आजपर्यंत इम्प्लिमेंट केलेले नाही. दीड लाखाच्या विषयाला ५० लाखाच्या वाढीव कामाच्या सूचनेला स्थायी समितीतून मंजूरी दिलेली आहे. वाढीव खर्चाच्या सूचनांचे नॉर्मस् असतील तर एक नियम फिक्स असावा.

मा.महापौर :- हा विषय सदस्यांचा आहे. मंजूरी द्यायची का नाही हे आपण ठरवायचे आहे. ठराव इम्प्लिमेण्ट करायचा का नाही ते आयुक्त ठरवतील.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, वर्षभरात वाढीव सूचना दिल्याच नाहीत का. एका सदस्याला नाही म्हणायचे आणि दुसऱ्याने वाढीव सूचना द्यायच्या. एकदा

वाढीव सूचनांना नाही सांगितले तर वाढीव सूचना द्यायच्या नाहीत. ५० लाखांच्या वाढीव सूचना दिल्या जातात. माझे ठराव पेंडींग आहेत ते ॲप्रूव्ह केले पाहीजेत.

मा.महापौर :- सदस्य प्रस्ताव आहे

मा.आर.एस.कुमार :-मा.महापौर साहेब, आत्ता २ कोटीं वाढीवचे ठराव इम्प्लिमेण्ट करणार नाहीत का. What is principal of the administration.

मा.महापौर :- तुमचा अधिकार आहे. तुमचे हक्क डावलण्याची इच्छा नाही.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, काही ठराव इम्प्लिमेण्ट केलेले आहेत. स्थायी समितीमध्ये ५० लाखाचा वाढीवचा विषय मंजूर झाला आहे त्याची कार्यवाही तुम्ही करणार नाही का. काही लोकांचे वाढीवचे विषय मंजूर करतात, काही लोकांचे करत नाहीत हे योग्य आहे का.

मा.आयुक्त :- आपण ठरावाबद्दल उल्लेख केला, त्याबद्दल मला माहिती नाही. हा विषय बजेटमध्ये तरतूद असेल तरी वाढीव असेल तर होणार नाही. वाढीवसाठी प्रोव्हिजन नसेल तर होणार नाही. पाणीपुरवठ्याचे काम आहे. १०० मी. चे काम राहीले आहे. त्यावेळी तसा डिसिजन घेतो आहोत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डात ५०% इंटरलॉकींग केलेले आहे, ५०% केलेले नाही.

मा.आयुक्त :- त्याबद्दल मला आत्ता सांगता येणार नाही.

मा.महापौर :- आत्ता सदस्यांनी ज्या वाढीव खर्चाच्या सूचना मांडल्या आहेत, त्या इम्प्लिमेण्ट होणार नाहीत. कुठल्या हेडवरुन पैसे कमी केले ते स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे प्रस्ताव देऊन सुद्धा उपयोग नाही.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :-७४७ | विषय क्रमांक :- ८ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ - १) मा.प्रकाश बाबर, मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२०८ दिनांक २०/११/२००९

प्र.क्र.७६ रहाटणी गावठाण भागात इंटरलॉकींग ब्लॉकचे कामास (नि.नो.क्र.२९/ १००-२००७-२००८ नि.र.रु.४०,२३,८६५/-) दि.८/१२/२००८ रोजी कामाचा आदेश देण्यात आलेला असला तरी त्या भागातील नागरिकांची मागणी विचारात घेता व कामाची निकड विचारात घेता अजून कामे करणे आवश्यक असल्याने र.रु.९८,००,०००/- पर्यंतचे सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. वार्ड क्र.४२ संभाजीनगर इंटरलॉकींग ब्लॉकची त्याभागातील लोकांची मागणी लक्षात घेता र.रु.१,००,००,०००/- (एक कोटी) ची प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. वार्ड क्र.२४ बेलठिकानगर, थेरगांव या भागात इंटरलॉकींग ब्लॉक करणेकामी रक्कम रु.६०,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. चिंचवड तानाजीनगर परिसरातील उच्चदाब / लघुदाब वाहिनी काढून भूमिगत केबल टाकणे निविदा क्र.९/२/०६-०७ ह्या कामाचे अंदाजपत्रकीय खर्च र.रु.७४,१०,०००/- ला मा.महापालिका सभेने ठराव क्र.१८५ दि.७/८/०६ अन्वये मान्यता दिली होती सदर कामाचे अंदाजपत्रकात २४,९३,०००/- ने वाढ होत असलेने सुधारीत खर्च र.रु.९९,०३,०००/- ला सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. [सदर कामाची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २६.८५% जादा ह्या दराने स्वीकृत झाली असल्याने व म.रा.वि.मंडळाच्या अभियंत्यांकडून आलेल्या सूचनेप्रमाणे उच्चदाब केबलच्या परिमाणात वाढ झाल्याने कामाच्या खर्चात वाढ होत आहे.] सन २००९-१० स्थापत्य क प्रभाग २ अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करुन तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र . व अ.क्र. | सन २००९-१० तरतुद | सन २००९-१० ची सुधारीत तरतुद | वाढ | घट | शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२६ मध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | वॉर्ड स्तरीय योजना | ३४५/४ | ३,००,००० | २,१५,००० | ० | ८५,००० | २,१५,००० |
| २ | वॉर्ड क्र.२६ क प्रभाग कार्यालय येथील पहिल्या मजल्यावरील श्री.छ.शिवाजी महाराज सभागृहामध्ये श्री.छ.शिवाजी महाराज यांचे छायाचित्र लावणे | किरकोळ दुरुस्ती देखभाल | ० | ० | ४५,००० | ४५,००० | ० | ० |
| ३ | प्रभाग क्र.७ मधील कायनेटीक केअर (टी-९७ समोरील रस्त्यांचे रुंदीकरण केलेल्या भागाचे डांबरीकरण करणे. | किरकोळ दुरुस्ती देखभाल | ० | ० | ४०,००० | ४०,००० | ० | ० |

अनुकूल - ७० प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------------------

मा.महापौर :-  डॉ.नागकुमार साहेब,  थोपटे यांचा प्रश्न होता, त्यांच्या वॉर्डातील ओपीडीसाठी डॉक्टर्स ॲव्हेलेबल करत नाहीत.

मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, रहाटणी आणि इतर ग्रामीण भागात दवाखाने सुरु करायचे आहेत.  त्यासाठी डॉक्टरांच्या मुलाखती झालेल्या आहेत. अंदाजे एक महिन्याच्या आत कर्मचारी रुजू होतील.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, फुगेवाडीमधील दवाखान्यात तेथील लोकांसाठी संडास,बाथरुमची सोय नाही. त्याठिकाणी एक रुम आहे तेथे संडास,बाथरुम बांधुन द्यावे म्हणून क प्रभागामध्ये विषय मंजूर केलेला आहे. त्याठिकाणी डॉ.नागकुमार यांचे सामान पडलेले आहे ते सुध्दा काढलेले नाही. तेथील डॉक्टर्स,नर्सेस संडास,बाथरुमसाठी ५०/- रुपये महिना देवुन दुस-याच्या घरी जातात.

मा.डॉ.कुणचगी :- मा.महापौर साहेब, मी सुध्दा फुगेवाडी दवाखान्यामध्ये काम केलेले आहे. त्याठिकाणी बाथरुमसाठी जागा उपलब्ध केलेली आहे. हे काम स्थापत्य विभागाचे आहे. तेथे पडलेले सामान काढण्याबाबत तेथील डॉक्टरांनी मला सांगीतलेले नाही.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, डॉक्टर साहेब त्याठिकाणी होते ती परिस्थिती वेगळी होती व आताची परिस्थिती वेगळी आहे. करसंकलन ऑफिसच्या तेथील जागा द्यावी म्हणून तेथील डॉक्टरांनी आपल्याला पत्र सुध्दा दिलेले होते. तुम्ही फक्त बघू म्हणता, सहा-सहा महिन्यानी पत्र दिलेले आहे. तुमचे छोटया छोटया दवाखान्याकडे लक्ष नाही, मोठमोठया दवाखान्याकडे लक्ष आहे.

मा.महापौर :- सुरदास गायकवाड तुम्ही प्रभागामार्फत करु शकता. डॉ.नागकुमार त्याठिकाणचा पसारा तीन दिवसाच्या आत मोकळा करावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७४८ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.तानाजी खाडे,मा.काळुराम पवार,मा.उत्तम हिरवे, मा.मच्छिंद्र तापकीर यांचा  प्रस्ताव..
२) मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीकडील ठ.क्र.२३ दिनांक २.१२.२००९

से.क्र.२२ निगडी येथे JNNURM अंतर्गत मोठया प्रमाणावर निवासी गाळे बांधणेत येत आहेत. सदर गाळेधारकांसाठी सदर ठिकाणी १०० बेडचे अद्यावत हॉस्पिटल बांधणे आवश्यक आहे. सदर काम JNNURM अंतर्गत करणेस मान्यता मिळाली आहे तथापि त्यास शासनाने मान्यता दिली नाही. त्यामुळे सदरचे काम मनपा फंडातुन करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, २५ कोटीचे प्रपोजल आहे. हे JNNURM अंतर्गत आहे. त्यामध्ये रस्ते,स्ट्रीटलाईट आहेत. महाराष्ट्र शासनाकडून रेकमण्ड होऊन मंजूरीला गेले आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७४९ विषय क्रमांक :- १०

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे,मा.मच्छिंद्र तापकीर, मा.काळुराम पवार यांचा प्रस्ताव..

२) मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समितीकडील ठ.क्र.२४ दिनांक २.१२.२००९

यापुर्वी झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण व समाजकल्याण समितीमार्फत र.रु.५ लक्ष ते ५० लक्ष पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत होती. परंतु मा.महापालिका सभा ठराव क्र.३७१ दि.२०/५/२००८ नुसार मा.प्रभाग समितीस र.रु.१० लाखपर्यंत अधिकार प्रदान केले आहेत. त्यामुळे र.रु. १० लाखपर्यंतच्या कामाचे विषय झोपडपट्टी समितीपुढे येत नाहीत. तरी सदर ठरावात दुरुस्त करुन झोपडपट्टीमध्ये जी कामे केली जातात त्यासाठी स्वतंत्र तरतुद असल्यामुळे सदर कामाच्या अंदाजपत्रकीय र.रु.५ लक्ष ते र.रु.५० लक्ष पर्यंत प्रशासकीय मान्यता देणेचे अधिकार व र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांना झोपडपट्टी सुधार समितीने शिफारस करुन मनपा सभेकडे पाठविणेचे

अधिकार झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण व समाजकल्याण समितीकडे देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर :- वास्तविक पाहता पाच लाखाच्या ऐवजी दहा लाखापर्यंतच्या अधिकाराबाबतचा विषय आपणच पालकमंत्री यांच्याकडे दिलेला होता. त्यांनी आयुक्तांना सूचना केली होती आणि १० लाखापर्यंतचे अधिकार दिले होते.

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब, झोपडपट्टीचे बजेट वेगळे आहे.झोपडपट्टीचे जे विषय आहेत ते झोपडपट्टीमार्फतच यावेत. झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती स्थापन केलेली आहे परंतू त्यामध्ये विषयच नाहीत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सूरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ मी वर पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ११

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/५/२३/२००९ दि.१५/१०/२००९

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३७ दि.२०/११/२००९ अन्वये

विषय :- <u>विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड</u>

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ऐ ऐ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ बाबतचा फेरबदल प्रस्ताव (वैद्यकीय संस्थाबाबत)

संदर्भ :- १. शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.११/०६/०९ रोजीच्या शासन निर्णया सोबतची नोटीस क्र.टिपीएस-२२०८/२९८७/प्र.क्र.१७१९/०९ (पिंपरी चिंचवड) नवि -१३, राजपत्रात प्रसिध्द दि.३०/०७/०९.

२. नियुक्त अधिकारी, तथा उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.विनिनि/पिंचिंमनपा/फेरबदल/कलम ३७ (१) (ऐ ऐ) नियम क्र.एन २.२.३/उसंपुवि/१७३२, दि.४/९/०९.

विषयांकित प्रकरणी शासनाच्या नगर विकास विभागाने संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयान्वये नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे दवाखाना या वापरासाठी नियमानुसार चटई क्षेत्र निर्देशांक पेक्षा ५०% वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे तसेच सदर नियम सहकार तत्वावर सुरु असलेल्या वैद्यकीय संस्थांना देखिल लागु होतील परंतु सदर संस्था आयकर अधिनियम व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत असावेत याबाबतचे फेरबदल पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजुर विकास नियोजन नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ मध्ये सुधारणा करण्यासाठी विषयांकित फेरबदलाची नोटीस प्रसिध्द केलेली आहे. उक्त नोटीसीच्या शासन राजपत्रात प्रसिध्दी पासुन ३० दिवसांच्या मुदतीत नियुक्त अधिकारी यांचेकडे एकही सुचना/हरकत अर्ज दाखल झालेला नसल्याचे संदर्भ पत्र क्र.२ अन्वये कळविलेले आहे. विषयांकित प्रकरणी शासनाकडील दि.३०/०७/०९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झालेली नोटीसीचे अनुषंगाने सदर प्रस्तावाबाबत नियोजन प्राधिकरण या नात्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.सर्वसाधारण सभेचे मत व त्यास मान्यता घेवुन तसा अहवाल सदर पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झालेच्या दिनांकापासुन अधिनियमातील तरतुदीनुसार एक महिन्याच्या विहित मुदतीत पाठविणे बाबत कळविले आहे.सबब, वरीलप्रमाणे फेरबदल संदर्भाने नियोजन प्राधिकरण या नात्याने मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.एकनाथ मोटे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

१) मौजे भोसरी (कासारवाडी) येथील नाशिक फाटा उड्डाणपूल, सर्व्हीस रोड आयलॅंड साठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यास तसेच फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.५७११ दि.०३/२/२००६ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. २) नाशिक फाटा ते मुंबईकडे जाताना महामार्ग व रेल्वे यामधील Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे भूसंपादनास मा.महापालिका सभा ठराव क्र.६०४३, दि.१५/०२/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदर भूसंपादन रद्द करणेबाबत मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३ दि.१९/०९/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. ३) नाशिक फाटा येथील नियोजित उड्डाणपूल व लिंक्ससाठी नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंप पर्यंत ६१.०० मी. व्यतिरिक्त जादा क्षेत्राचे (Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे) भूसंपादन करण्यास तसेच फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र. ७१० दि.२१/०८/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. उक्त मा.महापालिका सभा ठराव

पाहता तसेच नाशिक फाटा येथील उड्डाणपूल व त्यासाठी लिंक्स नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक आहे तसेच सदर पूलामुळे शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडणार आहे. त्यामुळे नाशिक फाटा ते मुंबईकडे जाणाऱ्या व नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे भूसंपादन न करता तेथील नागरीकांच्या रोजी रोटीचा विचार करता पुलाच्या लिंक्ससाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्रापुरतेच मिळकतींचे भूसंपादन करणेकामी व कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.सुषमा गावडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, शासन निर्णयान्वये नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे दवाखाना या वापरासाठी चटई क्षेत्र निर्देशांकपेक्षा ५०% वाढीव निर्देशांक देणे यावर मागील सभेत बोललो होतो. अशा प्रकारच्या किती संस्था आपल्या शहरात आहेत. अशा नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे दवाखाने किंवा संस्थांवर राज्य सरकार किंवा मनपाचे बंधन असणार आहे का, शहरातील नागरीकांवर त्यांनी सवलतीच्या दरात उपचार करावेत. वाय.सी.एम.वर लोड येतो, ६५० बेडचे हॉस्पीटल असले तरी जागा मिळत नाही. असे असताना हे काही सवलतीच्या दराने उपचार करणार आहेत का याचे स्पष्टीकरण दयावे.

मा.पाटिल (उपसंचालक,नगररचना) :- मा.महापौर साहेब,हा नियम नियमावलीत आहे. चॅरीटेबल ट्रस्टसाठी .५ वाढीव FSI देणार आहोत. रेडीरेकनर व्हॅल्यूच्या १५% प्रिमीयम मिळतो. त्यात ५०% शासनाला व ५०% मनपाला देऊन सहकारी तत्वावरच्या मेडीकल ट्रस्टला लागू करण्याचा नियम आहे. आम्ही सहकारी निबंधकांना विचारलेतर असा एकही ट्रस्ट रजिस्टर नाही अशी माहिती मिळालेली आहे.

मा.महापौर :- आपण प्रोव्हीजन करुन ठेवतो आहोत. शासनाने निर्देश दिलेले आहेत. नियमाप्रमाणे १५% प्रिमिअम त्यांनी भरायचा आहे त्याच्या ५०% शासनाला व ५०% आपल्याला आहे. आता फक्त क्लॉज मंजूर करुन घेतो आहोत.

मा.मारुती भापकर:-मा.महापौर साहेब, त्यांच्यावर बंधन असले पाहिजे. वायसीएम मध्ये जागा नसल्यामुळे त्यांच्याकडे पेशंट पाठविलेतर त्यांनी ते घेतले पाहिजेत.

मा.महापौर :-हॉस्पिटल चॅरीटी आहे. नियमामध्ये तसे नसेलतर कायदयामध्ये तसे करुन घ्यावे.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७५० विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/५/२३/२००९ दि.१५/१०/२००९
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३७ दि.२०/११/२००९ अन्वये

विषय :- विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ऐ ऐ) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ बाबतचा फेरबदल प्रस्ताव (वैद्यकीय संस्थाबाबत)

संदर्भ :-१. शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.११/०६/०९ रोजीच्या शासन निर्णया सोबतची नोटीस क्र.टिपीएस-२२०८/२९८७/प्र.क्र.१७१९/०९ (पिंपरी चिंचवड) नवि -१३, राजपत्रात प्रसिध्द दि.३०/०७/०९.
२. नियुक्त अधिकारी, तथा उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.विनिनि/पिंचिंमनपा/फेरबदल/कलम ३७ (१) (ऐ ऐ) नियम क्र.एन २.२.३/उसंपुवि/१७३२, दि.४/९/०९.

विषयांकित प्रकरणी शासनाच्या नगर विकास विभागाने संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयान्वये नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे दवाखाना या वापरासाठी नियमानुसार चटई क्षेत्र निर्देशांक पेक्षा ५०% वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे तसेच सदर नियम सहकार तत्वावर सुरु असलेल्या वैद्यकीय संस्थांना देखिल लागु होतील परंतु सदर संस्था आयकर अधिनियम व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाअंतर्गत नोंदणीकृत असावेत याबाबतचे फेरबदल पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजुर विकास नियोजन नियमावलीमधील नियम क्र.एन २.२.३ मध्ये सुधारणा करण्यासाठी विषयांकित फेरबदलाची नोटीस प्रसिध्द केलेली आहे. उक्त नोटीसीच्या शासन राजपत्रात प्रसिध्दी पासुन ३० दिवसांच्या मुदतीत नियुक्त अधिकारी यांचेकडे एकही सुचना/हरकत अर्ज दाखल झालेला नसल्याचे संदर्भ पत्र क्र.२ अन्वये कळविलेले आहे. विषयांकित प्रकरणी शासनाकडील दि.३०/०७/०९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झालेली नोटीसीचे अनुषंगाने सदर

प्रस्तावाबाबत नियोजन प्राधिकरण या नात्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.सर्वसाधारण सभेचे मत व त्यास मान्यता घेवुन तसा अहवाल सदर पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झालेच्या दिनांकापासुन अधिनियमातील तरतुदीनुसार एक महिन्याच्या विहित मुदतीत पाठविणे बाबत कळविले आहे.

सबब, वरीलप्रमाणे फेरबदल संदर्भाने नियोजन प्राधिकरण या नात्याने मान्यता देणेत येत आहे. १) मौजे भोसरी (कासारवाडी) येथील नाशिक फाटा उड्डाणपूल, सर्व्हीस रोड आयलँड साठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यास तसेच फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.५७११ दि.०३/२/२००६ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. २) नाशिक फाटा ते मुंबईकडे जाताना महामार्ग व रेल्वे यामधील Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे भूसंपादनास मा.महापालिका सभा ठराव क्र.६०४३, दि.१५/०२/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदर भूसंपादन रद्द करणेबाबत मा.महापालिका सभा ठराव क्र.४३३ दि.१९/०९/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. ३) नाशिक फाटा येथील नियोजित उड्डाणपूल व लिंक्ससाठी नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंप पर्यंत ६१.०० मी. व्यतिरिक्त जादा क्षेत्राचे (Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे) भूसंपादन करण्यास तसेच फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र. ७१० दि.२१/०८/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. उक्त मा.महापालिका सभा ठराव पाहता तसेच नाशिक फाटा येथील उड्डाणपूल व त्यासाठी लिंक्स नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक आहे तसेच सदर पूलामुळे शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडणार आहे. त्यामुळे नाशिक फाटा ते मुंबईकडे जाणाऱ्या व नाशिक फाटा ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत Un-buildable होणाऱ्या मिळकतींचे भूसंपादन न करता तेथील नागरीकांच्या रोजी रोटीचा विचार करता पुलाच्या लिंक्ससाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्रापुरतेच मिळकतींचे भूसंपादन करणेकामी व कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १२

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/२क/९० /२००९ दि.१८/११/२००९

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील स.नं.९४, ९५, ९६ पै. या मिळकती सन १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट करण्यात आलेल्या भागात आहेत. सदर वर्ग झालेल्या मिळकती शेती विभागात दर्शविण्यात आलेल्या आहेत.

भोसरी येथील स.नं.९४, ९५ व ९६ या जमिन मिळकतीमधील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट केलेले नाशिक रोड लगतचे क्षेत्र शेती विभागातून वगळून निवासी विभागात वर्ग करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा.महापालिका सभा ठरावानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. पुणे नाशिक महामार्ग हा बी.आर.टी.मार्ग असल्याने व सदर भागात जवळपास पार्किंगचे आरक्षण नसल्याने मा.महापालिका सभेने पारित केलेल्या ठरावानुसार (ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९) स.नं.९४, ९५ व ९६ या मिळकती शेती विभागातून रहिवास विभागात समाविष्ट करताना नियोजनाच्या दृष्टीने सदर मिळकतीमध्ये नाशिक रोड लगत सद्यस्थितीमध्ये खुल्या क्षेत्रात सुमारे ०.५० हेक्टर क्षेत्रावर "पार्किंग" साठी आरक्षण प्रस्तावित करुन उर्वरित क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास व कार्यवाही पुर्ण झाल्यावर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

यापुर्वी महापालिका सभा ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९ अन्वये यापुर्वीच भोसरी येथील सर्व्हे नं.९४, ९५ व ९६ या जमीन मिळकती शेती विभागातुन वगळुन निवासी विभागात समाविष्ट करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे. सदर मनपा सभा ठराव क्र.६६४ दि.३/६/२००९ चा अंतिम करुन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात

यावी व प्रस्तुत विषयामध्ये स.नं.९४, ९५ व ९६ या जमीन मिळकती मधील रस्त्यालगतचे ०.५० हेक्टर क्षेत्र पार्किंगसाठी आरक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव फेटाळून दि.०३/०६/०९ रोजीचा मनपा सभा ठराव क्र.६६४ अन्वयेच सदर जमीन मिळकती शेती विभागातुन निवासी विभागात वर्ग/समाविष्ठ करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, स.नं.९४,९५,९६ या मिळकती ग्रीन झोनमधुन यलो झोन करण्याचा विषय आहे. बीआरटीसाठी पार्किंगचे रिझर्व्हेशन आहे. बीआरटीचे काही नॉर्म्स आहेत का. भोसरीमध्ये पार्किंगची दुरावस्था आहे,ट्रॅफिकचा प्रॉब्लेम आहे. बीआरटी करत असताना आपण काही पार्किंगचे क्षेत्र दाखवले आहे तरी हे पार्किंग बीआरटी मध्ये आहे का याचा खुलासा करावा.

मा.पाटिल (उपसंचालक,नगररचना) :- मा.महापौर साहेब,हा जो एरिया आहे तो आठ एकरचा आहे. नाशिक रोडपासून भोसरी ऑडोटोरीअम मधील ऐरिया आहे. मुळ ठराव ग्रीन टू यलोचा होता. त्याठिकाणी पार्किंगसाठी आरक्षण आवश्यक आहे म्हणून विषय आलेला आहे.

मा.महापौर :- आयुक्त साहेबांचा विषय पार्किंग असावे असा आहे, महेश लांडगे यांनी सगळा भाग निवासी भागामध्ये समाविष्ट करावा अशी उपसूचना केली आहे.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, भोसरी येथील स.नं.९४,९५,९६ चा विषय आहे. सीएमई मध्ये शेतक-यांच्या जमिनी गेल्या आहेत, प्राधिकरणानेही ॲक्वायर केल्या आहेत. आता प्राधिकरणाच्या भरपूर जागा शिल्लक आहेत. प्राधिकरण क्षेत्रामध्ये पार्किंग झोन करुन शेतक-यांच्या जमिनी निवासी केल्यातर शेतक-यांना फायदा होईल. पुर्वीचा ठराव आहे तसा कायम करावा. पार्किंग झोन कॅन्सल करण्यात यावा.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, आमचा आक्षेप नोंदवावा.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, माझा आक्षेप नोंदवावा.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७५१ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/२क/९०/२००९ दि.१८/११/२००९

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील स.नं.९४, ९५, ९६ पै. या मिळकती सन १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट करण्यात आलेल्या भागात आहेत. सदर वर्ग झालेल्या मिळकती शेती विभागात दर्शविण्यात आलेल्या आहेत.

भोसरी येथील स.नं.९४, ९५ व ९६ या जमिन मिळकतीमधील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट केलेले नाशिक रोड लगतचे क्षेत्र शेती विभागातून वगळून निवासी विभागात वर्ग करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा.महापालिका सभा ठरावानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे.

पुणे नाशिक महामार्ग हा बी.आर.टी.मार्ग असल्याने व सदर भागात जवळपास पार्किंगचे आरक्षण नसल्याने मा.महापालिका सभेने पारित केलेल्या ठरावानुसार (ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९) स.नं.९४, ९५ व ९६ या मिळकती शेती विभागातून रहिवास विभागात समाविष्ट करताना नियोजनाच्या दृष्टीने सदर मिळकतीमध्ये नाशिक रोड लगत सद्यस्थितीमध्ये खुल्या क्षेत्रात सुमारे ०.५० हेक्टर क्षेत्रावर "पार्किंग" साठी आरक्षण प्रस्तावित करुन उर्वरित क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास व कार्यवाही पुर्ण झाल्यावर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली असली तरी यापुर्वी महापालिका सभा ठराव क्र.६६४ दि.०३/०६/२००९ अन्वये यापुर्वीच भोसरी येथील सर्व्हे नं.९४, ९५ व ९६ या जमीन मिळकती शेती विभागातुन वगळुन निवासी विभागात समाविष्ट करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे. सदर मनपा सभा ठराव क्र.६६४ दि.३/६/२००९ चा अंतिम करुन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी व प्रस्तुत विषयामध्ये स.नं.९४, ९५ व ९६ या जमीन मिळकती मधील रस्त्यालगतचे ०.५० हेक्टर क्षेत्र पार्किंगसाठी आरक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव फेटाळून दि.०३/०६/०९ रोजीचा मनपा सभा ठराव क्र.६६४ अन्वयेच सदर जमीन मिळकती शेती विभागातुन निवासी विभागात वर्ग / समाविष्ठ करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ६८ प्रतिकूल -२

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७५२ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दिनांक ०४/०९/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दिनांक १८/९/२००९,३/१०/२००९,६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दिनांक ३/१०/२००९,६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) दिनांक १६/१०/२००९, ६/११/२००९, १३/११/२००९ व २०/११/२००९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
इ) दिनांक ६/११/२००९,१३/११/२००९ व २०/११/२००९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
फ) दिनांक २०/११/२००९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल - ७० प्रतिकूल -०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा. शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७५३ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

दि.०९/०९/०९ व १४/१०/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७०　　　　　　　　　　　　　प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा. शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७५४　　　　　　　　　　　　विषय क्रमांक :- १५

दिनांक :- २१.१२.२००९　　　　　　　　　　　विभाग :- मा.नगरसचिव

मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

अ) दि.२०/०८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०२/०९/०९, १६/०९/०९, ०७/१०/०९, २१/१०/०९, ०४/११/०९ व १८/११/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७०　　　　　　　　　　　　　प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७५५　　　　　　　　विषय क्रमांक :- १६

दिनांक :- २१.१२.२००९　　　　　　　विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

दि.२/९/०९, १६/९/०९ व ७/१०/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७०　　　　　　　　　　　　　प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.सुषमा गावडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ७५६ | विषय क्रमांक :- १७ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.गावडे सुषमा गोविंद व मा.सावळे सिमा यांचा दि.५/८/२००९ चा प्रस्ताव
२) मा. क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२७९ दि.५/८/२००९

वॉर्ड क्र.१०० कासारवाडी मधील मौजे भोसरी येथील आरक्षण क्र.२० बेघरांसाठी घरे या आरक्षणावर बऱ्याच वर्षापासून गरीब नागरिकांची घरे आहेत. सदर नागरिक महापालिकाचा कर देखील भरत आहेत. तसेच सदर आरक्षणावरील नागरिकांना बेघर करुन बेघरांसाठी घरे बांधणे मानवतेच्या दृष्टीकोनातून योग्य होणार नाहीत. तरी सदरचे आरक्षण रद्द करणेची कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुनंदा फुगे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देते.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, अशा अनेक जागा आहेत. शहरामध्ये बेघरांसाठी घरांचे आरक्षण आहे. शहरामध्ये अशी आरक्षणे किती आहेत आणि त्याठिकाणी सद्यस्थितीमध्ये किती जागेवर अतिक्रमण सुरु आहे,किती जागेवर पुर्वी अतिक्रमण झालेले आहे. ही जी जागा आहे त्याठिकाणी सद्यस्थितीमध्ये घरे आहेत. ते लोक बेघर होवू नयेत. आणखी किती लोकांचे पुनर्वसन करु शकता याचा खुलासा करावा.

मा.महापौर :- हा विषय सन्मा.सदस्यांचा आहे. मुळात जी घरे झालेली आहेत तेथे आरक्षण कशासाठी होते हे बघावे लागते. कलम ३७ अन्वये फेरबदल करुन तसे मंजूर करायला पाहिजे होते. अशी मंजूरी दिलीतरी काही होणार नाही हे आपल्याला माहित आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १८

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/पिंप/०८/०९ दि.०९/०९/०९ चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२८२ दि.४/११/२००९

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे मौजे पिंपरी येथील स.नं.१०३ पै., १०५ पै. (पिंपरी नेहरुनगर रस्त्यापासुन महेशनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगतची) जमीन भाजी मंडई (मटण, मासळी मार्केट) करिता आरक्षित करणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे पिंपरी येथील स.नं.१०३ पै., १०५ पै.(पिंपरी नेहरुनगर रस्तापासुन महेशनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगतची) जमीन भाजी मंडई (मटण, मासळी मार्केट) करिता आरक्षित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३३५ दिनांक १८/०३/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने नागरिकांच्या हरकती / सूचना राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने व मिळकतधारक म्हणून त्यांना देण्यात आलेले इकडील दि.२२/१२/०८ च्या पत्राच्या अनुषंगाने कंपनी सेक्रटरी एच.ए.कंपनी यांची हरकत प्राप्त झालेली होती. सदर हरकतीवर दिनांक १०/६/०९ रोजी सुनावणी देण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान कंपनीने लेखी म्हणणे मांडले. त्यावर प्रपत्रात प्रशासनाचे अभिप्राय नमूद केलेले आहेत. आता सदर प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

ठराव क्रमांक ४३३ दिनांक १९/०९/२००८ विषय क्रमांक ४ सभा क्रमांक २४ अन्वये केलेल्या ठरावाअनुसारच कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत असून दिनांक २१/०८/२००९ ठराव क्रमांक ७१० अन्वये दिलेली उपसुचना फेटाळण्यात येत आहे. तरी पुर्वीच्या ठरावाप्रमाणेच कार्यवाही होणेस मान्यता देण्यात यावी. सदर अतिरिक्त लागणाऱ्या जागेसाठी महापालिका सभेच्या मान्यतेशिवाय भूसंपादनाकरिता व संयुक्त मोजणीकरिता लागणारी रक्कम अदा करु नये व तसे आदेश दिले असल्यास या ठरावाच्या अनुषंगाने रद्द करण्यात यावेत अशी मान्यता

देण्यात यावी. सद्यपरिस्थितीमध्ये नाशिक फाटा उड्डाणपुलासाठीच्या लिंक्ससाठी ६१.० मी. पुणे-मुंबई महामार्गा व्यतिरिक्त जादा आवश्यक असणाऱ्या २ ते २.५० मी. क्षेत्रासाठीच भुसंपादनाची कार्यवाही करण्यात यावी. त्याव्यतिरिक्त इतर Unbuildable मिळकतीचे भुसंपादन नव्याने सुरु करण्यात येऊ नये व यापुर्वी सुरु करण्यात आलेल्या Unbuildable मिळकतीचे भुसंपादन रद्द करण्यात यावे व त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्यास या ठरावाच्या अनुषंगाने रद्द करण्यात यावेत अशी मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार पिंपरी कॅम्प येथील साई चौक ते राधीका चौक लगतचे नाल्या पर्यंतचे क्षेत्र हे आरक्षण क्र.१४१ नुसार झोपडपट्टी पुर्नवसन यासाठी आरक्षित आहे. तरी साई चौक ते राधीका चौक नाल्यापर्यंतचे १८.०० मी. रुंद रस्त्याला लागून बहुतांश क्षेत्र हे छोटे छोटे दुकान गाळे व्यवसायीकांचे आहे. या दुकान / गाळे धारकांसाठी सुमारे ४० फुट रुंदीची रस्त्यालगतचे क्षेत्र हे वाणिज्य / व्यापारी वापरासाठी कायम स्वरुपी ठेवणे आवश्यक आहे. तरी आरक्षण क्र.१४१ पैकी शिवाजी रस्त्यालगतचे (१८.०० मी.रुंद) साई चौक ते राधीका चौक नाल्यापर्यंतचे ४० फुट रुंदीचे (Depth) क्षेत्र झोपडपट्टी पुर्नवसन आरक्षणातुन वगळुन वाणिज्य/व्यापारी वापरासाठी प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत यावी. मौजे भोसरी येथील आ.क्र.४२२ मधील एकूण क्षेत्र ०.७८ हेक्टर पैकी ०.४० हेक्टर क्षेत्राकरीता नाट्यगृह व व्यापारी संकूल व उर्वरीत क्षेत्रावर बस टर्मिनस असा फेरबदल करण्याचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेत येऊन त्यास मा.महापालिकासभा ठराव क्र.४९०३ दि.१६.०६.०३ अन्वये मान्यता देणेत येऊन या बदलास अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन (पी.सी.एम.टी.) यांनी त्यांचेकडील दि.०२.०६.०३ व दि.१४.०७.०३ रोजीच्या पत्रान्वये मा.परिवहन समिती ठराव क्र.१०७८ दि.०७.०४.०३ अन्वये पुढील मान्यता दिली होती. तद्नंतर कलम ३७ अन्वयेची विहीत कार्यवाही पुर्ण झालेनंतर मा.महापालिका ठराव क्र.५१८७-अ, दि.०७.०५.०४ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार सदर फेरबदलाचा प्रस्ताव महापालिकेकडील पत्र क्र.नरवि/कावि/भो/१०१/०४, दि.२२.०६.०४ अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर करणेत आले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस/१८०४/१३९७प्र.क्र.१४९८/०८ नवि-१३, दि.१८.०८.०९ अन्वये अधिसूचना पारित करताना शासनाने म.न.पा.महापालिका सभेने मंजूर केलेनुसार बदलास मंजूरी न देता पुढील अटींवर बदलण्यास मान्यता दिली आहे.

१) मुळ आरक्षणा खालील संपुर्ण तळमजल्याचे क्षेत्र बस सर्व्हिससाठी अनुज्ञेय राहील.
२) पहिल्या मजल्यावरील ४००० चौ.मी.क्षेत्र नाट्यगृहासाठी अनुज्ञेय राहील.
३) त्यावरील मजल्याचे क्षेत्र व्यापारी संकुलासाठी अनुज्ञेय राहील.

तथापि, शासनाने मंजूरी दिलेनुसार सदरचा प्रकल्प वरच्या मजल्यावर नाट्यगृह व त्यावरच्या मजल्यावर व्यापारी संकुल असा विकसीत केल्यास व्यापारी संकुल वापरण्यास गैरसोईचे होणार असल्याने प्रतिसाद मिळणार नाही तसेच मनपास विकसीत करण्यात अडचणी आहेत. बस टर्मिनससाठी आरक्षीत जागा PMPML यांचेसाठी असल्याने व दोन्ही संस्था वेगवेगळ्या असल्याने सदरचा प्रकल्प एकत्रित विकसीत करता येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे मनपाच्या या पुर्वीच्या प्रस्तावान्वये मंजूरी मिळाल्यास नाट्यगृह व व्यापारी संकुल साठीची आरक्षीत जागा मनपा मार्फत स्वतंत्रपणे विकसीत करता येणे शक्य आहे.

तरी आरक्षण बदलाबाबत प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने शासनाने दिलेल्या मान्यतेचा फेरविचार करून यापुर्वी महापालिका सभा ठराव क्र.५१८७-अ, दि.७/५/०४ च्या मुळ मंजूर ठरावानुसार मौजे भोसरी येथील प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नं.६९५/१ पैकी आरक्षण क्र.४२२ पी.सी.एम.टी. बस टर्मिनस-क्षेत्र ०.३८ हेक्टर व नाट्यगृह व व्यापारी संकुल-क्षेत्र ०.४० हेक्टर अशी फेरबदलाची विहीत कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील कार्यवाही करणेस व फेरबदलास फेरमान्यतेसाठी शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेत यावी.

मा.डब्बू आसवाणी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ७५७ विषय क्रमांक :- १८
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/पिंप/०८/०९ दि.०९/०९/०९ चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२८२ दि.४/११/२००९

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करणे
मौजे पिंपरी येथील स.नं.१०३ पै., १०५ पै. (पिंपरी नेहरुनगर रस्त्यापासुन महेशनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगतची) जमीन भाजी मंडई (मटण, मासळी मार्केट) करिता आरक्षित करणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे पिंपरी येथील स.नं.१०३ पै., १०५ पै.(पिंपरी नेहरुनगर रस्तापासुन महेशनगरकडे जाणाऱ्या रस्त्यालगतची) जमीन भाजी मंडई (मटण, मासळी मार्केट) करिता

आरक्षित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मा.महापालिका सभेने ठराव क्र.३३५ दिनांक १८/०३/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने नागरिकांच्या हरकती / सूचना राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने व मिळकतधारक म्हणून त्यांना देण्यात आलेले इकडील दि.२२/१२/०८ च्या पत्राच्या अनुषंगाने कंपनी सेक्रटरी एच.ए.कंपनी यांची हरकत प्राप्त झालेली होती. सदर हरकतीवर दिनांक १०/६/०९ रोजी सुनावणी देण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान कंपनीने लेखी म्हणणे मांडले. त्यावर प्रपत्रात प्रशासनाचे अभिप्राय नमूद केलेले आहेत. आता सदर प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव क्रमांक ४३३ दिनांक १९/०९/२००८ विषय क्रमांक ४ सभा क्रमांक २४ अन्वये केलेल्या ठरावाअनुसारच कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत असून दिनांक २१/०८/२००९ ठराव क्रमांक ७१० अन्वये दिलेली उपसुचना फेटाळण्यात येत आहे. तरी पुर्वीच्या ठरावाप्रमाणेच कार्यवाही होणेस मान्यता देण्यात येत आहे. सदर अतिरिक्त लागणाऱ्या जागेसाठी महापालिका सभेच्या मान्यतेशिवाय भूसंपादनाकरिता व संयुक्त मोजणीकरिता लागणारी रक्कम अदा करु नये व तसे आदेश दिले असल्यास या ठरावाच्या अनुषंगाने रद्द करण्यात यावेत अशी मान्यता देण्यात येत आहे. सद्यपरिस्थितीमध्ये नाशिक फाटा उड्डाणपुलासाठीच्या लिंक्ससाठी ६१.० मी. पुणे-मुंबई महामार्गा व्यतिरिक्त जादा आवश्यक असणाऱ्या २ ते २.५० मी. क्षेत्रासाठीच भुसंपादनाची कार्यवाही करण्यात यावी. त्याव्यतिरिक्त इतर Unbuildable मिळकतीचे भुसंपादन नव्याने सुरु करण्यात येऊ नये व यापुर्वी सुरु करण्यात आलेल्या Unbuildable मिळकतीचे भुसंपादन रद्द करण्यात यावे व त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्यास या ठरावाच्या अनुषंगाने रद्द करण्यात यावेत अशी मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार पिंपरी कॅम्प येथील साई चौक ते राधीका चौक लगतचे नाल्या पर्यंतचे क्षेत्र हे आरक्षण क्र.१४१ नुसार झोपडपट्टी पुर्नवसन यासाठी आरक्षित आहे. तरी साई चौक ते राधीका चौक नाल्यापर्यंतचे १८.०० मी. रुंद रस्त्याला लागून बहुतांश क्षेत्र हे छोटे छोटे दुकान गाळे व्यवसायीकांचे आहे. या दुकान / गाळे धारकांसाठी सुमारे ४० फुट रुंदीची रस्त्यालगतचे क्षेत्र हे वाणिज्य / व्यापारी वापरासाठी कायम स्वरुपी ठेवणे आवश्यक आहे. तरी आरक्षण क्र.१४१ पैकी शिवाजी रस्त्यालगतचे (१८.०० मी.रुंद) साई चौक ते राधीका चौक नाल्यापर्यंतचे ४० फुट रुंदीचे (Depth) क्षेत्र झोपडपट्टी पुर्नवसन आरक्षणातुन वगळुन वाणिज्य/व्यापारी वापरासाठी प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी व त्यास शासनाची मान्यता घेणेकामी सर्व कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मौजे भोसरी येथील आ.क्र.४२२ मधील एकूण क्षेत्र ०.७८ हेक्टर पैकी ०.४० हेक्टर क्षेत्राकरीता नाट्यगृह व व्यापारी संकूल व उर्वरीत क्षेत्रावर बस टर्मिनस असा फेरबदल करण्याचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम

३७ अन्वये कार्यवाही करणेत येऊन त्यास मा.महापालिकासभा ठराव क्र.४९०३ दि.१६.०६.०३ अन्वये मान्यता देणेत येऊन या बदलास अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिवहन (पी.सी.एम.टी.) यांनी त्यांचेकडील दि.०२.०६.०३ व दि.१४.०७.०३ रोजीच्या पत्रान्वये मा.परिवहन समिती ठराव क्र.१०७८ दि.०७.०४.०३ अन्वये पुढील मान्यता दिली होती. तद्‌नंतर कलम ३७ अन्वयेची विहीत कार्यवाही पुर्ण झालेनंतर मा.महापालिका ठराव क्र.५१८७-अ, दि.०७.०५.०४ अन्वये पारित केलेल्या ठरावानुसार सदर फेरबदलाचा प्रस्ताव महापालिकेकडील पत्र क्र.नरवि/कावि/भो/१०१/०४, दि.२२.०६.०४ अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर करणेत आले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस/१८०४/१३९७प्र.क्र.१४९८/०८ नवि-१३, दि.१८.०८.०९ अन्वये अधिसूचना पारित करताना शासनाने म.न.पा. महापालिका सभेने मंजूर केलेनुसार बदलास मंजूरी न देता पुढील अटींवर बदलण्यास मान्यता दिली आहे.

१) मुळ आरक्षणा खालील संपुर्ण तळमजल्याचे क्षेत्र बस सर्व्हिससाठी अनुज्ञेय राहील.

२) पहिल्या मजल्यावरील ४००० चौ.मी.क्षेत्र नाट्यगृहासाठी अनुज्ञेय राहील.

३) त्यावरील मजल्याचे क्षेत्र व्यापारी संकुलासाठी अनुज्ञेय राहील.

तथापि, शासनाने मंजूरी दिलेनुसार सदरचा प्रकल्प वरच्या मजल्यावर नाट्यगृह व त्यावरच्या मजल्यावर व्यापारी संकुल असा विकसीत केल्यास व्यापारी संकुल वापरण्यास गैरसोईचे होणार असल्याने प्रतिसाद मिळणार नाही तसेच मनपास विकसीत करण्यात अडचणी आहेत. बस टर्मिनससाठी आरक्षीत जागा PMPML यांचेसाठी असल्याने व दोन्ही संस्था वेगवेगळ्या असल्याने सदरचा प्रकल्प एकत्रित विकसीत करता येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे मनपाच्या या पुर्वीच्या प्रस्तावान्वये मंजूरी मिळाल्यास नाट्यगृह व व्यापारी संकुल साठीची आरक्षीत जागा मनपा मार्फत स्वतंत्रपणे विकसीत करता येणे शक्य आहे.

तरी आरक्षण बदलाबाबत प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने शासनाने दिलेल्या मान्यतेचा फेरविचार करून यापुर्वी महापालिका सभा ठराव क्र.५१८७-अ, दि.७/५/०४ च्या मुळ मंजूर ठरावानुसार मौजे भोसरी येथील प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील सर्व्हे नं.६९५/१ पैकी आरक्षण क्र.४२२ पी.सी.एम.टी. बस टर्मिनस-क्षेत्र ०.३८ हेक्टर व नाट्यगृह व व्यापारी संकुल-क्षेत्र ०.४० हेक्टर अशी फेरबदलाची विहीत कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील कार्यवाही करणेस व फेरबदलास फेरमान्यतेसाठी शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १९

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.बोऱ्हाडे शरद परशुराम व मा.लांडे मोहिनी विलास यांचा दि.४/११/२००९ चा प्रस्ताव

२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२९१ दि.४/११/२००९

विषय :- मोशी व बोऱ्हाडेवाडी येथील ३० मीटर रस्ता २४ मीटर करणेबाबत-

बोऱ्हाडेवाडी आणि मोशी येथील आल्हाटवस्ती लगत असणारा ३० मीटर रस्त्यामध्ये येणारे स्थानिक रहिवाश्यांचे घरे किंवा बांधकामे आहेत. त्यामुळे स्थानिक नागरीकांचे अतिशय नुकसान होणार आहे. सद्यस्थितीत मोशी-आळंदी जाण्यासाठी २४ मीटर तसेच ३० मीटर रस्ता डी.पी.मध्ये नियोजित केलेला आहे. त्यामुळे आल्हाटवस्ती लगत असणारा ३० मीटर रस्ता २४ मीटर करणे गरजेचे आहे. सबब ३० मीटर ऐवजी रस्ता रुंदी २४ मीटर करताना कमीत कमी घरे बाधीत होतील या प्रमाणे रस्ता आखणी कायम करावी. याकामी मंजूर विकास योजनेत रस्ता रुंदी कमी करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यांस शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

१.मौजे चिखली मधील गट क्र.१२९७, १२९६ व १३०२ मधुन जाणारा (प्राधिकरण स्पाईन रस्ता ते चिखली आकुर्डी रस्त्यापर्यंतचा) ९ मी.रुंदीचा रस्ता दोन्ही बाजुने ४.५० मी. जागा घेवुन नव्याने मनपाचे विकास आराखड्यात समाविष्ठ करणेत यावा. २. मौजे चिखली येथील विकास आराखड्यातील १८.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता पुर्णपणे गट क्र.१२९७, १२८८, १२८६, १२८३, १२८२, १२८१, १२८०, १२७९, १२७८, १२७५, १२३१ मधुन टाकणेत आलेला असुन सदरचा रस्ता वरिल गटामधुन ९.०० मी. व त्याशेजारील गट क्र.१२६४, १२६६, १२७४ व १२३२ मधुन ९.०० मी. असा एकुण १८.०० मी.रुंदीचा करणेत यावा. ३. मौजे चिखली मधील गट क्र.१२९७ व १२७४ मधुन जाणारा रस्त्या (आरक्षण क्र.जी.१/१०८ व पी.एस.१/१११ मधुन जाणारा १८ मी. रुंदीचा डी.पी. रोड) हा पुर्णपणे गट क्र.१२९७ मधुन जात आहे त्याऐवजी सदरचा रस्ता गट क्र.१२९७ मधुन ९.०० मी. व गट क्र.१२७४ मधुन ९.०० मी. असा एकुण १८.०० मी. रुंदीचा

डी.पी.रस्ता करणेत यावा. तरी याकामी मंजुर विकास योजनेत अ. १ मधील रस्ता नव्याने समाविष्ठ करणेबाबत व अनुक्रमांक २ व ३ मधील रस्त्याचा अलाईनमेंट बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी. चिखली साने चौक ते चिखलीगाव देहु आळंदी रस्ता थरमॅक्स चौकापासुन एम.आय.डि.सी.प्लॅनिंग अॅथॉरिटी एम.आय.डि.सी. हद्दीत १८ मीटर रुंदिचा आहे त्यापुढे पिंपरी चिंचवड प्राधिकरणाच्या हद्दीत २४ मीटर रुंदिचा आहे व सानेचौक ते नेवाळे वस्ती आश्रमापर्यंत ३० मीटर रुंदिचा रस्ता मनपा विकास आराखड्यात दर्शविला आहे सदरचा रस्ता ३० मीटर ऐवजी २४ मीटर करणेत यावा.साने चौक ते शिवशंकर इमारत (चिखली तळवडे) शिवेपर्यंत हा रस्ता २४ मीटर ऐवजी १८ मीटर करणेत यावा. साने चौक ते चिखली रोड (मोरेवस्ती पासुन तळवडे त्रिवेणीनगर रोडपर्यंत (चिंचेच्या झाडाजवळील रस्ता) २४ मीटर ऐवजी १८ मीटर करणेत यावा. याकामी मंजुर विकास योजनेत रस्ता रुंदी कमी करणेकामी महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत यावी. मौजे बोपखेल येथिल स.न.५ चे उत्तर हद्दीलगत पुढे पश्चिमेकडे सि.एम.ई. हद्दीपर्यंत मंजुर विकास योजनेत २४.०० मीटर रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्याच्या मागे व पुढे १८.०० मीटर रस्ता असल्याने मध्येच २४.०० मीटर रस्त्याची आवश्यकता नसल्याने हा २४.०० मीटर रस्ताही १८.०० मीटर करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करुन, नागरीकांच्या हरकती व सुचना न आल्यास, पुनःश्च महापालिका सभेपुढे प्रस्ताव न आणता फेरबदल प्रस्ताव शासनमान्यतेस सादर करणेस तसेच पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील मौजे चऱ्होली गावातील स.नं.२९, ३०, ३१, ३२, ३३, ३५ व ३९ यांचा समावेश रहिवास विभागामध्ये करणेस तसेच स.नं.३३ मध्ये ३ एकर जागेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व हॉस्पिटलचे आरक्षण करणेस मान्यता देणेत यावी.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब,उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

मौजे दिघी येथील स.नं.८४ मधील विकास योजनेतील आ.क्र.२/१२२ ह्या आरक्षणाने बाधीत क्षेत्र हे जमिन मालकाचे तेवढेच क्षेत्र असून सदर आरक्षणामुळे जमिन मालक भूमिहिन होणार असल्याने सदर आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करणेस तसेच हे आरक्षण स.नं.७२ मधे स्थलांतरित करणेस मान्यता देणेत यावी. मौजे रावेत येथील भागश: मंजूर विकास योजनेत स.नं. १४ पै मध्ये आ.क्र. ४/८३ वाहनतळ व आ.क्र. ४/८४ सांस्कृतिक केंद्र व १८.० मी प्रस्तावित रस्तारुंदी

दर्शविलेली असून उर्वरीत निवासी विभागात समाविष्ट आहे. तर स.नं. २२ या मिळकतीमध्ये आ.क्र. ४/८२ दुकान केंद्र व १८.० मी. रुंदीचे दोन रस्ते प्रस्तावित केले आहेत. उर्वरीत व्यापारी झोन दर्शविलेला आहे. स.नं. १६ मध्ये १८.० मी. रस्तारुंदी व काही भाग आ.क्र. ४/८१ खेळाचे मैदान तर काही भाग निवासी विभागात समाविष्ट असून उर्वरीत शेती विभागात समाविष्ट आहे. सदर भागश: मंजूर विकास योजनेत- १) स.नं. १६ व २२ हद्दीवरील अस्तीत्वातील रस्त्यास १८.० मी रस्तारुंदी दर्शवुन प्रस्तावित १८.० मी. रस्तारुंदी रद्द करुन त्याखालील क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करावे.२) स.नं. २२ व १४ मधील आ.क्र.४/८२,४/८३ व ४/८४ ही आरक्षणे स्थळ बदल करुन स.नं. १६ व २२ हद्दीवरील १८.० मी रस्त्यालगत क्षेत्र कायम ठेवून कायम करावीत व स.नं. १४व १३ मधील १८.० मी. प्रस्तावीत रस्तारुंदी रद्द करुन त्याखालील जमिन निवासी विभागात समाविष्ठ करावी तसेच आ.क्र. ४/८१ उद्यान हे आरक्षण अस्तीत्वातील प्रस्तावित १८.० मी रुंद रस्त्याच्या हद्दीवर क्षेत्र बदलासह कायम करावे, याप्रमाणे म.प्र.न.र.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन शासन मान्यतेसाठी पाठवणेस मान्यता देणेत यावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब,मा.रामदास कुंभार व मा.तानाजी खाडे यांची,मा.भाऊसाहेब सुपे व मा.सुरदास गायकवाड यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आली असता-

ठराव क्रमांक :- ७५८ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.बोऱ्हाडे शरद परशुराम व मा.लांडे मोहिनी विलास यांचा दि.४/११/२००९ चा प्रस्ताव
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२९१ दि.४/११/२००९
विषय :- मोशी व बोऱ्हाडेवाडी येथील ३० मीटर रस्ता २४ मीटर करणेबाबत-

बोऱ्हाडेवाडी आणि मोशी येथील आल्हाटवस्ती लगत असणारा ३० मीटर रस्त्यामध्ये येणारे स्थानिक रहिवाश्यांचे घरे किंवा बांधकामे आहेत. त्यामुळे स्थानिक नागरीकांचे अतिशय नुकसान होणार आहे. सद्यस्थितीत मोशी-आळंदी जाण्यासाठी २४ मीटर तसेच ३० मीटर रस्ता डी.पी.मध्ये नियोजित केलेला आहे. त्यामुळे आल्हाटवस्ती लगत असणारा ३० मीटर रस्ता २४ मीटर करणे गरजेचे

आहे. सबब ३० मीटर ऐवजी रस्ता रुंदी २४ मीटर करताना कमीत कमी घरे बाधीत होतील या प्रमाणे रस्ता आखणी कायम करावी. याकामी मंजूर विकास योजनेत रस्ता रुंदी कमी करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यांस शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे. १.मौजे चिखली मधील गट क्र.१२९७, १२९६ व १३०२ मधुन जाणारा (प्राधिकरण स्पाईन रस्ता ते चिखली आकुर्डी रस्त्यापर्यंतचा) ९ मी.रुंदीचा रस्ता दोन्ही बाजुने ४.५० मी. जागा घेवुन नव्याने मनपाचे विकास आराखड्यात समाविष्ठ करणेत यावा. २. मौजे चिखली येथील विकास आराखड्यातील १८.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता पुर्णपणे गट क्र.१२९७, १२८८, १२८६, १२८३, १२८२, १२८१, १२८०,१२७९, १२७८, १२७५, १२३१ मधुन टाकणेत आलेला असुन सदरचा रस्ता वरिल गटामधुन ९.०० मी. व त्याशेजारील गट क्र.१२६४, १२६६, १२७४ व १२३२ मधुन ९.०० मी. असा एकुण १८.०० मी.रुंदीचा करणेत यावा. ३. मौजे चिखली मधील गट क्र.१२९७ व १२७४ मधुन जाणारा रस्त्या (आरक्षण क्र.जी.१/१०८ व पी.एस.१/१११ मधुन जाणारा १८ मी. रुंदीचा डी.पी. रोड) हा पुर्णपणे गट क्र.१२९७ मधुन जात आहे त्याऐवजी सदरचा रस्ता गट क्र.१२९७ मधुन ९.०० मी. व गट क्र.१२७४ मधुन ९.०० मी. असा एकुण १८.०० मी. रुंदीचा डी.पी.रस्ता करणेत यावा. तरी याकामी मंजुर विकास योजनेत अ. १ मधील रस्ता नव्याने समाविष्ठ करणेबाबत व अनुक्रमांक २ व ३ मधील रस्त्याचा अलाईनमेंट बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे. चिखली साने चौक ते चिखलीगाव देहु आळंदी रस्ता थरमॅक्स चौकापासुन एम.आय.डि.सी.प्लॅनिंग ॲथॉरिटी एम.आय.डि.सी. हद्दीत १८ मीटर रुंदिचा आहे त्यापुढे पिंपरी चिंचवड प्राधिकरणाच्या हद्दीत २४ मीटर रुंदिचा आहे व सानेचौक ते नेवाळे वस्ती आश्रमापर्यंत ३० मीटर रुंदिचा रस्ता मनपा विकास आराखड्यात दर्शविला आहे सदरचा रस्ता ३० मीटर ऐवजी २४ मीटर करणेत यावा.साने चौक ते शिवशंकर इमारत (चिखली तळवडे) शिवेपर्यंत हा रस्ता २४ मीटर ऐवजी १८ मीटर करणेत यावा. साने चौक ते चिखली रोड (मोरेवस्ती पासुन तळवडे त्रिवेणीनगर रोडपर्यंत (चिंचेच्या झाडाजवळील रस्ता) २४ मीटर ऐवजी १८ मीटर करणेत यावा. याकामी मंजुर विकास योजनेत रस्ता रुंदी कमी करणेकामी महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन त्यास शासन मान्यता घेण्याची पुढील कार्यवाही प्रशासनाने करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे बोपखेल येथिल स.न.५ चे उत्तर हद्दीलगत पुढे पश्चिमेकडे सि.एम.ई. हद्दीपर्यंत मंजुर विकास योजनेत २४.०० मीटर रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्याच्या मागे व पुढे १८.०० मीटर रस्ता असल्याने मध्येच २४.०० मीटर

रस्त्याची आवश्यकता नसल्याने हा २४.०० मीटर रस्ताही १८.०० मीटर करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करुन, नागरीकांच्या हरकती व सुचना न आल्यास, पुनःश्च महापालिका सभेपुढे प्रस्ताव न आणता फेरबदल प्रस्ताव शासनमान्यतेस सादर करणेस तसेच पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील मौजे चऱ्होली गावातील स.नं.२९, ३०, ३१, ३२, ३३, ३५ व ३९ यांचा समावेश रहिवास विभागामध्ये करणेस तसेच स.नं.३३ मध्ये ३ एकर जागेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व हॉस्पिटलचे आरक्षण करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे दिघी येथील स.नं.८४ मधील विकास योजनेतील आ.क्र.२/१२२ ह्या आरक्षणाने बाधीत क्षेत्र हे जमिन मालकाचे तेवढेच क्षेत्र असून सदर आरक्षणामुळे जमिन मालक भूमिहिन होणार असल्याने सदर आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन निवासी विभागात समाविष्ट करणेस तसेच हे आरक्षण स.नं.७२ मधे स्थलांतरित करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे रावेत येथील भागश: मंजूर विकास योजनेत स.नं. १४ पै मध्ये आ.क्र. ४/८३ वाहनतळ व आ.क्र. ४/८४ सांस्कृतिक केंद्र व १८.० मी प्रस्तावित रस्तारुंदी दर्शविलेली असून उर्वरीत निवासी विभागात समाविष्ट आहे. तर स.नं. २२ या मिळकतीमध्ये आ.क्र. ४/८२ दुकान केंद्र व १८.० मी. रुंदीचे दोन रस्ते प्रस्तावित केले आहेत. उर्वरीत व्यापारी झोन दर्शविलेला आहे. स.नं. १६ मध्ये १८.० मी. रस्तारुंदी व काही भाग आ.क्र. ४/८१ खेळाचे मैदान तर काही भाग निवासी विभागात समाविष्ट असून उर्वरीत शेती विभागात समाविष्ट आहे. सदर भागश: मंजूर विकास योजनेत- १) स.नं. १६ व २२ हद्यीवरील अस्तीत्वातील रस्त्यास १८.० मी रस्तारुंदी दर्शवुन प्रस्तावित १८.० मी. रस्तारुंदी रद्य करुन त्याखालील क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करावे.२) स.नं. २२ व १४ मधील आ.क्र.४/८२,४/८३ व ४/८४ ही आरक्षणे स्थळ बदल करुन स.नं. १६ व २२ हद्यीवरील १८.० मी रस्त्यालगत क्षेत्र कायम ठेवून कायम करावीत व स.नं. १४व १३ मधील १८.० मी. प्रस्तावीत रस्तारुंदी रद्य करुन त्याखालील जमिन निवासी विभागात समाविष्ठ करावी तसेच आ.क्र. ४/८१ उद्यान हे आरक्षण अस्तीत्वातील प्रस्तावित १८.० मी रुंद रस्त्याच्या हद्यीवर क्षेत्र बदलासह कायम करावे, याप्रमाणे म.प्र.न.र.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन शासन मान्यतेसाठी पाठवणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७५९ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.माई ढोरे यांचा दि.६/११/२००९ रोजीचा प्रस्ताव
२) मा. ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.११३ दि.६/११/२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये सर्व्हे नंबर ९ व गावठाण हद्दीलगत गजानन मंदिरामागे ६ मीटर रस्ता डी.पी.मध्ये नियोजित आहे. परंतु सदरच्या बाधीत रस्त्याच्या पश्चिमेला सर्व्हे नंबर ९ मध्ये ४० फुट रस्ता असून, पुर्वेला २५ फुट रस्ता असल्याने कुठलीही अडचण रहदारीस नाही. शिवाय त्याठिकाणी सुमारे २० ते २२ लोकांची पुर्वीपासून घरे असून ते तेथे रहात आहे. सबब सदरच्या रस्त्याची आवश्यकता नसल्याने सदरचा रस्ता डी.पी.मधून रद्द करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल - ७० प्रतिकूल-०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१५/२०१०
दिनांक :- ११/०१/२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.